




सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३१८ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com









गुजरातच्या अहमदाबाद येथे सोमवारी देशातील पहिल्या वंदे मेट्रो रेल्वेचे लोकार्पण करण्यात आले. सोबतच मोदी यांनी काही नवीन वंदे भारत गाड्यांनाही हिरवा झेंडा दाखवला. विशेष म्हणजे, यात महाराष्ट्राच्या वाट्याला आणखी तीन वंदे भारत गाड्या मिळाल्या आहेत

# आला निरोपाचा क्षण!

### राज्यभरात विसर्जनासाठी कडक बंदोबस्त

### छोट्या मूर्तींसाठी कृत्रिम तलाव

**◆ मुंबई, १६ सप्टेंबर**

गेल्या दहा दिवसांपासून देशभरात उत्साहात साजरा होत असलेला गणेशोत्सव आपल्या अखेरच्या टप्प्यात आला असून, बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकींसाठी प्रशासनही सज्ज झाले आहे. उत्साह आणि चैतन्याचे प्रतीक असणारे सर्वांचे लाडके दैवत आता वर्षभरासाठी आपल्यापासून दूर जाणार या विचाराने एकीकडे भावनावेग असतानाच 'पुढच्या वर्षी लवकर या' या घोषणेने राज्यासह अख्खा देश दुमदुमणार आहे.

**पुढच्या वर्षी लवकर या...**



विसर्जनासाठी राज्यात सर्वत्र कडक सुरक्षा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विशेषत: मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसह अन्य मोठ्या शहरांत ठिकठिकाणी पोलिस आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी नागरिकांच्या मदतीसाठी तैनात आहेत. मुंबई, पुण्यात विसर्जन मिरवणुकीसाठी वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आला आहे. याविषयीच्या सूचना दोन दिवस आधीच जाहीर करण्यात आल्या आहेत. पुण्यातील एकूण १७ मार्गांवरील वाहतूक इतरत्र वळवण्यात आली आहे.

मुंबईत समुद्र किनारी विशेष पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जलाशयाच्या ठिकाणी कोणतीही अप्रिय घटना घडू नये यासाठी पुरेशी दक्षता घेतली जात आहे. घरगुती छोट्या मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलाव जागोजागी तयार करण्यात आले आहेत. एकाच दिवशी गर्दी होऊ नये, यासाठी मोठ्या मूर्तींच्या विसर्जनासाठी तीन दिवस आधी आणि तीन दिवस नंतर अशी विभागणी केली आहे. *(वृत्तसंस्था)*

---

सोलापूर तरुण भारत — प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

### बुधवारी अंक नाही!

मंगळवार दि. १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी निमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे बुधवार दि. १८ सप्टेंबर रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

\- व्यवस्थापक

---

## महत्त्वाचे

### शनिवारपासून पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता

**पुणे :** महाराष्ट्रात २१ सप्टेंबरपासून पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. तसेच ५ नोव्हेंबरपासून राज्यात थंडीची सुरुवात होईल, असा अंदाजही व्यक्त केला आहे. येत्या चार-पाच दिवसांपर्यंत राज्यात हवामान कोरडे राहील, मात्र, २१ सप्टेंबरपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे, तो सप्टेंबरच्या शेवटपर्यंत कायम राहील. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा तसेच कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अधिक असेल. विशेषतः नांदेड, लातूर, परभणी, पुणे, कोल्हापूर, सांगली या भागांमध्ये २ ऑक्टोबरपर्यंत मुसळधार पाऊसाचा अंदाज आहे.

### बर्ड ऑटोमोटिव्हकडून रिटेल नेक्स्टचे लोकार्पण

**नवी दिल्ली :** बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाने भारतात रिटेल नेक्स्ट डिलरशिप्सच्या लॉंचची घोषणा केली आहे. रिटेल नेक्स्टमध्ये सर्वोत्तमता देण्यासाठी आणि आधुनिक गरजांची पूर्तता करण्यासाठी यात रिइमेजिन सेवा व सुविधांचा समावेश असेल. ३६ महिन्यांमध्ये ३३ शहरांमधील ५६ सुविधा केंद्रांत रिटेल नेक्स्टची अंमलबजावणी करण्यात येईल.

### सोनभद्रमध्ये मालगाडी रुळावरून घसरली

**सोनभद्र :** उत्तरप्रदेशमधील सोनभद्र येथे सोमवारी पहाटे मुसळधार पावसामुळे जवळच्या टेकडीचा ढिगारा रूळावर पडल्याने मालगाडीचे इंजिन रुळावरून घसरले. आणि रेल्वे वाहतूक सेवा तासभर विस्कळीत झाली. असे रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले. सोमवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास सोनभद्र जिल्ह्यातील चुनार ते चोपनकडे जाणारी मालगाडी ब्रम्हबाबा पुलाजवळील ढिगाऱ्याला धडकली आणि त्यांचे इंजिन रुळावरून घसरले, असे त्यांनी सांगितले. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. रुळांचा ढिगारा हटवल्यानंतर रेल्वे वाहतूक पुर्ववत करण्यात आली, असे रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले.

---

# महाराष्ट्राला मिळाल्या तीन नवीन 'वंदे भारत'

**◆ मुंबई, १६ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबाद येथे आभासी स्वरूपात देशातील पहिल्या वंदे मेट्रो रेल्वेसोबतच महाराष्ट्रातील तीन नवीन 'वंदे भारत' एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला. या वंदे मेट्रोला नमो भारत रॅपिड रेल असे नाव देण्यात आले आहे.

हिरवा झेंडा दाखवण्यात आलेल्या नवीन गाड्या नागपूर-सिकंदराबाद, कोल्हापूर-पुणे आणि पुणे-हुबळी या मार्गावर धावणार आहेत. आतापर्यंत पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वेद्वार महाराष्ट्राच विविध मार्गांवर आठ 'वंदे भारत' धावत होत्या. पश्चिम रेल्वेद्वारे मुंबई-अहमदाबाद आणि मुंबई-गांधीनगर मार्गावर 'वंदे भारत'ची सेवा दिली जात आहे. मध्य रेल्वेकडून मुंबई-मडगाव, मुंबई-सोलापूर, मुंबई-साईनगर, मुंबई-जालना, नागपूर-रायपूर आणि नागपूर-बिलासपूर या मार्गावर 'वंदे भारत' चालवली जात आहे. तीनही नवीन मार्गांवरील 'वंदे भारत' गाड्या या सेमी-हाय स्पीड ट्रेनच्या अपग्रेडेड २.० आवृत्ती आहेत, असे मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्निल निला यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# एकविसावे शतक भारतीयांचे

### १०० दिवसांत प्रत्येक क्षेत्राच्या प्रगतीवर भर

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**◆ गांधीनगर, १६ सप्टेंबर**

देशाचा वेगाने विकास व्हावा यासाठी तिसऱ्या कारकीर्दीतील पहिल्या १०० दिवसांत प्रत्येक क्षेत्र आणि घटकाच्या प्रगतीचा प्रयत्न माझ्या सरकारने केला. केवळ भारतीयच नव्हे, तर एकविसाव्या शतकात भारतच सवोत्कृष्ट असल्याचे संपूर्ण जगाला वाटते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चौथ्या सत्रातील जागतिक नूतनीकरण ऊर्जा गुंतवणूकदार परिषद आणि प्रदर्शनाचे उद्घाटन करताना सांगितले.

पहिल्या १०० दिवसांत केंद्र सरकारचा प्राधान्यक्रम, वेग आणि अवाक्याचे तुम्ही साक्षीदार आहात. देशाची वेगाने प्रगती व्हावी, यासाठी आम्ही प्रत्येक क्षेत्र आणि घटकाच्या प्रगतीचा विचार करीत आहोत. भारताचे वैविध्य, प्रमाण, कार्यक्षमता, क्षमता आणि कामगिरी अद्वितीय आहे आणि त्यामुळेच जागतिक प्रयोगासाठी भारतीय उपाय आहेत, असे मी म्हणतो.

पुढील हजार वर्षांच्या प्रगतीचा पाया भारत तयार करीत आहे आणि केवळ शीर्षस्थानी पोहोचण्यावर नव्हे, तर ते टिकवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आमच्यासाठी हरित भविष्य आणि शून्य उत्सर्जन हे केवळ शब्द नाहीत, या आमच्या गरजा आहेत, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

#### अनोखा योगायोग

केंद्र सरकारची १०० दिवसांची कारकीर्द मंगळवारी पूर्ण होत आहे. यानिमित्त एक अनोखा योगायोग समोर आला. त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७४ वा वाढदिवस आहे. रालोआ सरकारच्या १०० दिवसांची कारकीर्द साजरी करताना, सरकारमधील मंत्र्यांनी त्यांनी केलेली कामे प्रदर्शित करण्याची योजना आखली आहे.

# दिल्लीला मिळणार आज नवा मुख्यमंत्री

**◆ नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केल्यानंतर नव्या मुख्यमंत्र्याची निवड करण्यासाठी आपमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. केजरीवाल मंगळवारी दुपारी ४.३० वाजता नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांची भेट घेत राजीनामा सादर करण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी, सकाळी ११.३० वाजता आपच्या विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत नव्या मुख्यमंत्र्यांची निवड केली जाणार आहे.

मुख्यमंत्रिपदासाठी केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल, मंत्रिमंडळातील सदस्य आतिशी, राखी बिर्ला, सौरभ भारद्वाज, कैलास गहलोत, गोपाल राय आणि आणखी काही नेत्यांच्या नावांची चर्चा आहे. राखी बिर्ला यांची मुख्यमंत्री म्हणून निवड होण्याची शक्यता सर्वांत जास्त आहे. मंगोलपुरीच्या आमदार असलेल्या राखी बिर्ला सध्या दिल्ली विधानसभेच्या उपाध्यक्ष आहेत. महत्त्वाचे म्हणजे, त्या दलित समाजाच्या आहेत. दलित समाजात एक संदेश देण्यासाठी केजरीवाल धक्कातंत्राचा उपयोग करीत राखी बिर्ला यांची नव्या मुख्यमंत्री म्हणून निवड करण्याची शक्यता आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# दहशतवादाला खोलवर गाडू

### अमित शाह यांची ग्वाही

**◆ किश्तवाड, १६ सप्टेंबर**

भाजपाच्या नेतृत्वातील केंद्रातील रालोआ सरकार जम्मू-काश्मिरातील दहशतवाद इतक्या खोलवर गाडून टाकेल की, तो कधीही पुनरुज्जीवित होणार नाही. निष्प्रभ करण्यात आलेले कलम ३७० आता इतिहासजमा झाले आहे. ते कुणीही परत आणू शकणार नाही, असा ठाम पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी येथील प्रचारसभेत केला. जम्मू-काश्मिरातील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारतोफा आज थंडावल्या.



नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडी जम्मू-काश्मिरात सरकार स्थापन करू शकणार नाहीत, असे अमित शाह यांनी प्रचारसभेला संबोधित करताना सांगितले.

**काँग्रेसकडून अतिरेक्यांना सोडण्याचे आश्वासन**

जम्मू-काश्मिरात सरकार स्थापन केल्यानंतर अतिरेक्यांना तुरुंगातून सोडण्यासारखी आश्वासने काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सने दिली आहेत. भारतात दहशतवाद फोफावण्यापासून रोखण्याचे धाडस मोदी सरकारव्यतिरिक्त कुणातही नाही, हे मी माछील देवीला साक्ष ठेवून सांगतो, असे अमित शाह म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### ताज हॉटेलने घडविला इतिहास

# आतिथ्य क्षेत्रातील भारतातील आघाडीची कंपनी

**◆ मुंबई, १६ सप्टेंबर**

टाटा समूहाचे पहिले ताज हॉटेल १९०३ मध्ये मुंबईत सुरू झाले. एका खोलीचे रात्रीचे भाडे ६ रुपये होते. ताज हॉटेल चालवणारी कंपनी इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडचे (आयएचसीएल) मार्केट कॅप १ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. या मार्केट कॅपला स्पर्श करणारी ही पहिली भारतीय हॉस्पिटॅलिटी कंपनी ठरली आहे.

ओबेरॉय हॉटेल ही देशातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत मौल्यवान कंपनी आहे. ओबेरॉय हॉटेल्सची मूळ कंपनी ईआयएचचे मार्केट कॅप सुमारे २४ हजार कोटी रुपये आहे. कोरोनानंतरच्या प्रवासातील तेजीमुळे हे क्षेत्र नवीन मूल्यांकनाच्या उंचीला स्पर्श करीत आहे. सर्वांत मोठी एअरलाईन कंपनी इंडिगोने गेल्या जूनमध्ये १ लाख कोटी रुपयांच्या मार्केट कॅपचा टप्पा गाठला होता. *(वृत्तसंस्था)*

### मणिपुरात मंत्र्याच्या घरावर ग्रेनेड हल्ला

**◆ इम्फाळ, १६ सप्टेंबर**

मणिपूरचे मंत्री काशिम वाशूम यांच्या घरावर संशयित बंडखोरांनी ग्रेनेड हल्ला केला. यात कुणीही जखमी झाले नसले, तरी त्यांच्या संपत्तीचे नुकसान झाल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली.

शनिवारी रात्री झालेल्या या हल्ल्यात कुणीही जखमी झाले नाही. ग्रेनेडचा स्फोट झाला, त्यावेळी मी आणि माझे कुटुंबीय घरी नव्हतो, असे वाशूम यांनी सांगितले. ग्रेनेडच्या स्फोटामुळे घराची भिंत आणि इतर भागांचे नुकसान झाले. घटनास्थळावर ग्रेनेडमधील छर्रे आढळले. *(वृत्तसंस्था)*

# महागाईच्या आगीत 'तेल'

**◆ नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

**ऐन सणासुदीत खाद्यतेल महागले**

एकीकडे भाजीपाल्यांचे दर वाढत असताना, आता खाद्यतेलाचेही दर वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागणार आहे. केंद्र सरकारने खाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतल्यानंतर खाद्यतेलाचे भाव वाढले आहे.

सरकारने विविध खाद्यतेलांवरील कस्टम ड्युटी वाढवण्याचा निर्णय घेतला. सोयाबीनचे भाव वाढविण्यासाठी सरकारने शनिवारपासून खाद्यतेल आयात शुल्कात २० टक्क्यांनी वाढ केली. याचा परिणाम बाजारावर दिसून आला. खाद्यतेलाच्या १५ लिटर डब्याच्या दरात अडीचशे रुपयांची वाढ झाल्याचे समोर आले. सरकारने कच्चे आणि शुद्ध सूर्यफूल तेलासह इतर काही खाद्यतेलांवरील कस्टम ड्युटी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. अहवालानुसार, कच्चे आणि शुद्ध पाम तेल, सोयाबीन तेल आणि सूर्यफूल बियाणे तेलावर बेसिक कस्टम ड्युटी वाढवण्यात आली आहे. *(वृत्तसंस्था)*



**किती वाढली बेसिक कस्टम ड्युटी?**

क्रूड पाम तेल, कच्चे तेल आणि कच्चे सूर्यफूल बियाणे तेलावरील मूलभूत कस्टम ड्युटीचा दर आतापर्यंत शून्य होता. म्हणजे या तेलांच्या आयातीवर कोणतेही आयात शुल्क नव्हते. आता ते २० टक्के करण्यात आले आहे. शुद्ध सूर्यफूल बियाणे तेल, शुद्ध पाम तेल आणि शुद्ध सोयाबीन तेलावरील मूळ कस्टम ड्युटीचा दर ३२.५ टक्के करण्यात आला आहे. यापूर्वी हा दर १२.५ टक्के होता.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



गुजरातच्या अहमदाबाद येथे सोमवारी देशातील पहिल्या मेट्रो रेल्वेचे लोकार्पण केल्यानंतर त्यातून पंतप्रधान मोदी यांनी प्रवासही केला. यावेळी त्यांच्या डब्यात असलेल्या विद्यार्थ्यांशी मोदी यांनी संवाद साधला

# ट्रम्प यांच्यावर एके-४७ रायफलने गोळीबार

## हल्ल्याचा दुसरा प्रयत्न; संशयित आरोपीला अटक

◆ **फ्लोरिडा, १६ सप्टेंबर**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि अध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पुन्हा एकदा हल्ल्याचा प्रयत्न झाला. रविवारी फ्लोरिडाच्या वेस्ट पाम बीच येथील त्यांच्या गोल्फ कोर्समध्ये गोल्फ खेळत असताना एके-४७ रायफलने गोळीबार झाला. याप्रकरणी एका संशयिताला अटक करण्यात आली आहे.

या घटनेच्या तपासाची जबाबदारी एफबीआयकडे सोपवण्यात आली आहे. ही घटना रविवारी पहाटे दोनच्या आसपास घडली. ट्रम्प यांच्यावरच गोळीबार करण्यात आला होता की नाही, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. सिक्रेट सर्व्हिसच्या अधिकाऱ्यांनुसार, डोनाल्ड ट्रम्प पूर्णपणे सुरक्षित आहेत.

गोळीबार झालेल्या ठिकाणच्या झुडपात एक एके-४७ रायफल सापडली असून, एका संशयिताला अटक करण्यात आली. दरम्यान, या हल्ल्यानंतर कमला हॅरिस यांनी प्रतिक्रिया दिली. मला ट्रम्प यांच्या फ्लोरिडातील क्लबबाहेर गोळीबार झाल्याची माहिती मिळाली. ट्रम्प सुरक्षित असल्याचे समजताच आनंद झाला. अमेरिकेत हिंसेला स्थान नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

**कोण आहे हल्लेखोर रायन रुथ ?**

'न्यू यॉर्क टाईम्स'च्या रिपोर्टनुसार, रायन वेस्ली रुथ हा उत्तर कॅरोलिना येथील ग्रीन्सबोरो येथे बांधकाम कामगार म्हणून काम करीत असे. त्याने नॉर्थ कॅरोलिना कृषी आणि तांत्रिक राज्य विद्यापीठात शिक्षण घेतले आहे. २०१८ च्या सुमारास हवाई येथे तो स्थलांतरित झाला. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतर युद्धात सहभागी होण्याची इच्छा त्याने व्यक्त केली होती. *(वृत्तसंस्था)*

# वर्धेत मोदींसह ३० व्हीव्हीआयपी!

## विश्वकर्मा प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात

**वर्धा, १६ सप्टेंबर**



पंतप्रधान विश्वकर्मा योजनेंतर्गत लाभार्थ्यांना किट्स व धनादेश वितरण तसेच तीन दिवसीय प्रदर्शन आणि अमरावतीच्या मेगा टेक्सटाईल्स पार्कचे भूमि पूजन शुक्रवार, २० सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वर्धेतून होणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्रासह महाराष्ट्राबाहेरील जवळपास ३० व्हीव्हीआयपींची प्रामुख्याने उपस्थिती राहणार असून या कार्यक्रम ाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

स्थानिक स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानावर भव्य व्यासपीठ आणि ४० हजार नागरिकांना बसता यावे, असे ६ डोम उभारण्यात आले आहे. वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून शहरात विविध ठिकाणी वाहनतळांची तर तब्बल चार ठिकाणी तात्पुरते ८ हेलिपॅड्स बनविण्यात आले आहे.

शुक्रवार २० रोजी वर्धा शहराला पोलिस छावणीचे स्वरूप येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हवाईमार्गे वर्धेत आगमन होणार आहे. त्यामुळे सेवाग्राम परिसरात तीन, स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानावर तीन, जिल्हा होमगार्ड मैदानावर एक तर पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर एक तात्पुरते हेलिपॅड बनविण्यात आले आहे. हेलिपॅड तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले.या प्रदर्शनात देशातील विविध भागांतील प्रतिनिधी सहभागी होणार आहे.

# श्रीरामांच्या अयोध्या नगरीत सौर ऊर्जेचा झगमगाट

## देशात १७ आदर्श शहरे बनविण्याची पंतप्रधानांची घोषणा

◆ **गांधीनगर, १६ सप्टेंबर**

प्रभू श्रीराम सूर्यवंशी होते. आता अयोध्येतील प्रत्येक घर, कार्यालय आणि सेवांचे संचालन सौर ऊर्जेच्या माध्यमातूनच होणार आहे. भगवान रामांची अयोध्या नगरी सोलर शहर म्हणून विकसित केले जात असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

चौथ्या वैश्विक अक्षय ऊर्जा गुंतवणूकदार संमेलन आणि एक्सपोचे (री-इन्वेस्ट) आयोजन करण्यात आले. त्यावेळी आठ हजार कोटींहून अधिकच्या विकास योजनांचे उद्घाटन आणि शिलान्यास करण्यात आले. या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी ही माहिती दिली.

विविधता, प्रमाण, क्षमता तसेच कामगिरीच्या बाबतीत भारत अद्वितीय आहे आणि जगाला आता विश्वास आहे की, हा देश २१ व्या शतकातील एक सर्वोत्तम पर्याय आहे. २१ व्या शतकाचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल, तेव्हा भारताच्या सौर क्रांतीचा अध्याय सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल.



हरित भविष्य हे केवळ काल्पनिक शब्द नाहीत. या देशाच्या गरजा आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सरकार अयोध्या आणि इतर १६ शहरांना मॉडेल सोलर सिटी म्हणून विकसित करण्यासाठी काम करीत आहे, त्यादृष्टीने २०२४ मध्ये गुंतवणूक करा, असे आवाहन पंतप्रधानांनी गुंतवणूकदारांना केले.

मोदी म्हणाले की, त्यांच्या सरकारने ऊर्जा क्षेत्रात अनेक मोठे निर्णय घेतले आहेत, ज्यात ऑफशोअर ग्रीन एनर्जी प्रकल्पांसाठी ७००० कोटी रुपयांच्या खर्चासह व्यवहार्यता अंतर निधी योजना तसेच ३१,००० मेगावॅट जलविद्युत निर्मितीसाठी १२,००० कोटी रुपयांहून अधिक मंजूरी यांचा समावेश आहे.

५०० गिगावॅट नवीकरणीय ऊर्जेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारत अनेक पातळ्यांवर काम करीत आहे. पीएम सूर्य घरी मोफत वीज योजना ही एक अनोखी सौर ऊर्जेची योजना आहे, ज्यासाठी सरकार निधी उपलब्ध करून देते आणि सौर छताची स्थापना करण्यास मदत करते. या योजनेमुळे प्रत्येक घर वीज उत्पादक बनणार आहे. यासाठी १३ दशलक्ष कुटुंबांनी नोंदणी केली आहे, तर ३.२५ लाख कुटुंबांनी स्थापना पूर्ण केली आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

# भितरकनिका राष्ट्रीय अभयारण्यात वाढला किलबिलाट

## दहा प्रजातींच्या १,३०,१२३ पक्ष्यांची नोंद

◆ **केंद्रपाडा, १६ सप्टेंबर**

यंदाच्या मान्सूनमध्ये ओडिशातील केंद्रपाडा जिल्ह्यातील भितरकनिका राष्ट्रीय अभयारण्यात पक्ष्यांच्या घरट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे, अशी माहिती एका वरिष्ठ वनअधिकाऱ्याने सोमवारी दिली.

येथे दहा प्रजातींचे १,३०,१२३ पक्षी असल्याचे पक्षीगणनेतून समोर आले. यासह मान्सूनमध्ये पक्ष्यांची संख्या ६,३६५ ने वाढल्याचे स्पष्ट झाले. २०२३ मध्ये झालेल्या पक्षीगणनेत येथे १,२३,८६७ पक्षी दिसून आले होते. या हंगामात १३०० खारफुटींच्या टोकांवर २७,२८२ घरटी दिसून आली. थेट मोजणी करून ही पक्षीगणना करण्यात आली. पक्षीगणना करणाऱ्या पथकांनी भितरकनिका राष्ट्रीय अभयारण्य, त्याच्या आजूबाजूचा परिसर माथाडिया, लक्ष्मीप्रसादडिया, दुर्गाप्रसादडिया, बलिडिया पाणवठ्यांवरील बगळ्यांच्या स्थानांचे आणि खारफुटीचे निरीक्षण केले, असे अधिकाऱ्याने सांगितले.



### वाढलेली संख्या पक्षी संवर्धनासाठी सकारात्मक

भितरकनिका येथे पक्ष्यांची वाढलेली संख्या ही राज्यातील पक्षी संवर्धन कार्यक्रमासाठी सकारात्मक असल्याचे भितरकनिकाचे विभागीय वनअधिकारी सुदर्शन गोपीनाथ यादव यांनी सांगितले. नदी आणि खाडींमधील मुबलक मासे आणि मानवी वस्तींपासून दूर असल्याने येथे हजारो पक्ष्यांच्या विणीसाठी हे ठिकाण अनुकूल ठरले आहे.

हे पक्षी घरटी बनवतात आणि ती दुरुस्त करतात, घरट्यांसाठी हिरव्या फांद्या गोळा करतात, अंडी उबवतात, पिलांना चारा देतात, त्यांचे रक्षण करतात, त्यांना पंखाखाली घेतात, तेव्हा हे दृश्य पाहण्यासारखे असते, असे वनाधिकाऱ्याने सांगितले. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### सायलीचा नवा चित्रपट 'पाणीपुरी'



**मुंबई :** प्रत्येक नात्याची स्वत:ची एक चव असते. त्यात आंबट, गोड, तिखट अशा सर्वच अनुभवांचा अंतर्भाव असतो. अशाच चटकदार नात्यांची कथा घेऊन सायली संजीवचा अभिनय असणारा नवा चित्रपट येत आहे. त्याचे नाव आहे 'पाणीपुरी'. यात सायलीसह मकरंद देशपांडे, ऋषिकेश जोशी, विशाखा सुभेदार, भारत गणेशपुरे, प्राजक्ता हनमघर, शिवाली परब असे एकाहून एक मातब्बर कलाकार आपल्या अभिनयाची चुणूक दाखवणार आहेत. चित्रपटाची पटकथा, संवाद संजय नवगिरे यांची असून, संगीत अजित परबचे आहे. मनोरंजनाची ही चटकदार पाणीपुरी १५ नोव्हेंबरला ऐन दिवाळीत सिनेरसिकांच्या भेटीसाठी दाखल होणार आहे.

### कर्करोगावर उपचार सुरू असताना हिनाचा नववधूच्या वेशात रॅम्पवॉक

**मुंबई :** टीव्हीवरील लोकप्रिय अभिनेत्री हिना खान सध्या कर्करोगाचा सामना करीत आहे. तिला ब्रेस्ट कॅन्सर असून, काही महिन्यांपूर्वी याचे निदान झाले. तिच्यावर शस्त्रक्रिया झाली असून, सध्या केमोथेरपी सुरू आहे. अशा स्थितीतही तिने टाईम्स फॅशन वीकमध्ये नववधूच्या वेशात रॅम्प वॉक केला. इतक्या गंभीर आजारपणातही तिने दाखवलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे. हिनाने स्वत: या रॅम्प वॉकचा व्हिडीओ शेअर केला. गुजराती नववधूच्या रूपात तिने आपला लूक शेअर केला आहे. पुढे काय होणार, याचा विचार करणे मी सोडून दिले आहे. आता या क्षणाला काय करता येईल, त्याकडेच लक्ष देते, बाकी सर्व देवावर सोडून दिले. त्याला तुमची प्रार्थना समजते आणि तुमचे मन माहिती आहे, असे तिने लिहिले आहे.

### अखेर अदितीने बांधली लग्नगाठ

**हैदराबाद :** हिंदी आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील अभिनेत्री अदिती राव हैदरीने अभिनेता सिद्धार्थसोबत विवाहबंधन बांधले आहे. मोजक्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत अदितीच्या घराण्याशी संबंधित मंदिरात हा विवाह सोहळा पार पडला. अदितीने स्वत:च फोटो शेअर करीत ही बातमी जाहीर केली. तिने सोनेरी रंगाची साडी नेसली असून, सिद्धार्थने पांढरा कुर्ता आणि लुंगी असा पोशाख केला होता. खूप साध्या पद्धतीने हा विवाहसोहळा पार पडला. अदिती राव हैदरी ही आमीर खानची पूर्वपत्नी किरण रावची सख्खी बहीण असून, सिद्धार्थने आमीरसोबत 'रंग दे बसंती' या चित्रपटात काम केले होते.



### आठवडाभरात ओटीटीवर सात चित्रपट, वेबसीरिजचा धमाका

**मुंबई :** सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात प्रेक्षकांना ओटीटीवर मनोरंजनाची मेजवानी आहे. ड्रामा, सस्पेन्स, क्राईम-थ्रिलर अशा वेगवेगळ्या चित्रपटांची मेजवानी प्रेक्षकांना ओटीटीवर मिळणार आहे. या आठवड्यात 'द ग्रेट इंडियन कपिल शो'चा दुसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याशिवाय, सहा चित्रपट आणि वेब सीरिज देखील प्रदर्शित होणार आहे. त्यात अ व्हेरी रॉयल स्कॅण्डल, व्हॉट्स नेक्स्ट, थलेवट्टम पालक, लाल सलाम, जो तेरा है वो मेरा है आणि तंगलात यांचा समावेश आहे.

# इंस्टाग्रामवर अब्जाधीशांचे वर्चस्व

## डोनाल्ड ट्रम्प आघाडीवर

◆ **न्यू यॉर्क, १६ सप्टेंबर**


अब्जावधी डॉलर्सची संपत्ती असलेले जगातील श्रीमंत उद्योगपती अनेक कारणांमुळे चर्चेत असतात. कधी त्यांचा साधेपणा चर्चेत असतो, तर कधी ते त्यांच्या संपत्तीमुळे. सोशल मीडियावर देखील या उद्योगपतींची भरपूर चर्चा होत असते. त्यामुळे त्यांच्या फॉलोअर्सची संख्याही दिवसेंदिवस वाढत असते.

एका नियतकालिकाने इन्स्टाग्रामवर सर्वाधिक प्रभावी असलेल्या श्रीमंत लोकांची यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीत डोनाल्ड ट्रम्प ते इंस्टाग्रामचे मालक मार्क झुकेरबर्ग, बिल गेट्स, चांगपेंग झाओ, मायकल ब्लूमबर्ग आणि गौतम अदानीपर्यंतच्या अब्जाधीशांच्या नावांचा समावेश आहे.

पोर्टलने अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इंस्टाग्रामवरील सर्वांत प्रभावशाली अब्जाधीश मानले आहे. त्यांची सध्याची एकूण संपत्ती ५.२ अब्ज डॉलर्स असून, इंस्टाग्रामवर प्रत्येक पोस्टमधून ते किमान २,२४,९७५ डॉलर्सची कमाई करीत आहेत. इंस्टाग्रामवरील सर्वांत प्रभावशाली अब्जाधीशांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्यानंतर ओप्रा विन्फ्रे दुसऱ्या स्थानावर आहेत. मेटा सीईओ मार्क झुकरबर्ग तिसऱ्या स्थानावर आहे.

### आठव्या क्रमांकावर गौतम अदानी

इंस्टाग्रामवरील जगातील दहा सर्वांत प्रभावशाली अब्जाधीशांमध्ये भारतातील गौतम अदानी हे एकमेव नाव आहेत. त्यांना यादीत आठव्या स्थानावर ठेवण्यात आले आहे.



अदानींबद्दल म्हटले जाते की, ते इंस्टाग्रामवरील एका पोस्टमधून किमान ७,९४३ डॉलर्स आणि कमाल १०,७४७ डॉलर्स कमाई करतात. मायकेल ब्लूमबर्ग ९व्या, तर चांगपेंग झाओ १०व्या स्थानावर आहेत. टॉप-१० च्या यादीत आशियातील केवळ दोनच नावे आहेत, तर या यादीत केवळ दोन महिलांचा समावेश आहे.

इंस्टाग्राम ही मेटाची कंपनी आहे. या यादीत मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स चौथ्या क्रमांकावर आहेत. व्हर्जिन गॅलेक्टिकचा रिचर्ड ब्रॅन्सन पाचव्या आणि मार्क क्युबान आणि शेरिल सँडबर्ग हे अनुक्रमे सहाव्या आणि सातव्या स्थानावर आहेत. *(वृत्तसंस्था)*

### मिझोरममध्ये कोट्यवधींचे हेरॉईन जप्त

**ऐझवाल :** मिझोरमच्या चम्फाई जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या कारवाई करीत आसाम रायफल्सने २७६ ग्रॅम हेरॉईन जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात याचे मूल्य १.९ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. चम्फाईच्या मेलबुक गावात आसाम रायफल्सने केलेल्या पहिल्या कारवाईत १२९ ग्रॅम हेरॉईन जप्त करण्यात आले.

# आता एसटी बसेस होणार इलेक्ट्रिक

## विद्यमान बस इलेक्ट्रिक म्हणून परिवर्तीत करण्याच्या केंद्राच्या हालचाली

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

सध्या देश वाढत्या प्रदूषणाच्या समस्येचा सामना करीत आहे. यावर एक उपाय म्हणून देशातील विविध परिवहन मंडळांच्या जुन्या बसेसना निरोप देऊन विद्यमान बस इलेक्ट्रिक म्हणून परिवर्तीत करण्याची योजना अंमलात आणली जाणार आहे.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मते, परिवहन विभागाच्या ज्या बस अद्याप संचालनासाठी योग्य आहेत, त्यांच्या बाबत ईव्ही किट लावण्याचा पर्याय ठेवला जाणार आहे. यासाठी वाहन निर्माता कंपन्यांना तंत्रज्ञानावर काम करण्यास सांगण्यात आले आहे. सातत्याने वाढणारी प्रदूषणाची पातळी पाहता मंत्रालयाने हा मुद्दा अतिशय गांभीर्याने हाताळला आहे.

देशात परिवहन मंडळाच्या २.८ लाख बसेस धावत आहेत. प्रत्यक्षात गरज ३० लाख बसेसची आहे. न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करताना दिल्ली एनसीआरमध्ये दहा वर्षे जुन्या डिझेल आणि पेट्रोल वाहनांवर बंदी आणली आहे. मात्र, अन्य राज्यांमध्ये अद्याप असा निर्णय लागू केलेला नाही. काही राज्यांमध्ये वेगवेगळ्या कालावधीतील वाहनांवर प्रतिबंध आहेत. त्याची अंमलबजावणी गांभीर्याने झालेली नाही.

### १५ वर्षे जुन्या वाहनांची नोंदणी होणार नाही

केंद्र सरकारची चिंता पर्यावरणासोबत मानवी जीवनासाठीही आहे. त्यामुळे जुन्या वाहनांचे चलन बंद करण्यावर आणि भंगार धोरणावर जोर दिला जात आहे. सध्या भारतात स्टेज-६ म्हणजे बीएस-६ श्रेणीचे वाहन प्रदूषणाच्या मानकांवर सक्षम घोषित आहेत. बीएस-५ वाहनही रस्त्यावर आहेत. मात्र, त्यापेक्षा जुनी वाहने चिंतेचे कारण आहेत. त्यामुळेच आता सरकारी वाहनांबाबत हा नियम करण्यात आला आहे की, १५ वर्षे जुन्या डिझेल वाहनांची नोंदणी केली जाणार आहे.

# 'नीट'मध्ये देशात अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्याने संपवले जीवन

**नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

दिल्लीच्या मौलाना आझाद मेडिकल कॉलेजमध्ये एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. नवदीपसिंग असे या २५ वर्षीय तरुणाचे नाव असून, त्याने पारसी अंजुमन गेस्ट हाऊसमध्ये स्वत:ला फाशी लावून घेतली. विशेष म्हणजे, नवदीप २०१७ च्या वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट यूजीमध्ये संपूर्ण देशात पहिला ठरला होता. सध्या तो रेडिओलॉजीमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनचे शिक्षण घेत होता.

२०१७ मध्ये राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षेत नवदीपसिंगने ६९७ गुणांसह पहिला रँक मिळवला होता. पंजाबच्या मुक्तसर येथे त्याच्यावर अन्त्यसंस्कार करण्यात आला. नवदीप माझा फोन उलचत नव्हता म्हणून मी त्याच्या एका मित्राला त्याला पाहण्यासाठी पाठवले. त्यावेळी हॉस्टेलमधील खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याचे त्याला आढळले. यानंतर दरवाजा तोडण्यात आला, तेव्हा नवदीपने फाशी लावून घेत आत्महत्या केल्याचे निदर्शनास आल्याची माहिती त्याच्या वडिलांनी दिली. दिल्ली पोलिसांनी याप्रकरणी आत्महत्येचे प्रकरण नोंद करून घेतले आहे. आतापर्यंत नवदीपकडे कोणतेही सुसाईड नोट सापडले नाही. पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

# शेख अब्दुल्ला घराण्याने केले सर्वाधिक काळ जम्मू-काश्मीरवर राज्य

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीरवर सर्वाधिक काळ कोणत्या घराण्याने राज्य केले असेल, तर ते शेख अब्दुल्ला यांच्या घराण्याने. काश्मीरचा पूर्ण बट्ट्याबोळ कोणी केला असेल तर, तो याच अब्दुल्ला घराण्याने.

केंद्रात जशी गांधी घराण्याने दीर्घकाळ सत्ता उपभोगली तसेच जम्मू-काश्मीरमध्ये अब्दुल्ला घराण्याने. केंद्रात काँग्रेसचे पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि नंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले, त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीरमध्ये आधी शेख अब्दुल्ला, नंतर डॉ. फारुक अब्दुल्ला आणि सर्वांत शेवटी उमर अब्दुल्ला यांनी मुख्यमंत्रिपद उपभोगले. गांधी आणि अब्दुल्ला घराण्याच्या अभद्र युतीने काश्मीरचा प्रश्न कायमस्वरूपी चिघळला आणि त्याची किंमत देशाला वेळोवेळी चुकवावी लागली.

शेख अब्दुल्ला यांनी तीनवेळा जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्रिपद भूषवले. पहिल्यांदा ते देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ५ मार्च १९४८ रोजी मुख्यमंत्री झाले. ९ ऑगस्ट १९५३ पर्यंत म्हणजे ५ वर्षे १५७ दिवस ते मुख्यमंत्री होते. त्यानंतर तब्बल २२ वर्षांनी शेख अब्दुल्ला दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. २५ फेब्रुवारी १९७५ ते २६ मार्च १९७७ असे दोन वर्ष एक महिना ते मुख्यमंत्री होते. तिसऱ्यांदा ९ जुलै १९७७ ते ८ सप्टेंबर १९८२ या काळात शेख अब्दुल्ला मुख्यमंत्री झाले. यावेळी ५ वर्ष ६१ दिवस ते मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्रिपदावर असतानाच शेख अब्दुल्ला यांचे निधन झाले.



ऑल जम्मू-काश्मीर मुस्लिम कॉन्फरन्स हा त्यांचा पहिला राजकीय पक्ष. नंतर त्यांनी या पक्षाचे नाव बदलत जम्मू-काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स असे केले. मात्र, पक्षाचे नाव बदलल्यानंतरही त्यांच्या मुस्लिमधार्जिण्या आणि भारतद्वेष्ट्या भूमिकेत फारसा बदल झाला नाही. जम्मू-काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाल्यानंतर अब्दुल्ला जम्मू-काश्मीरचे पहिले पंतप्रधान झाले. त्यावेळी जम्मू-काश्मीरच्या मुख्यमंत्र्याला वजिरे आलम म्हणजे पंतप्रधान म्हटले जात होते. त्याची घटना आणि झेंडाही वेगळा होता. याचविरोधात तत्कालीन जनसंघाचे नेते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी 'एक देश मे दो विधान, दो निशान आणि दो प्रधान' विरुद्ध आंदोलन करीत आपल्या प्राणाचे बलिदान केले होते.

शेख अब्दुल्ला काश्मीरच्या स्वयंनिर्णयाचे पुरस्कर्ते होते. भारतविरोधी शक्तींना पाठिंबा दिल्याच्या आरोपावरून केंद्र सरकारने त्यांचे सरकार बरखास्त केले आणि अटकही केली. अब्दुल्ला यांचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याशी अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. तरी सुद्धा नेहरू यांनी त्यांचे सरकार बरखास्त करीत त्यांना अटक केली. याचाच अर्थ शेख अब्दुल्ला देशविरोधी कार्यात गुंतले असल्याचे भक्कम पुरावे तेव्हा सापडले असावे.

# शेख अब्दुल्ला यांची भारतविरोधी आणि पाकिस्तानधार्जिणी भूमिका

◆ **नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

शेख अब्दुल्ला यांचे मूळ घराणे हिंदू ब्राम्हण होते. अब्दुल्ला यांचे पणजोबा हे सप्रु वंशातील हिंदू ब्राम्हण होते. एका सुफी उपदेशकाच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला. शेख अब्दुल्ला यांनी आपल्या 'आतिश-ए-चिनार' या आत्मचरित्रात हा उल्लेख केला आहे. त्यामुळे यावर अविश्वास करण्याचे कारण नाही.

शेख अब्दुल्ला यांची महात्मा गांधी आणि पंडित नेहरू यांनी वेळोवेळी पाठराखण केली. त्यामुळेच जम्मू-काश्मीरचे भारतात विलीनीकरण झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमधील अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून शेख अब्दुल्ला यांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर शेख अब्दुल्ला यांनी स्थानिक तरुणांची एक सेना तयार केली. भारतीय लष्कर जम्मू-काश्मीरमधून परत गेल्यानंतर मिलिशिया नावाची ही सेना जम्मू-काश्मीरचे रक्षण करेल, असे अब्दुल्ला यांना अपेक्षित होते. एकप्रकारे शेख अब्दुल्ला यांना आपले स्वत:चे लष्कर तयार करायचे होते. पण, तेव्हाचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी तसे होऊ दिले नाही. भारतीय लष्कर जम्मू-काश्मीरमध्ये कायम ठेवत शेख अब्दुल्ला यांच्या या सेनेचे पंख कापायला सुरुवात केली. १९७२ मध्ये दागन ब्रिगेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मिलिशियाचे भारतीय लष्करात विलीनीकरण करीत जम्मू-काश्मीर लाईट इन्फेन्ट्री असे नामकरण करण्यात आले. शेख अब्दुल्ला यांचे सरकार बरखास्त करीत त्यांना जी अटक झाली, त्याची पृष्ठभूमी या घटनाक्रमात आहे.

नंतर पुन्हा नेहरू यांचे शेख अब्दुल्ला यांच्याबद्दलचे प्रेम उफाळून आले. पाकिस्तानसोबतचे संबंध पूर्ववत करण्यासाठी शेख अब्दुल्ला यांनी सेतू म्हणून काम करावे, अशी विनंती त्यांना केली. त्यानुसार शेख अब्दुल्ला यांनी पाकिस्तानात जात तत्कालीन राष्ट्राध्यक्ष शेख अयुब यांना भारत दौऱ्यावर येण्यासाठी तयार केले. या दौऱ्याची तारीखही ठरली. पण, त्याआधीच पंडित नेहरू यांचे निधन झाले. या घटनाक्रमामुळे शेख अब्दुल्ला यांची भूमिका हळूहळू भारतविरोधी आणि पाकिस्तानधार्जिणी होत चालली होती. त्यामुळेच तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी १९६५ ते १९६८ पर्यंत शेख अब्दुल्ला यांना नजरकैदेत ठेवले. विशेष म्हणजे, शास्त्रीनंतर पंतप्रधान झालेल्या इंदिरा गांधी यांनी हा निर्णय कायम ठेवला. काश्मीरमध्ये जनमत संग्रह घेण्याची शेख अब्दुल्ला यांची मागणी होती. त्यामुळे त्यांना काश्मीर खोऱ्यातून हद्दपारही करण्यात आले होते. *(तभा वृत्तसेवा)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# उद्योगपती रतन टाटा अनुव्रत पुरस्काराने सन्मानित

**मुंबई, दि. १६ सप्टेंबर-**

अनुव्रत विश्व भारती (अनुविभा) तर्फे सन २०२३चा प्रतिष्ठित अनुव्रत पुरस्कार प्रसिद्ध उद्योगपती आणि परोपकारी रतन टाटा यांना त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी प्रदान करण्यात आला. अनुव्रत विश्व भारती सोसायटी अध्यक्ष अविनाश नहार यांच्या नेतृत्वाखाली, शिष्टमंडळाने पुरस्काराचा एक भाग म्हणून स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्रासह रतन टाटा यांना रु. १.५१ लाखाची रक्कम दिली. यावेळी अनुविभा सचिव भिखम सुराणा, मुंबई कस्टम आयुक्त अशोक कुमार कोठारी, उपाध्यक्ष अनुविभा विनोद कुमार आणि सहयोगी सचिव अनुविभा मनोज सिंघवी उपस्थित होते.

श्री रतन टाटा यांना अनुव्रत पुरस्कार प्रदान करताना, श्री नहार यांनी मानवजातीसाठी त्यांच्या सकारात्मक योगदानाचे कौतुक केले आणि मानवता आणि मानवतावादी सेवेचे जगात एक उत्कृष्ट उदाहरण ठेवल्याबद्दल संपूर्ण अनुव्प्रभा कुटुंबाच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले. अनुव्रत अनुशस्त आचार्य श्री महाश्रमण यांनी त्यांना शुभेच्छा पाठवल्या आणि त्यांना उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. रतन टाटा यांनी अनुव्रत अनुष्ठानाबद्दल मनापासून आदर आणि कौतुक व्यक्त केले.अनुव्रत चळवळ गेल्या ७५ वर्षांपासून मानवी ऐक्य नैतिकता, अहिंसा आणि सद्भावना या क्षेत्रात प्रशंसनीय कार्य करत आहे, हे विशेष. दिवंगत आचार्य तुलसी यांनी सुरू केलेल्या या चळवळीने संयुक्त राष्ट्रात आपली विशेष ओळख निर्माण केली आहे, अनुव्रत पुरस्कारांच्या मालिकेत आतापर्यंत आत्माराम, जैनेंद्र कुमार, शिवाजी भावे, शिवराज पाटील, शिवराज पाटील यांच्यासह देशातील अनेक मान्यवर सहभागी झाले आहेत. नितीश कुमार, डॉ. एपीजे अब्दुल कलाम, डॉ. मनमोहन सिंग, टी. एन. शेषन, प्रकाश आमटे आदींना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# उदरनिर्वाहासाठी अन्यत्र गेलेल्या ग्रामस्थांकरीता व्हिसीद्वारे ग्रामसभा

● ग्रामविकास मंत्री व प्रधान सचिव यांना निवेदन

**मुंबई , दि.१६ सप्टेंबर:**

उदरनिर्वासाठी गावभर गेलेल्या ग्रामस्थांकरीता दूरदृष्टी प्रणालीद्वारे ग्रामसभा घेण्यात यावे, अशी मागणी रुग्ण हक्क परिषदेचे मंत्रालयीन सचिव शाहरुख मुलाणी यांनी केली आहे. याबाबत ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन व प्रधान सचिव एकनाथ डवले यांना लेखी निवेदन ई-मेद्वारे पत्र पाठविले आहे.

मुलाणी म्हणाले की, राज्यातील ३६ जिल्ह्यात ३५८ तालुक्यात एकूण २८८१३ ग्राम पंचायती आहेत. उक्त जिल्ह्यातील विविध गावांतील ग्रामपंचायत मधील ग्रामस्थांना अनेकदा रोजगार किंवा उदरनिर्वाहाच्या आवश्यकतेमुळे आपल्या गावांपासून दूर ५०० किमी. अंतरापेक्षा अधिक अन्य ठिकाणी वास्तव्यास जावे लागते. अशा परिस्थितीत त्यांना गावात नियमितरित्या होणाऱ्या ग्रामसभांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होणे कठीण असते. यामुळे गावाच्या विकासप्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग शक्य होत नाही आणि त्यांच्या सूचना व मतांचा अभाव राहतो. ग्रामपंचायत मधील प्रत्येक ग्रामस्थांची आपल्या गावासोबत नाळ जोडलेली असते. गावावरील प्रेम, आपुलकी, निष्ठा,असते. पण, उदरनिर्वाह करिता त्यास व्यक्तीस परगावी जावे लागते.

या समस्येवर एक उपाय म्हणून गावाबाहेर असलेल्या ग्रामस्थांना ग्रामसभेत सहभागी होण्याची संधी मिळावी यासाठी प्रत्यक्ष सभेबरोबरच दूरदृष्टी प्रणाली (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग) च्या माध्यमातून ग्रामसभा घेणे. या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास गावाच्या बाहेर असलेल्या ग्राम स्थांना देखील ग्रामसभेत भाग घेण्याची संधी मिळेल.

# मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीसांवर गुन्हे दाखल करा!

● काँग्रेसची कुलाबा पोलिसांकडे तक्रार



**मुंबई दि. १६ सप्टेंबर :**

कर्नाटकातील गणपती विसर्जनाबाबत फेक न्यूज पसरवून राज्यात धार्मिक तेढ निर्माण केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने केली आहे. यासंदर्भात कुलाबा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

१३ सप्टेंबर रोजी बेंगलूरूच्या टाऊन हॉल परिसरात कोणतीही परवानगी न घेता विश्व हिंदू परिषदेने आंदोलन केले होते. यावेळी आंदोलकांनी श्री ची मूर्ती घेऊन आले होते. आंदोलकांना ताब्यात घेताना मूर्तीला इजा होऊ नये, म्हणून पोलिसांनी ती सुरक्षित ठेवत आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी विधिवत पूजा अर्चना करून बाप्पाचे विसर्जन केले. ही माहिती अनेक फॅक्ट चेक करणा-या वेबसाईट्स व राष्ट्रीय वृत्तवाहिन्यांनी फॅक्ट चेकच्या माध्यमातून सार्वजनिक केली आहे.

पण राजकीय फायद्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भात माध्यमांना प्रतिक्रिया देताना कर्नाटक सरकारने व पोलिसांनी गणपती उत्सव थांबवून गणपतीची मूर्ती जप्त केली असे धडधडीत असत्य विधान करून सणासुदीच्या काळात राज्यात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबतच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आपल्या एक्स (ट्विटर) हँडलवरून या संदर्भात चुकीची माहिती प्रसारित करून कर्नाटकच्या काँग्रेसला जबाबदार धरले. तर भाजपचे आमदार नितेश राणे यांनी या संदर्भात खोटी माहिती प्रसारित करून समाजात तेढ आणि धार्मिक तणाव निर्माण करण्याचा व सामाजिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई अशी मागणी करणारी लेखी तक्रार प्रदेश काँग्रेसच्या विधि विभागाचे अध्यक्ष अॅड. रविप्रकाश जाधव यांनी कुलाबा पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकाकडे केली आहे.

# मराठा आंदोलनाचे मुखत्यार पत्र कोण्या एकट्याला दिले नाही : नरेंद्र पाटील

● मराठा चळवळीला पाडापाडीचे वेगळे वळण लागले
● आंदोलनाचा आजचा पाचवा दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ सप्टेंबर -**

सन १९८० च्या दशकात स्व. अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी बलिदान दिले. त्यानंतर ही चळवळ अण्णासाहेब जावळे, विनायकराव मेटे यांनी पुढे नेण्याचे काम केले. स्व. अण्णासाहेब पाटलांचा मुलगा म्हणून मराठा चळवळीचे मुखत्यारपत्र नरेंद्र पाटलांकडे आहे का? असा प्रश्न विचारत मराठा समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वच मराठा समाजासह २८८ आमदारांना हा अधिकार आहे. ते कुठल्या एकट्याला मुखत्यारपत्र दिलेले नाही. एखादया व्यक्तीच्या व्यतिरिक्त जर दुसऱ्या कोणी मराठा समाजासाठी काही मागणी केली तर तो मराठाद्वेषी. हे सगळ्यांनी डोक्यातून काढून टाकले पाहिजे, असा जोरदार टोला अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी मराठा आरक्षणाचे आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांचे नाव न घेता लगावला.

ओबीसीतून मराठा आरक्षणाच्या मुद्दयावर विशेष अधिवेशन बोलवावे व मुलींप्रमाणेच सर्वच समाजातील मुलांना देखील उच्च व व्यावसायिक शिक्षण मोफत करावे. या मागणीस्तव आमदार राजेंद्र राऊत यांचे बार्शीत मागील पाच दिवसांपासून बेमुदत ठिय्या आंदोलन सुरु आहे. आज नरेंद्र पाटील यांनी आमदार राऊत यांची भेट घेवून या मागणीला जाहीर पाठिंबा दिला. त्यावेळी ते बोलत होते.

नरेंद्र पाटील म्हणाले, आमदार राऊत यांचे मराठा आरक्षणासह, समाजाच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीत व तालुक्याच्या विकासात योगदान आहे. विधानसभेत आरक्षणासंदर्भात बोललेली फारशी चर्चा होत नाही. परंतु, उगीचच कोणीतरी समाजामध्ये आ. राऊत यांच्याबद्दल गैरसमज निर्माण करुन दिला जातो. मराठा चळवळीमध्ये राऊत यांची भूमिका फार स्पष्ट आहे. त्यांनी मतदारसंघासाठी, मराठा समाजाच्या मुला-मुलींसाठी तसेच तालुक्यातील सर्व जाती धर्माचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे. जालन्यामधल्या आ. राऊत यांच्या काही बैठका मी पाहिल्या. त्यांची तेथील बाजू आमदार राऊत वरती नेत्यांपर्यंत पोहाचवताहेत. आ. राऊत यांनी चांगला निर्णय घेतला. चांगली गोष्ट आहे असे वाटले. पण अचानकपणे कुठे भडका पडला कळाले नाही. परंतु, एक लक्षात आले. एखादया व्यक्तीच्या व्यतिरीक्त जर दुसऱ्या कोणी मराठा समाजासाठी काय मागणी केली तर तो मराठाद्वेषी ठरतो. हे सगळ्यांनी डोक्यातून काढून टाकावे.

नरेंद्र पाटील म्हणाले, पूर्वीच्या तुलनेत आता या महामंडळाची व्याप्ती वाढली असून आज महाराष्ट्रामध्ये एक लाख मराठा उदयोजक बनविण्यामध्ये यश आले. या माध्यमातून बार्शी तालुक्यात अडीच हजार मराठा उदयोजक झालेले आहेत. हे आमच्या लोकांच्या त्यागातून घडलेले आहे. नक्कीच आरक्षणामध्ये मोठया प्रमाणामध्ये राज्य सरकार कायद्याच्या चौकटीमध्ये अडकले असले तरी आपण सर्वांनी ताकद लावणे गरजेचे आहे. आरक्षणाचा लढा हा शेवटच्या टोकापर्यंत नेवू. आरक्षणप्रश्नी आमदार राजेंद्र राऊत यांचा विशेष अधिवेशन बोलावण्याचा मुद्दा मला पटला म्हणून मी त्यांच्या भेटीला आलो. प्रत्येक मराठा समाज जो राजकारण सोडून आहेत तो तुमच्या पाठीशी उभा राहील. कालपर्यंत जे मराठा चळवळीमध्ये आमच्या सर्वांचे योगदान होते. परंतु आता मराठा चळवळीला एक वेगळे वळण लागले पाडापाडीचे. त्यामुळेच या मराठा चळवळीमध्ये आमची एकी कुठे भरकटत चाललीय का हा प्रश्न मला पडला आहे असे सांगितले.

आमदार राजेंद्र राऊत म्हणाले, आरक्षणाच्या प्रश्नाचे राजकारण होवू नये. अंधारात एक व उजेडात एक भूमिका न घेता जेथे हा प्रश्न खऱ्या अर्थाने सुटणार आहे, त्या सभागृहात सर्वांनीच या प्रश्नावर आपली भूमिका स्पष्ट करुन निर्णय घ्यावा या प्रामाणिक भावनेतून आंदोलन सुरु केले असल्याचे सांगितले. यावेळी विजय राऊत, श्रीकांत देशमुख, रमेश पाटील, संतोष निंबाळकर, कुंडलिक गायकवाड, विलास रेणके, किरण गाढवे, नारायण जगदाळे, सदानंद गाडे आदी उपस्थित होते.




### प्रबोधन मंचाची बैठक

या दौ-यात बार्शी तालुक्यातील प्रबोधन मंचाने समर्थ व्यायामशाळेत बैठक आयोजित केली होती. त्यात त्यांनी प्रबोधन मंचाच्या कामाबद्दल माहिती जाणून घेतली व त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या कामाची पद्धत विषद केली. प्रा. किरण गाढवे यांनी महामंडळाच्या बाबतीत अडचणी सांगितल्या. प्रबोधन मंचाचे प्रमुख सुरेश हालमे व अरुण ग्रामोपाध्ये यांनी सत्कार केला.

# बेताल आमदार गायकवाडच्या मुसक्या आवळा : नाना पटोले

**मुंबई. दि. १६ सप्टेंबर :**

आपल्या बेताल वक्तव्यांसाठी आणि बेलगाम वागण्यासाठी कुप्रसिद्ध बुलढाण्याचा आमदार संजय गायकवाड याने पुन्हा एकदा आपली लायकी आणि पातळी दाखवून देत लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची जीभ कापणा-यास ११ लाखांचे बक्षीस जाहीर केले. या गुंड प्रवृत्तीच्या आमदाराच्या वक्तव्याची सरकारने गंभीर दखल घेऊन गुन्हा दाखल करून त्याच्या मुसक्या आवळाव्यात, अन्यथा काँग्रेस कार्यकर्ते या गुंडांचा बंदोबस्त करतील ,असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

यासंदर्भात पटोले म्हणाले की, राहुल गांधी यांची वाढती लोकप्रियता बघून भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या पायाखालची वाळू घसरली आहे. त्यामुळे हताश आणि निराश झालेले सत्ताधारी. राहुलजींच्या वक्तव्याची मोडतोड करून विपर्यास करून त्यांच्या बदनामीची मोहिम चालवत आहेत.



राहुल गांधी कधीही आरक्षण बंद करू असे म्हटले नाहीत. उलट आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवून ज्या समाजाचे आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित आहेत ते सोडवू असे म्हटले आहेत. भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांचे गुंड प्रवृत्तीचे लोक तर त्यापुढे जाऊन जीवे मारण्याच्या धमक्या देत आहेत. संजय गायकवाड सारख्या अडाणी लोकांना राहुल गांधी अमेरिकेत काय बोलले ते माहित तरी आहे का? राहुल गांधी मोदी, शाह यांना घाबरत नाहीत. संजय गायकवाड सारख्या गावगुंडांच्या धमक्यांना ते थोडेच घाबरणार आहेत. काँग्रेस कार्यकर्ते ढाल बनून त्यांचे संरक्षण करायला सज्ज आहेत. त्यांच्या केसाला धक्का लावायचा प्रयत्न सोडा विचारही करू नका, असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी दिला.

# जरांगे-पाटलांकडून समाजकारणाऐवजी आता राजकारण

● अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचा आरोप
● राहुल गांधींनी परदेशात केलेली टीका चुकीची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन देशातील व्यवस्थेविरोधात केलेली टीका ही चुकीचीच आहे. जरांगे - पाटलांकडून पूर्वी समाजकारण होत होते, आता राजकारण होत आहे. सत्ताधारी पक्षातील एका विशिष्ट नेत्याला टार्गेट केले जात आहे मात्र मराठा समाज आता सावध झाला आहे, असा आरोप अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.

सोलापुरात आयोजित पत्रकार परिषदेत अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी विविध विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली. ते पुढे म्हणाले, काँग्रेस सारख्या मोठ्या पक्षाच्या नेत्यांचे राहुल गांधी हे चिरंजीव आहेत. यापूर्वी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही परदेशात प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी देशाच्या व्यवस्थेबद्दल टीका केली नव्हती मात्र विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन टीका टिपणी केली. हे विरोधी पक्ष नेत्याला शोभत नाही. हे चुकीचे आहे. त्यांना तसा त्यांना अधिकारही नाही. याबाबत खा. प्रणिती शिंदे यांनी त्यांच्या नेत्यांना अवगत करावे, अशी अपेक्षा अध्यक्ष पाटील यांनी व्यक्त केली.

मराठा आरक्षणासंदर्भात बोलताना नरेंद्र पाटील पुढे म्हणाले, मराठा आरक्षणासाठी लढाईचा प्रवास हा जरांगे - पाटील यांनी सुरू केला नाही तर स्व. अण्णासाहेब पाटील यांनी १९८० पासून तो सुरू केला आहे. त्यानंतर अनेक मान्यवरांनी यासाठी पाठपुरावा केला आहे. मात्र यापूर्वीच्या काळात दोन समाजात वाद निर्माण केला गेला नव्हता. तशी वक्तव्यही केली जात नव्हती. कालपर्यंत जरांगे पाटील हे समाजकारण करत होते. आज ते राजकारण करत आहेत. पाडापाडीचे राजकारण हाती घेतले आहे.ज्या सरकारच्या काळात कुणबी प्रमाणपत्र शोधून दिले. त्याच सत्ताधारी सरकारमधील एका पक्षाच्या नेत्याला टार्गेट केले जात आहे. विशिष्ट पक्षाच्या विरोधात आंदोलने केली जात आहेत असा आरोप करतानाच आता मराठा समाज सावध झाला आहे. जरांगे -पाटील हे एका व्यक्तीला टार्गेट करत आहेत. त्यांच्या मागे बोलवता धनी कोण हे शोधावे, असेही अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले.




### केंद्राने दिलेले ईडब्ल्यूएस आरक्षण मराठा समाजाच्या हिताचे

केंद्र सरकारने दिलेले ईडब्ल्यूएस १० टक्के आरक्षण हे मराठा समाजाच्या हिताचे आहे. केंद्रस्तरावर मोठ्या प्रमाणात याचा मराठा समाजाला लाभ होऊ शकणार आहे, असेही यावेळी अध्यक्ष पाटील यांनी सांगितले.

### आ. राजेंद्र राऊत यांनी यापूर्वी विधानसभेत आवाज उठविला होता

बार्शी येथील उपोषणा संदर्भात बोलताना अध्यक्ष नरेंद्र पाटील म्हणाले, आ. राजेंद्र राऊत यांनी मराठा आरक्षणासाठी यापूर्वीही लढा उभारला होता. राजेंद्र राऊत हेही मराठा आहेत. अनेक मंत्र्यांच्या गाड्या अडवल्या होत्या. विधानसभेतही त्यांनी यापूर्वी आवाज उठविला होता. त्यांचेही योगदान यासाठी आहे. ते करत असलेले काम योग्य आहे.

# धनगर समाज आरक्षणासाठी तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

● आंदोलन स्थळावरील दुसरी घटना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ सप्टेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील ईश्वर वठार येथील संजय नानासाहेब चौगुले या तरुणाने आरक्षण अंमलबजावणीसाठी उपोषण करीत असलेल्या आंदोलन स्थळी समाजाची राज्यव्यापी बैठक संपत असताना हा आत्महत्येचा प्रयत्न केला त्याने पिकावरील अळी मारण्यासाठी असणारे डेलिगेट नावाचे विषारी औषध प्राशन केले त्यावेळी समोर उभारलेल्या समाज बांधवांनी त्याच्या हातावर मारल्यामुळे बरेच



जहरी विश पोटात गेले तर उर्वरित जमिनीवर पडले त्या तरुणास तात्काळ पंढरपूर येथील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे तर दोन दिवसापुर्वी माढा तालुक्यातील आलेगाव येथील सरपंच अमोल देवकते यांनी ही आंदोलन स्थळी विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता .आंदोलन स्थळावरील हि दुसरी घटना आहे.

**तरुणांना आव्हान :** समाज बांधवांनो आरक्षण अंमलबजावणीसाठी एकीकडे समाजातील सहा तरुण आमरण उपोषणास बसले असून त्यांचा आज नववा दिवस असून राज्यभरातून याला मोठा प्रतिसाद मिळत आहे तरी आपण असे कृत्य करून आपल्या कुटुंबाला वाऱ्यावर सोडू नये समाज आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे असून आपण एकसंघ पणे आंदोलन, उपोषणकर्त्यांना पाठिंबा देण्यासाठी प्रयत्न करा परंतु असे टोकाचे पाऊल उचलू नये असे कळकळीचे आवाहन सकल धनगर समाजाच्या वतीने मा.आमदार प्रकाश शेंडगे व आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले आहे.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळातर्फे शनिवारी सोलापुरात मराठा उद्योजकांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

राज्यात मराठा उद्योजक घडावेत या उद्देशाने १ लाख मराठा उद्योजक संकल्पपूर्ती निमित्त अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व लोकमंगल बँक यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ठीक १० वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे मराठा उद्योजक मेळावा आणि लाभार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे,अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनाच्या माध्यमातून आज पर्यंत १ लाख ५ हजार ९३६ लाभार्थी तयार झाले असून, ८८७५ कोटी रुपये विविध बँकेनी कर्ज वितरीत केले आहे. त्यापैकी महामंडळाने ८५९ कोटी व्याज परतावा केला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात १० हजार ५० एवढे लाभार्थी झाले असून, ८०३ कोटी रुपये विविध बँकांनी कर्ज वितरीत केले आहे. त्यापैकी महामंडळाने ७८ कोटी पेक्षा जास्त व्याज परतावा केला आहे. महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी मंत्र्यांबरोबर शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी, राष्ट्रीयकृत बँक, खाजगी बँक व सहकारी बँकांचे प्रमुख, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, अधिकारी- कर्मचारी, लोकप्रतिनिधी, लाभार्थी यांचे तसेच अन्य संबंधीतांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले.



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्रात १ लाखापेक्षा जास्त मराठा उद्योजक संख्या पूर्ण झाली. जिल्ह्यातील सर्व मराठा बांधव व मराठा उद्योजक यांच्या पर्यंत ही योजना पोहोचावी या उद्देशातून हा मेळावा आयोजित केला आहे. यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील , आ. सुभाष देशमुख आदींसह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

महामंडळाच्या माध्यमातून आता यापुढे पाच लाखाचा टप्पा पार पाडायचा आहे. महामंडळाचे ऑनलाईन कामकाज सुरू आहे. मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे माहिती मिळू शकणार आहे. भविष्यात कॉल सेंटर तयार करण्याचा मानस आहे. या माध्यमातून फोनवरूनच लाभार्थ्यांना माहिती मिळू शकेल. त्यांच्या शंकाचे निरसन होऊ शकणार आहे. त्याचबरोबर महामंडळाचे स्वतःचे सॉफ्टवेअर तयार करण्यात येणार आहे, असेही अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस अनंत जाधव, अर्जुन चव्हाण, शिवाजी मोरे, स्वानंद कोडूरीकर आदी उपस्थित होते.

# पानगल प्रशालेत पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय व एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या नईम शेख मेमोरियल हॉलमध्ये हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल फोनचे दुरुपयोग, सहनशीलता, सायबर क्राईम, जबाबदार नागरिका चे कर्तव्य, समाजात एकोपा, या विषयावर तपशीलवार मार्गदर्शन केले.



पानगल प्रशाला व कनिष्ठ महविद्यालयाचे सर्वच विद्यार्थी साहेबांच्या विषय वार मार्गदर्शनात गुंतून साहेबाना ऐकत होते. या नंतर प्रश्नोत्तर सेशन मध्ये विद्यार्थ्यांनी आपले मनातले प्रश्न विचारले त्यावर साहेबांनी त्यांच्या प्रश्नांचे वस्तुनिष्ठ व मनमोकळेपणाने उत्तर दिली. सुरुवातीस पानगल व बी.क्यू.के प्रशालेच्या एन.सी.सी, आर.एस.पी ग्रुपने मार्च पास केले त्यांना सलामी दिली. यावेळी जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्री ताटे व सायबर क्राईमचे पोलिस निरीक्षक सुनील दोडगे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. हारुन रशीद बागबान यांनी प्रस्ताविक केले.

सूत्रसंचालन जाकीर शहापुरे यांनी केले. अब्दुल रउफ पटेल यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अकबर पठाण यानी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# त्वमेव केवलं कर्तासि...

जमिनीतल्या मातीत जन्माला आलेले एखादे लहानसे बीज अंकुरते, मोठे होते आणि काळासोबत वाढत जाऊन गगनाला भिडणारी उंची गाठत महावृक्षाचे रूप धारण करते, कोवळ्या अंकुरानिशी उगवणारी एखादी वेल मिळेल तो आधार पकडत उंच झेपावण्याच्या ध्यासाने वरवर चढत जाते, एखाद्या लहानशा रोपट्यावर एक कळी अलगद आकाराला येते आणि दिवसागणीक मोठी होत तिचे सुगंधी फूल फुलताच कृतार्थतेच्या भावनेने अवघे रोपटेच मोहरून जाते, उन्हाळा आला की सारी सृष्टी अस्तित्व टिकविण्यासाठी धडपडताना अचानक नव्या पालवीने मोहरू लागते आणि पावसाच्या सरीची वाट पाहात स्तब्धपणे पडून राहतात, पावसाची एखादी सर अंगावर झेलताच त्यांनाही अंकुर फुटतो आणि आपल्या मुळांच्या शेजारी नव्याने उगवलेल्या नव्या वंशाची वाढ न्याहाळत एखादा वृक्ष आपल्या उतारवयाला समाधानाने वाटचाल करू लागतो... सृष्टीचे हे सारे कौतुक न्याहाळताना, केवळ सृष्टीचे सौंदर्य अनुभवण्याचा मोह मनाला अनावर झालेला असतो. सृष्टीचे कौतुक जाणवू लागते आणि लहानपणी कधीतरी पाठ केलेली, ऐकलेली किंवा कुठेतरी वाचलेली ती मराठमोळी कविताच समोर उभी राहते. 'वैशाखमासी प्रतिवर्षि येती, आकाशमार्गे नवमेघपंक्ती, नेमेचि येतो मग पावसाळा, ते सृष्टीचे कौतुक जाण बाळा...' असे सांगताना कवीदेखील त्याच कोड्यात अडकून उत्तराच्या शोधात गुंतून जातो. ज्याला आपण ईश्वर मानतो, ज्याची पूजा करतो, जो आपला जन्मदाता, सुखकर्ता, दुःखहर्ता आहे आणि ज्याच्या प्रेमाचा आशीर्वाद हाच आपल्यासाठी कृपाप्रसाद असतो, तो परमेश्वर हाच या साऱ्या चमत्काराचा कर्ता आहे, हे या कोड्याचे उत्तर मनावर बिंबते... सश्रद्ध असो वा अश्रद्ध, नास्तिक, विज्ञानवादी, भौतिकवादी वा आस्तिक, परंपरावादी; प्रत्येकालाच हे मान्य करावे लागते की सजीव-निर्जीव, चल-अचल असे जे काही भवताल दिसते, ते सारे निर्माण करणारी, त्याचे पालन करणारी आणि त्याचा विलय करणारी जी काही शक्ती आहे त्याला ईश्वर म्हणावे किंवा काहीही म्हणावे, पण ते काहीतरी अलौकिक आहे.

परंपरावाद किंवा ईश्वरवादाची नेमकी व्याख्या करणे अलिकडच्या विज्ञानयुगाच्या काळात काहीसे कठीणच झाले आहे. पाश्चात्त्य प्रभावातून समाज भौतिकवादाकडे झुकू लागल्यापासून आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत, त्यामागे कोणत्याही ज्ञात-अज्ञात शक्तीचा काहीही संबंध नाही, असा विचार बळावत चालला असल्याने निरीश्वरवादाची मानसिकता समाजात वाढू लागली असल्याचे म्हटले जाते; ते तितकेसे खरे नाही. जगाच्या पाठीवर सर्वत्र, सर्वच समाजघटकांनी आपापल्या विचारसंस्कृतीनुसार त्या अज्ञात शक्तीचे अस्तित्व मान्य केले आहे. त्यांच्या उपासनापद्धती अलग असतील, त्या अज्ञाताशी त्यांच्या परंपरांनी रेखाटलेली चित्रे किंवा व्यक्तित्वे कदाचित अलग असतील, पण त्यांच्यासाठी तोच त्यांचा निर्माता आणि नियंता असतो, ही जाणीव निरीश्वरवादाच्या आणि भौतिकवादाच्या गदारोळातही अस्तित्व टिकून आहे; यालाही चमत्कारच म्हणावे लागेल. काळाच्या ओघात प्रार्थनांच्या पद्धती बदलल्या असतील, पूजेच्या परंपरांना नवतेचा साज असेल आणि उत्साहाचे व्यापारीकरणही झाले असेल, पण परंपरांनी घालून दिलेला भक्तीचा संस्कार मात्र तोच, जुनाच आहे. म्हणूनच आजही आपण सण-उत्सव साजरे करतो, तेव्हा उत्साहाला उधाण येते, भक्तीचा महापूर लोटतो आणि या परंपरा सण म्हणून पाळल्या जातात.

गेल्या दहा दिवसांपासून महाराष्ट्रातच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात जेथे जेथे आपल्या संस्कृती आणि परंपरांचे पाईक पसरलेले आहेत, त्या प्रत्येक घरात प्रतीकात्मकरीत्या किंवा पार्थिवरीत्या गणेशोत्सवाचा अमाप उत्साह ओसंडून वाहताना जगाने अनुभवला. भूतकाळाच्या नोंदी अपुऱ्या पडतील अशा काळापासून हा उत्सव साजरा करताना सुखदुःखाचे अनेक प्रसंग समाजाने सहजपणे झेलले. तीन-चार वर्षांपूर्वी, याआधी कधी अनुभवली नव्हती अशा महामारीने घराघरात भयाचे मळभ दाटले, जीवघेण्या काळाची गडद काळी सावली अनेक घरांवर दाटली आणि भविष्याच्या, अस्तित्वाच्याच काळजीची काजळी मनामनांवर धरली. त्या स्थितीतही, गणेशोत्सवाला उत्साहाची माफक का होईना, झालर लावली गेलीच. हा परंपरेचा, संस्कृतीचा आणि संस्काराचा विजय तर होताच; पण त्या अज्ञाताच्या अस्तित्वावरील अपार श्रद्धेचा विजय म्हणावा लागेल. त्याच गणेशाच्या आगमनाने दुःखहरण होते, सुखाचा वर्षाव होतो, विघ्नवार्ता हरतात आणि प्रेम, कृपाप्रसादाने मने मोहरून जातात, हा आपला पिढ्यापिढ्यांचा अनुभव आहे. त्यामुळेच त्याच्या आगमनाने घराघरात श्रद्धेचा सुगंध दरवळू लागतो, आरत्यांचे ध्वनी आसमंतात घुमतात. बदलत्या काळात, बदलत्या रूपाने हा उत्सव नव्या परंपरांच्या साथीने अमाप उत्साहाने साजरा केला जातो, नव्या पाश्चात्त्यांच्या प्रभावाखालील परंपरांचा पगडा असलेल्या पिढ्या ज्या उत्साहाने या उत्सवात सहभागी होतात, ते या उत्सवाचे स्वरूप बदलल्याची जुन्यांची खंत माघार घेते आणि उत्साहाच्या नव्या उधाणातील अनोखा आनंद अनुभवत जुन्या पिढीचे प्रतिनिधी भविष्याच्या आश्वस्त भावनेने समाधानी होतात. गणरायाच्या पूजा-अर्चना, सकाळ-संध्याकाळच्या आरत्या, प्रसाद आणि घरोघरीच्या गणेश दर्शनाच्या परंपरेतून दृढ होणारी जुनी नाती किंवा नव्याने जोडली जाणारी नवी नाती, हा पिढ्यांपूर्वी घराघरांत अनुभवला जाणारा उत्सवाचा साजरेपणा काळाच्या ओघात रस्त्यावर आला. घराघरात उत्सव सार्वजनिक होऊन घरातला गणपती कोणा गल्लीचा, उपनगराचा किंवा थेट महानगराचाही राजा होऊन भव्य-दिव्य मृत्तिकामूर्तींच्या स्वरूपात रस्त्यावरच्या मंडपात विराजमान होऊन टाळ-मृदंग आणि झांजांच्या पारंपरिक नादातील भक्तिरसाऐवजी ढोल, बँजो किंवा डीजेच्या तालावरच्या नव्या भक्ती परंपरेतलाही सुखकर्ता म्हणूनच शुभाशीर्वाद देऊ लागला आहे. काळाच्या बदलत्या प्रवाहामुळे भक्तीच्या व्यापारीकरणाचा वाढत्या दबावामुळे सण, उत्सव, परंपरा, संस्कृती हे शब्द कालबाह्य होणार की काय, अशी एक भीती जाणत्या पिढीच्या मनात अधूनमधून उमटत असते. काही पिढ्यांपूर्वी देवघरात प्रतिष्ठापना होऊन विराजमान होणाऱ्या गणरायाने, शंभर वर्षांपूर्वीच तेव्हाची गरज ओळखली आणि घराघरातील देव्हाऱ्यातून बाहेर पडून भक्तीला सामूहिकतेचा साज चढवून एका नव्या लढ्याची प्रेरणा देत समाजाची मानसिकताच बदलून विघ्नहर्त्याची भूमिका पार पाडण्यासाठी सिद्ध झाला.

वैशाख वणव्याने मरगळलेल्या निसर्गाला बसणाऱ्या उन्हाळी झळांचा ताप दूर करून निळ्या नभात अवतरणाऱ्या कृष्णमेघांतून बरसणाऱ्या पाऊसधारा, असे अनेक विभ्रम दाखविणारा निसर्ग कधी कधी कोपतो आणि आपल्या अचाट शक्तीचा अनुभव देत अस्तित्वालाच आव्हानही देऊ लागतो, तेव्हा विघ्नहर्त्याची हीच रूपे भाविकांच्या भावनांतून प्रकट होतात आणि विघ्नाचे सावट दूर झाले की विघ्नहर्त्याची कृपा झाल्याच्या भावनेने कृतकृत्य होऊन अमाप उत्साहाने नवा उत्सव साजरा करण्यासाठी भाविक सिद्ध होतात. अगदी अलिकडच्या संकटातून सावरल्यानंतरच्या काळातील गणेशोत्सवाच्या उत्साहाला याच भावनेची किनार लाभली आहे. संकटे तर सरलीच; पण नव्या उमेदीच्या उत्साहाला उधाण आले आहे. जगण्याच्या आकांक्षांना नवे धुमारे फुटू लागले आहेत आणि अमृतकाळाच्या वाटचालीच्या उद्दिष्टांचे शिखर पादाक्रांत करताना आत्मनिर्भरतेच्या नव्या जाणिवांनी मने आश्वस्त झाली आहेत. परंपरांना नवतेचा साज देणारा गणराया आज भक्तिरसाच्या महापुरातच पुन्हा माघारी, आपल्या घरी परतण्याची तयारी करत आहे. बाप्पाला निरोप देणे हा तर केवळ औपचारिक सोहळा आहे. तो मनामनांत, घराघरात आणि प्रत्येकाच्या भावनांत भक्तिरूपाने घर करून राहिलेला असल्याने पुढच्या वर्षी प्रथेप्रमाणे पुन्हा त्याच उत्साहानिशी येईल, तेव्हा मध्यंतरातील परंपरांचा नवा साज त्या उत्साहावर चढलेला असेल. गणरायाच्या असंख्य रूपांप्रमाणेच भक्तीची रूपे नवनवे अवतार घेऊ लागली आहेत, पण त्यातून प्रकटणारा भाव मात्र तोच आहे. तो टिकून राहावा आणि त्याच भावनेतून आपल्या आराध्य देवतेची, सुखकर्ता विघ्नहर्त्याची सेवा करण्याची प्रेरणा समाजशक्तीला प्राप्त होवो, हीच त्याला निरोप देताना सर्वांची प्रार्थना आहे.

## आंतरराष्ट्रीय

# युक्रेन युद्धाच्या कक्षा वाढणार का?

**वसंत गणेश काणे**

नुकतीच बातमी आली आहे की, रशियन सैन्याला मदत करण्यासाठी चिनी भाडोत्री सैनिक युक्रेनच्या सीमेजवळ पोहोचले आहेत. रशियाचा दोस्त बेलारूसचे सैनिक आणि चिनी भाडोत्री सैनिक यांच्या एकत्रित सैनिकी सरावाला पोलंडच्या सीमेजवळ सुरुवात झाली आहे. रशिया, पोलंड आणि बेलारूस हे त्रिकूट 'ईगल ॲसॉल्ट' या नावाने ओळखले जाते. गेल्याच वर्षी बेलारूसमध्ये रशियाने काही खास प्रकारची अण्वस्त्रे आणून ठेवली होती. यावरून बेलारूसचे ॲलेक्झांडर ल्युकाशिंको आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यातील गाढ मैत्रीची कल्पना यावी.

दुसरे असे की, नेदरलॅण्डजवळ अमेरिकेची एफ-१५ विमाने आहेत. पण ती युक्रेनला किंवा आणखी कुणाला वापरायला द्यायची नाहीत, असे बंधन अमेरिकेने नेदरलॅण्डवर घातले होते. ते बंधन आता अमेरिकेने उठवल्यामुळे ती विमाने आता तातडीने युक्रेनच्या दिशेने मदतीसाठी उड्डाण भरतील. ब्रिटनेही रशियाच्या धमकीला भीक न घालता अत्याधुनिक तोफा, दारूगोळा आणि क्षेपणास्त्रे युक्रेनला पाठवायला सुरुवात केली आहे. अमेरिकेच्या हाऊसचे स्पीकर माईक जॉन्सन यांनी युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांची ठरवून भेट घेऊन युक्रेनला अमेरिका भरघोस मदत देईल, असे आश्वासन दिले. येत्या निवडणुकीत विरुद्ध पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले तर काय? हा विचार स्पीकर पदावरील माईक जॉन्सन यांनी केला नाही. यावरून डेमोक्रॅट पक्ष आणि रिपब्लिकन पक्ष यांच्या युक्रेनबाबतच्या धोरणात पराकोटीची मतभिन्नता आहे, हेही जाणवते. एप्रिल २०२४ मध्येच स्पीकर जॉन्सन यांनी युक्रेन, इस्रायल आणि तैवान यांना मदतीचे आश्वासन दिले आहे. पण ही यांच्या शत्रूंना दिलेली धमकी आहे की नियोजित तयारी, हे लगेच कळणार नाही.

युक्रेनने ब्रिटनकडून पूर्वी घेतलेल्या कर्जाचे हप्ते भरायची वेळ आली आहे. सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही प्रकारांच्या कर्जासाठी त्या त्या देशातील सरकारे एकप्रकारे हमी भरत असतात. हप्ता भरला नाही म्हणून युक्रेनला कोर्टात खेचू नका, असे आंदोलन ब्रिटनमध्ये सुरू झाले आहे. कर्जफेडीबाबत आम्हाला ६० टक्के माफी द्या, अशी युक्रेनची आग्रही विनंती आहे. २० टक्के माफी द्यायला खाजगी व सरकारी, कर्जदार तयारही आहेत. हे कर्ज घेतले तेव्हा ब्रिटनमध्ये युक्रेनची बाजू घेणारा हुजूर पक्ष सत्तेवर होता! आता भिन्न भूमिका घेणारा मजूर पक्ष सत्तेवर आहे. त्याला तेव्हाच हा आर्थिक व्यवहार फारसा मंजूर नव्हता. आता सत्तेवर असताना तर मजूर पक्षाला हा व्यवहार मंजूर असण्याचा प्रश्नच नाही. पण ब्रिटिश जनमत युक्रेनच्या बाजूने ठामपणे उभे आहे. म्हणजे ब्रिटनमध्ये युक्रेनप्रकरणी जनमत आणि सत्ताधारी पक्ष यात १८० अंशाचा दुभंग दिसतो आहे. रशियाही स्वस्थ बसलेला नाही. आवश्यकता पडल्यास रशियाला आपल्या न्यूक्लिअर सिद्धांतात बदल करणे भाग पडेल, असे रशियाने म्हटले आहे. पाश्चात्त्य राष्ट्रे युद्ध क्षेत्र वाढविण्याच्या खटाटोपात दिसताहेत, असे रशियाचे म्हणणे आहे. शत्रूने आमच्यावर अण्वस्त्रांनी हल्ला केला किंवा पारंपरिक शस्त्रे वापरून आमच्या अस्तित्वावरच घाला घातला तर आम्हाला स्वस्थ बसणे अशक्य होईल.

याचवेळी युक्रेनने रणनीतीत बदल करीत रशियावर प्रत्याक्रमण करीत खोलवर ड्रोन हल्ले करून मॉस्कोपर्यंत मजल मारली आहे. तेलशुद्धी कारखाने आणि वीजपुरवठा केंद्रांना युक्रेनने आपले लक्ष्य केल्याचे दिसते आहे. इकडे काही नाटो राष्ट्रांतही वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे डागून रशियाला विव्हळ करण्याची ही नामी संधी नाटो राष्ट्रांनी सोडू नये, या विचाराचे ते आहेत. अत्याधुनिक तोफा, दारूगोळा आणि क्षेपणास्त्रे शिवाय जोडीला एफ-१६ विमाने यांच्या माऱ्यासमोर रशियन क्षेपणास्त्रे आणि ड्रोन टिकू शकत नाहीत, हे पाहून युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांचा आत्मविश्वास वाढला आहे. यावर सणसणीत उत्तर देत रशियाने कीवमधील पाण्याचे साठे पार जमीनदोस्त केले आहेत.

आज ना उद्या शांततेसाठीच्या वाटाघाटी सुरू होतील. त्यावेळी आपलाच पक्ष वरचढ ठरावा, या भूमिकेतून रशिया व युक्रेन यांचे एकमेकांवर हल्ले सुरू आहेत, असे मानणाराही एक आंतरराष्ट्रीय गट सध्या क्रियाशील आहे. एका युक्रेनियन महिलेने उपस्थित केलेला प्रश्न आज अनेकांचे लक्ष वेधून घेतो आहे. शांतता कुणाला नको आहे हो? बट, वुई वाँट पीस विथ जस्टिस. शांततेसोबत न्याय नसेल तर शांतता काय कामाची? आमच्या देशाचा बळकावलेला हिस्सा आम्ही सोडणार नाही. आमची लोकशाही, आमची मूल्ये आणि आमचे स्वातंत्र्य यांची किंमत मोजून मिळणारी शांतता आम्हाला नको आहे. झेलेन्स्की आणि मोदी यांच्यातील चर्चा सुरुवातीला अर्धा तास चालावी, असे ठरले असताना ती पुढे चांगली अडीच तास लांबली, याची नोंद राजकीय निरीक्षकांनी घेतली आहे.

सध्या हेरगिरीवरही रशियाचा विशेष भर असून त्यासाठी बेलुगा जातीच्या व्हेलमाशाला रशियन गुप्तहेर खात्याने कामास जुंपले आहे, असा नॉर्वे सरकारचा अंदाज आहे. या माशाला नॉर्वेकरांनी 'व्हॅलादिमिर' हे पुतिनचे नावच टोपणनाव म्हणून दिले आहे. गळ्याभोवती असलेल्या पट्ट्यामुळे व शरीरावरील अन्य सामग्रीमुळे हा हेरगिरीचा प्रकार असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या सर्व प्रकरणी चीनची भूमिका द्विधाभावाची (ॲंबिव्हॅलंट) होती. आम्हाला गृहीत धरू नका, असे तर चीनला रशियाला सुचवावयाचे नसेल ना? कारण जो चीन युक्रेनला नाटोत समाविष्ट करून घेण्याच्या नाटोच्या विस्तारवादाचा निषेध करतो, तोच चीन त्यामुळे रशियाला युद्ध करणे भाग पडले, असे म्हणत रशियाचे धोरण योग्य ठरवतो आहे. त्याचवेळी युक्रेनचा आपला देश एकसंध ठेवण्याच्या भूमिकेचा सर्वांनी आदर केला पाहिजे, असेही चीन नमूद करतो. आक्रमण केले म्हणून चीनने रशियाचा निषेध केलेला नाही आणि मतदानाच्यावेळी युनोच्या सभेत कुणाच्याही बाजूने मतदान करण्यास नकार दिला. चीनने अमेरिकादी राष्ट्रांनी रशियावर टाकलेल्या आर्थिक बंधनांचा निषेध केला, पण चिनी कंपन्यांनी मात्र बंधनांचे पालन करीत अमेरिकादी राष्ट्रांचा रोष ओढवून घेण्याचे टाळले. चीनने तयार केलेले ड्रोन्स रशिया आणि युक्रेन हे दोन्ही पक्ष वापरत आहेत, याचीही नोंद त्रयस्थांनी घेतली आहे तसेच चीनमधून निर्यात करण्यात येणारे यंत्रांचे अनेक घटक ड्युएल यूज टेक्नॉलॉजी स्वरूपाचे असत. म्हणजे एकच अवजार शस्त्रदुरुस्तीसाठी तसेच अन्य व्यापारी वस्तूंच्या दुरुस्तीतही उपयोगात आणता येत असे. चीनने रशिया आणि युक्रेन यात तडजोड घडवून आणण्याचे निदान वरकरणी तरी प्रयत्न केले आहेत, असे म्हटले जाते. प्रत्यक्ष रणांगणावर रशियाची बाजू अधिक पक्की व्हावी, यासाठी ड्युएल यूज टेक्नॉलॉजीचा रशियाला बऱ्यापैकी फायदा झालेला दिसतो. अजूनतरी युक्रेनमध्ये घुसण्यासाठी आवश्यक असलेली घातक हत्यारे/शस्त्रे चीनने रशियाला पुरवल्याचे पुरावे मिळालेले नाहीत. पण तंत्रज्ञानविषयक माहिती आणि शस्त्रे दुरुस्त करण्यासाठी आवश्यक असलेली साधने/अवजारे (टूल्स) चीनकडून रशियाला मिळाली आहेत, हे मात्र नक्की आहे.

दरम्यान, एक वृत्त असेही आहे की, भारत युक्रेनमध्ये शांतता स्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत असून या प्रयत्नांना यश येईल अशी चिन्हेही दिसतातहेत. कहानी में ट्विस्ट?

९४२२८०४४३०

## वेध

# श्राद्ध आणि श्रद्धा

**चंद्रकांत लोहाणा**

भारतीय पुरातन शास्त्र आणि संस्कृतीनुसार श्राद्ध पक्षाला विशेष महत्त्व आहे. तिथीनुसार यावर्षी बुधवार, १८ सप्टेंबर भाद्रपद कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेपासून महालय श्राद्धास सुरुवात आहे. यास 'पितृपक्ष' असेही संबोधले जाते. भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाच्या प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत प्रतिदिन महालय श्राद्ध करावे, असे शास्त्रवचन आहे. परंतु, हे शक्य नसल्यास ज्या तिथीला घरामधील ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला असेल त्या दिवशीही महालय श्राद्ध करण्याचा परिपाठ आहे. भारतीय संस्कृतीमध्ये कृतज्ञता मानणे यास खूप महत्त्व आहे. हीच आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. याच संकल्पनेतून देव, पितृ, ऋषी, गुरू या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य ठरते. त्यामुळे रोज देवपूजा, ऋषिपूजन, पितृतर्पण व पंच महायज्ञाचे प्रयोजन आपल्या पुरातन भारतामध्ये केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून रोज पितृयज्ञ व कावळ्यास घास द्यावा, असे सांगितले आहे. एवढे करूनही आपण पितृऋणामधून मुक्त होत नसल्याने शास्त्रामध्ये श्राद्धविधीची योजना केली आहे. 'श्रद्धाया क्रियते यत् तत् श्राद्धय' अशी श्राद्ध या शब्दाची व्याख्या केली गेली आहे. आपल्या पुरातन संस्कृतीमध्ये वर्षभर अनेक श्राद्धकर्मे सांगितली आहेत. वर्षभर ही श्राद्धकर्मे जरी शक्य नसली, तरी एका वर्षामध्ये वर्षश्राद्ध आणि महालय श्राद्ध सहज करता येतात. वर्षश्राद्ध आई-वडील वा इतर कोणी मृत असतील तर ते त्यांच्यापुरते मर्यादित असते. परंतु, महालय श्राद्ध सर्व पितरांना उद्देशून असल्याने हे श्राद्ध केलेच पाहिजे, असाही एक नियम आहे. आपल्या संस्कृतीमध्ये पितरांना मंगल कार्यामध्येही फार मोठे स्थान दिले गेले आहे. सर्व मंगल कार्य व अनुष्ठानामध्येही श्राद्ध केले जाते. त्यास 'नांदी श्राद्ध' असे म्हणतात. महालय श्राद्धाचा मुख्य काळ भाद्रपद कृष्ण प्रतिपदेपासून अमावास्येपर्यंत असतो. यास 'पितरांचा अपरान्ह काळ' असेही म्हटले जाते. आपले एक वर्ष म्हणजे पितरांचा एक दिवस गणला जातो, असा समज आहे. पितृऋण फेडण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे श्राद्धविधी.



ज्या आई-वडिलांनी आपल्या सुख आणि सौभाग्यासाठी अपार कष्ट घेऊन मोठे केले, स्वतः उपाशी राहून घास भरविला अशा आई-वडिलांची आठवण आम्हास हा पितृपक्ष करून देत असतो. त्यांच्या या ऋणामधून आपल्याला या अल्प प्रयत्नाने जरी मुक्त होता येत असेल तर काय वाईट. अन्यथा जन्माला येऊनही संपूर्ण आयुष्य व्यर्थ नव्हे का? या पितृ पंधरवड्यामध्ये आपले पूर्वज सूक्ष्म रूपात पृथ्वीवर येऊन भोजनाची अपेक्षा ठेवत असतात, असा समज आहे. त्यामुळे या पंधरवड्यात पितृतर्पण आणि श्राद्धविधी अवश्य करावे. असे केल्याने पितृव्रताची पूर्तता होते. श्राद्धकर्म तिथीनुसारच का करावे, याचेही विवेचन शास्त्रामध्ये आहे. केले जाणारे प्रत्येक कार्य त्या तिथीला आणि मुहूर्ताला करणे फार महत्त्वाचे आहे. कारण या दिवशी त्या त्या घटनात्मक कर्माचे कालचक्र आणि प्रत्यक्ष घटनाक्रम, त्यामधून उत्पन्न होणारा परिणाम या सर्वांची स्पंदने एकसारखी व एकमेकांना पूरक असणे होय. प्रत्येक घटना अथवा बाब ही त्याच्या भावासहित जन्माला येते. प्रत्येक गोष्टीची परिणामकारकता ही त्याचा कर्ता, योग्य घटिका व कार्यस्थळावर अवलंबून असते. त्यामुळे कार्याची फलनिष्पत्ती होऊन कार्य करणाऱ्यास इच्छित फलप्राप्ती होते. श्राद्धकर्माची आवश्यकता आणि उपयोगिता गरुड पुराणामध्ये सांगितली आहे. परंतु, या आधुनिक युगामध्ये आम्हास सर्वच पुरातन विधीचा आणि संस्कृतीचा विसर पडला आहे. पाश्चिमात्यांच्या भौतिक सुखाच्या संस्कृतीने आमच्या परंपरागत सण आणि उत्सवामध्येही खंड पडला आहे. ही रूढ होत असलेली घातक परंपरा समाजाला अधोगतीकडे घेऊन जाणारी असतानाही आम्ही मूकदर्शक बनून त्याकडे बघतो आहोत. जगामध्ये अन्य देश या उज्ज्वल परंपरेकडे आशेने बघत असतानाही आम्ही मात्र त्याकडे हीन भावनेने बघतो, हे भारतीयांसाठी दुर्दैवच नव्हे का? भारतीय परंपरेतील प्रत्येक सण आणि उत्सव विज्ञानाशी सांगड घालून त्याची योजना केली गेली आहे, त्यामुळे ही परंपरेची उपयोगिता आजही आणि भविष्यामध्येही तेवढीच राहणार आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# दिव्यत्वाची जेथ प्रचीती, तेथे कर माझे जुळती...!

**दत्तात्रेय आंबुलकर**

५ सप्टेंबर हा माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून आपण नुकताच साजरा केला. डॉ. राधाकृष्णन् यांची विद्यार्थिदशा तेवढीच उल्लेखनीय होती. अशाच प्रकारे भारतातील अन्य प्रमुख व्यक्तिमत्त्वांचा विद्यार्थिकाळ व त्यांच्या आयुष्यातील शिकवण व औपचारिक शिक्षण आगळे-वेगळे व अनुकरणीय ठरावे.

सुरुवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, त्यांचा जन्म मद्रासजवळील तिरुतानी येथील एका मध्यमवर्गीय तेलुगू ब्राह्मण कुटुंबात झाला. डॉ. राधाकृष्णन् यांच्या वडिलांना आपल्या मुलाने पौरोहित्य करावे, असे मनापासून वाटे. त्यामुळे राधाकृष्णन् यांच्या वडिलांनी त्यांना इंग्रजी शिकण्यापासून परावृत्त करण्याचा बराच प्रयत्न केला. मात्र, बाल राधाकृष्णन् यांचा इंग्रजीकडे असणारा कल, आवड आणि प्रभुत्व पाहून त्यांच्या वडिलांनी डॉ. राधाकृष्णन् यांच्या इंग्रजी शिक्षणाला असणारा विरोध आवरता घेतला. विद्यार्थिदशेतच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनी १९११ मध्ये 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ इथिक्स'मध्ये 'दि इथिक्स ऑफ भगवद्‌गीता' या विषयावरील संशोधनपर लिखाणामुळे ब्रिटनमधील शिक्षणासाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती मिळवली व त्यांच्या शैक्षणिक प्रतिमेला नवे आयाम मिळत गेले. १९२१ मध्ये डॉ. राधाकृष्णन् यांनी तत्कालीन कोलकाता विद्यापीठाच्या जॉर्ज-५ यांच्या नावे प्रस्थापित तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुखपद भूषविले. अशाप्रकारे विद्यार्थी व शिक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी आपली छाप कायमस्वरूपी पाडल्यानेच त्यांचा जन्मदिवस भारतभर शिक्षक दिन म्हणून पाळला जातो.

**रवींद्रनाथ टागोर** : रवींद्र टागोर हे त्यांचे वडील देवेंद्रनाथ टागोर यांचे १४ वे अपत्य व सर्व भावंडांमध्ये सर्वात धाकटे. घरीच शिक्षणाची सुरुवात करणाऱ्या रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांची प्रथम काव्यरचना लिहिली, त्यावेळी त्यांचे वय होते अवघे आठ वर्षे. वयाच्या १६ व्या वर्षी 'भानुशिंगो' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित करणाऱ्या रवींद्रनाथ टागोर यांनी लंडन येथे कायद्याच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या रवींद्रनाथांनी १९०१ मध्ये सुप्रसिद्ध शांतिनिकेतनची स्थापन केली. पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी १९१५ मध्ये 'घरे-बाहिरे' या कादंबरीचे प्रकाशन केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर** : सातारा येथे प्राथमिक शिक्षण घेतलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आईच्या निधनानंतर पुढील शिक्षणासाठी मुंबईला जावे लागले. परळमध्ये चाळीच्या एका खोलीत त्यावेळी आंबेडकर कुटुंब राहात असे. अशा अत्यंत विपरीत परिस्थितीत बाबासाहेबांनी पुढील शिक्षणासाठी मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. १९१२ मध्ये बीएची पदवी घेणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बडोद्याच्या महाराजांनी विशेष शिष्यवृत्ती देऊन न्यू यॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी पाठविले. डॉ. बाबासाहेबांनी तयार केलेल्या भारतीय संविधानाच्या प्रारूपाला २६ जानेवारी १९४९ रोजी मान्यता देण्यात आली.

**श्रीगुरुजी** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजींच्या विद्यार्थी जीवनाच्या संदर्भात सांगायचे झाल्यास चौथीची परीक्षा त्यांनी नागपूर येथून नर्मदा विभागात प्रथम क्रमांक व शिष्यवृत्तीसह उत्तीर्ण केली. त्यानंतर त्यावेळच्या इंटरमिजिएट परीक्षेत इंग्रजी विषयातील पहिले पारितोषिक मिळविल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी बनारस हिंदू विद्यापीठात प्रवेश घेतला. बनारस हिंदू विद्यापीठातून प्राणिशास्त्र विषयातील एमएससी पदवी त्यांनी प्रथम क्रमांकासह उत्तीर्ण केल्यावर मद्रास येथील मत्स्यालयात संशोधन केले. त्यानंतर बनारस हिंदू विद्यापीठात प्राध्यापक म्हणूनही काम केले. बनारस हिंदू विद्यापीठातून नागपूरला आल्यावर त्यांचा संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांच्याशी संपर्क आला. डॉ. हेडगेवार यांच्या निधनानंतर श्रीगुरुजी १९४० मध्ये संघाचे द्वितीय सरसंघचालक बनले व ही जबाबदारी त्यांनी आजन्म म्हणजेच १९७३ पर्यंत सुमारे ३३ वर्षे पाळली.

**सी. व्ही. रमण** : प्रो. सी. व्ही. रमण यांचा जन्म तिरुवन्नीकवल येथे झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी सी. व्ही. रमण यांनी शिष्यवृत्ती मिळवून प्रेसिडेंसी महाविद्यालयात प्रवेश घेऊन, वयाच्या १५ व्या वर्षी बीएची पदवी इंग्रजी व भौतिकशास्त्र हे विषय घेऊन व सुवर्ण पदकासह उत्तीर्ण केली. १६ व्या वर्षी रमण यांनी प्रयोगशाळेतील त्यांच्या प्रयोगांवर आधारित संशोधनपर लेख प्रकाशित केला. १९०६ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी सी. व्ही. रमण यांनी एमएची पात्रता पूर्ण केली. भौतिकशास्त्रातील विशेष संशोधनापोटी रमण यांना नोबल पारितोषिक प्राप्त झाले.

**होमी जहांगीर भाभा** : डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्म १९०९ मध्ये मुंबईमध्ये झाला. मुळातच त्यांच्या घरी देशभक्तीचे वातावरण होते. वयाच्या १५ व्या वर्षी होमी भाभा यांनी सीनिअर केंब्रिज परीक्षा उत्तीर्ण केली. १९२६ मध्ये त्यांनी केंब्रिज येथे आपल्या शिक्षणाची सुरुवात केली. त्यांना भौतिकशास्त्रात विशेष रुची होती. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांनी आयसॅक न्यूटन शिष्यवृत्तीसह पीएच. डी. करण्याची संधी मिळाली. १९३९ मध्ये भारतात परत आल्यानंतर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स बंगळुरू येथे डॉ. सी. व्ही. रमण यांच्यासह काम केल्यानंतर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च व अणुऊर्जा आयोगाची स्थापना करून देशांतर्गत संशोधन क्षेत्रात महनीय योगदान दिले.

**व्हर्गिस कुरियन** : एका आजोबांनी आपल्या नातवाला लिहिलेल्या पत्रात नमूद केले होते की, मी धातुशास्त्र विषयात शिक्षण घेऊन एखाद्या मोठ्या कंपनीचा मुख्याधिकारी झालो असतो. मात्र, मला माझ्या मनापासून असे वाटले की, मी गुजरातच्या आणंद जिल्ह्यात येऊन अधिक महत्त्वाचे काम करू शकतो. पत्र लिहिणाऱ्या या आजोबांचे नाव होते व्हर्गिस कुरियन; ज्यांना आज आणंद आणि अर्थातच अमूलमुळे भारतातील श्वेतक्रांतीचे प्रणेते मानले जाते. व्हर्गिस कुरियन यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९२१ रोजी केरळच्या कोझिकोड येथे झाला. त्यांचे वडील कोची येथे सरकारी सेवेत होते. कुरियन यांनी १९४० मध्ये मद्रासच्या लोयला महाविद्यालयातून भौतिकशास्त्रासह पदवी तर १९४६ मध्ये जमशेदपूरच्या टाटा स्टील टेक्निकल इन्स्टिट्यूटमधील पदवी घेतली. त्यानंतर १९४९ मध्ये त्यांनी अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातून धातुशास्त्र विषयातील उच्च शिक्षण घेतल्यावर त्यांना ग्रामीण भागात काही काळ काम करायचे असल्याने एक डेअरी इंजिनीअर म्हणून व्हर्गिस कुरियन गुजरातच्या आणंद येथे आले. त्यांचे मन आणंद येथे रमत नसे. पण, आणंदच्या कैरा जिल्हा दुग्धोत्पादक संघाची तेथील खाजगी दुग्धोत्पादकांशी सुरू असणारी स्पर्धा व त्यामध्ये दुग्धोत्पादक शेतकऱ्यांची होणारी परवड पाहून अमूलचा जन्म झाला.

वरील निवडक उदाहरणांद्वारे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरांवर विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या विविध क्षेत्रांतील महापुरुषांचे शालेय जीवन व त्यांचे शिक्षण-संस्कार व त्याचा त्यांच्या भावी जीवनावर पडलेला प्रभाव या बाबी स्पष्ट होतात.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### लोकसभेचे विरोधी पक्षनेता खरेच 'विरोधी'

संविधानाचे पुस्तक डोक्यावर घेऊन अख्खा निवडणूक प्रचार केला. सर्व विरोधक एकवटले तेव्हा कुठे शंभरीच्यावर पोहोचले. त्यात शंभरीही गाठू न शकणाऱ्या काँग्रेसला कोणी तरी कानात सांगितले की, हे खूपच मोठे यश आहे. झाले, त्या यशाचाच डांगोरा पिटून काँग्रेस स्वतःची कॉलर टाईट करत आहे. बरे निवडणुकीत विरोध असतोच, मोदींच्या विचारसरणीशी ज्याला जुळवता येत नाही तो त्यांचा विरोधक होतोच आणि यालाच आपण सशक्त लोकशाही म्हणतो. परंतु या सशक्त लोकशाहीतील विरोधी पक्ष हा मानसिक अशक्तच जास्त झालेला दिसतो. एका धर्माच्या मतांसाठी आपण कुठेतरी देशाचाच विरोध करीत आहोत हेही त्यांच्या लक्षात येत नाही. उच्च प्रशासकीय पदाची काही गरिमा असते हे त्यांच्या सल्लागारांनी त्यांना सांगितलेले दिसत नाही अन्यथा भारतात लोकशाही कमकुवत, न्यायालय अन्यायकारक, अल्पसंख्यकांवर अत्याचार, जिकडे तिकडे महागाई, बेरोजगारी, गरिबी, महिलांवर अत्याचार आणि बरेच काही राहुल गांधी अमेरिकेच्या धरतीवर बोलून गेले. अर्थात् सॅम पित्रोदा नावाचे प्रेमनाथ या सिनेमात होतेच. अशावेळी बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराच्या प्रश्नाला भर पत्रपरिषदेत एका मोठ्या पत्रकाराला मारहाण व खोलीत बंद करण्यात आले होते. म्हणजे हिंदूंवरील अत्याचारावर यांना बोलायचे नाही. कुठेतरी वाचण्यात आले होते की इंदिरा गांधींनाही विरोधी पक्षाने सत्तेवर आल्यानंतर तुरुंगात टाकले होते. त्यावर अमेरिकेत त्यांना विचारले होते की, तुरुंगात तुम्हाला कसे वाटले? त्यावर इंदिरा गांधींचे उत्तर होते, "मी माझ्या देशाचे चांगलेच सांगणार, वाईट सांगणार नाही." ही प्रगल्भता यांच्या डीएनएमध्ये का नाही? चुकीने अशा लोकांच्या हाती सत्ता जाऊ नये एवढीच इच्छा.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### आता वेळ आली उत्तर देण्याची!

वैदिक धर्म आणि हिंदू संस्कृतीला नेहमीच डावलले जाते. तशाच प्रकारचा जावईशोध घेऊन अक्कल पाजळलेली दिसते. पृथ्वीच्या निर्मितीपासून वैदिक धर्माचा इतिहास भारतात आढळून येतो. भागवत कथेत याचा स्पष्ट उल्लेख आहे. भागवत कथेमध्ये १००० चतुर्युग असा अनेकदा उल्लेख आढळतो. भागवत कथेचा नीट अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येईल की इतिहासाची सुरवात भारतापासून झाली. भगवंताचे २४ अवतार झालेत. अहल्येचा उद्धार श्रीराम यांनी केला. उद्धारापूर्वी गौतम ऋषी आणि अहल्या ही कथा ६०,००० वर्षांपूर्वीची होती. रावणाचे आयुष्य १,००,००० वर्षांपेक्षा जास्त होते. भगवंताचे चोवीसही अवतार भारतातच झालेत, यात शंका नाही. पूर्वी या भूभागाला जम्बुद्वीप असे संबोधले जायचे. या देशाच्या सीमा फार दूरपर्यंत पसरलेल्या होत्या. आमच्या चुकांमुळे त्या कमी होत गेल्या. आमच्या अतिसहिष्णुतेमुळे आम्ही संपणार, असे दिसते. सर्व प्रकारे आठही दिशांनी आमच्यावर वार होत आहे. आता वेळ आली आहे. साम, दाम, दंड, भेद सर्व प्रकारे उत्तर दिले पाहिजे.

**जयंत ओक**/९७६४६४८३८३

### व्यर्थ अपेक्षा

रविवार, १५ सप्टेंबरच्या अंकात 'माणुसकी, लोकशाही मूल्ये जपण्याची अपेक्षा व्यर्थच' यावर कारणमीमांसा मांडताना वर्तमान भारतातील सामाजिक व्यथा आणि राजकीय शिरजोरी ही देशाला पतनाकडे नेणारे एक वास्तव आहे. लोकशाहीचा उदोउदो करणारे मूठभर नेते करोडो लोकांच्या हालअपेष्ठेस कारणीभूत ठरत असतील तर नवी क्रांती घडवून आणण्याची जोखीम कोण घेणार? कदाचित यातून गृहयुद्ध तर होणार नाही? तसे म्हटले तर वेगवेगळ्या राज्यांमध्ये गृहयुद्ध सुरूही झाले आहे. परंतु, याची वाच्यता राजकीय आणि माध्यमांच्या स्तरावरून का करण्यात येत नाही हेच लोकशाहीचे अवमूल्यन सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे. या देशात आता मार्शल लॉची किमान तीन वर्षे गरज आहे, जे नेताजी सुभाषचंद्र बोस स्वयंघोषित 'सदर-ए- हिंदुस्थान' यांची राजकीय संकल्पना होती! भारत देश आता संरक्षण व्यवस्थेत निपुण आहे. त्याचा उपयोग देशद्रोही कारवाया समूळ नष्ट करण्यासाठी नको का करायला?

**वि. ल. उईके**/८३७५५२८०१६

### काँग्रेस देशभक्ती दाखवेल का ?

काँग्रेस पक्षाने आज आपला पक्ष कुठे चालला आहे याचा विचार करावा. नाही केला तर पक्षाची फजिती होईल व अस्तित्वही नष्ट होईल. आपण ज्याला पक्षाचा नेता म्हणतो ते राहुल गांधी खरोखरच नेते म्हणून लायक आहे का? या प्रश्नाचा शंभर वेळा विचार करावा. काँग्रेस पक्ष जर खरोखरच देशभक्त असेल तर परदेशात जाऊन स्वतःच्या देशाची बदनामी त्यांच्या नेत्याने केलीच नसती. पक्षाच्या एकाही नेत्याला खेद देखील वाटला नाही. देश सर्वात मोठा आहे नंतर राजकीय पक्ष आहेत. भारतीय माणूस भारताची बदनामी करतो याचा जाब जनतेने विचारलाच पाहीजे. एका दृष्टीने हा देशद्रोहच आहे. काँग्रेस पक्षात खरोखरच लोकशाही असेल तर राहुल गांधींना विरोधी पक्षनेते पदावरून कमी केले पाहिजे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### जुळे सोलापुर मंगल विहार अपार्टमेंटमध्ये गणेशोत्सवानिमित्त ३० जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

जुळे सोलापूरमधील मंगल विहार अपार्टमेंटमध्ये गणेश उत्सवानिमित्त दमाणी ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान शिबिराचे तीस जणांनी रक्तदान केले. त्यामध्ये महिलाही सहभागी झाल्या होत्या.त्याचबरोबर श्रमदान, वृक्षारोपण, पारंपरिक कला जोपासली जावी म्हणून महिलांचे व मुलींचे लेझीम पथक यासारखे अनेक वेगवेगळे उपक्रम, स्पर्धाचे ही आयोजन केले होते. मंडळाचे अध्यक्ष श्रीशैल कोळी, उपाध्यक्ष कपिल पाटील. सोसायटीचे चेअरमन मधुकर कांबळे, व्हॉइस चेअरमन सतिश बोन्द्रे, अप्पाराव पांढरे, नरेंद्र कुलकर्णी, शुभम गोखले यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले

**रक्तदाते असे :** व्यंकटेश महिंद्रकर, प्रविण कोरके, सुशांत देशपांडे, अनिल सूर्यवाड, शंकर माळी, रविकांत खुंटे, विकास झा, नागेश कडगंची, अविनाश गोरे, ज्योती गोरे, सतीश बोन्द्रे, वनिता बोन्द्रे, राजेश्वर संधिकर, श्रीशैल कोळी, सिद्धेश उटगे, कपिल पाटील, सानिका सुरवसे, आप्पाशा पाचंगे, विशाल म डके पाटील, वैभव बंडगर, सुशील मोहोळकर, आदित्य बाणूर, विनायक बाणूर, मधुकर कांबळे, शशिकला कांबळे, विजय गोरे, विराज गोरे. स्वप्नील कुलकर्णी.



### ओम शांती मंडळाच्या मोफत आरोग्य शिबिरात १२५ रुग्णांची तपासणी

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

ओम शांती ओम तरुण मित्र मंडळ सरवदे नगर येथे गणेश महोत्सव निमित्त संकल्प मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिर आयोजित केले होते. या आरोग्यसेवेसाठी संकल्प मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलयांच्या पुढीलपैकी स्टाफ उपस्थित राहून आपली सेवा दिली आहे. डॉ. मानसी पाटील, डॉ. राज शेख, डॉ. यशवंत बनने, दत्ता शिंदे, अभिजीत देशमुख, श्रीशैल माळी, राकेश पोद्दार आदी उपस्थित होते.या शिबिरात १२५ पेक्षा जास्त रुग्णांचे तपासणी करून त्यांना औषधे देण्यात आले. हे आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आधारस्तंभ अनंत चव्हाण, मंडळाचे संस्थापक अंबरीश कल्लेवड, खजिनदार मांतेश्वर चंनाळी, उत्सव अध्यक्ष भागांना बिराजदार, उत्सव उपाध्यक्ष नागनाथ बिराजदार, तसेच मंडळाचे कार्यकर्ते अनिल कुदरे, सिद्धाराम अजगुंडे, जगदीश चंनाळी, सिद्धराम चंनाळी, बापू मस्के, सचिन कुदरे,सोमनाथ अजगुंडे, गणेश साळुंखे, प्रशांत कोळी, शिवा बोरगावकर, प्रथमेश हुंडेकरी, सागर कोळी, प्रशांत जमादार यांनी सहकार्य केले.

### सायली जवळकोटे यांचे निधन

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**



येथील रहिवासी सायली सचिन जवळकोटे (वय ५४) यांचे सोमवारी हृदयविकाराच्या धक्क्याने खासगी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी वीरशैव लिंगायत रुद्रभूमी रूपभावानी रोड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्येष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून, जावई आणि दोन नातवंडे असा परिवार आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी मौजे मंद्रूप येथिल शेतजमिन गट नं. ७६१/१ यांचे एकुण क्षेत्र ०२ हेक्टर ८० आर, पोट खराब क्षेत्र ०.०३ आर आकार रु १ = ६५ पैसे याची चतुः सिमा पूर्वेस ओढा, पश्चिम- मंद्रुप- वांगी रस्ता, उत्तरेस- साठे यांची शेतजमिन व दक्षिणेस शिवाजी साठे यांची शेतजमीन येणेप्रमाणे क्षेत्र जमीन.

ज्या अर्थी, दशरथ मळसिध्द सारोळे व त्यांचे वारसदार- दयानंद, राजकुमार, दामाजी व तसेच गजानन (मयत) यांचे वारसदार अंजना, बालाजी यांनी अपर तहसिल कार्यालय मंद्रुप येथे वर नमूद शेतजमिनीचे कलम ८५ नुसार वाटप होवुन मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी जर कोणास वरील अर्जदार व वारसदार यांच्या दरम्यान वाटप करून देण्यासबंधी काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०८ दिवसांचे आत मे. अपर तहसिलदार मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर यांचेकडे लेखी हरकत घेणेत यावे. तसे न झाल्यास अर्जदार यांचा वाटपाचा अर्ज मंजूर करून त्यांचे दरम्यान वाटप होवून मिळेल. तद् नंतर कोणाची काही हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ही नोटिस दिली ता. १६/०९/२०२४

सही/-
**अॅड. जयराम शरणप्पा उटगीकर**
मु.पो. मंद्रुप, ता.द. सोलापूर जि. सोलापूर
पिन - ४१३२२१.
मो.नं. ८८०५८००५३९

# खा. शरद पवार, आ. रामराजे निंबाळकर यांच्यावर माजी खा. निंबाळकर यांची जहरी टीका

## धनगर एसटी आरक्षणासाठी बसलेल्या उपोषणकर्त्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर , दि. १६ सप्टेंबर-**

राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार हे जातीयवाद करीत आहेत. तर आ. रामराजे निंबाळकर हे फलटण परिसरात दहशवाद पसरवित असल्याची जहरी टीका माढा लोकसभा मतदार संघाचे माजी खा. रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांनी पंढरपुरात केली.

पंढरपूर येथे धनगर समाजास एसटी प्रवर्गातून आरक्षण अमंलबजावणीसाठी आमरण उपोषणास बसलेल्या आंदोलनकर्त्यांच्या प्रकृतीची त्यांनी चौकशी केली.

माजी खा. नाईक-निंबाळकर म्हणाले, धनगर समाज हा दऱ्या-खोऱ्या फिरणारा समाज असून त्यांना घटनेनुसार आरक्षण मिळाले पाहिजे. मीही लोकसभेत यावर आवाज उठविला होता. उपोषणास बसलेले माझे सहकारी बांधव असून त्यांची ही न्यायाची भुमिका असून, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटून घेवून या धनगर प्रवर्गागाच्या आरक्षणाबाबत बोलणार असून आंदोलन लवकरच स्थगित करण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे.



ते पुढे म्हणाले, आ.रामराजे निंबाळकर यांच्या डोक्यावर परिणाम झाला असून ते गावगुंडांना घेऊन फिरत आहेत. फलटण तालुक्यात ते दहशत पसरवित आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खा. शरद पवार हे जातीयवादी असून लोकसभा निवडणुकीत निगेटिव्ह मेसेज समाजात पसरविण्याचे काम त्यांनी केले आहे.

तर उपमुख्यमंत्री फडवणीस यांना बदनाम करण्याचे काम केले आहे. गेल्या ५० वर्षापासून राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते शरद पवार हे राजकारण करत आहेत. मात्र, त्यांनी धनगर, मराठा समाजाला आरक्षण दिले नाही, राजकारणात या दोन समाजाचा ते वापर करून घेत असल्याचे दिसून येत आहे.

ते पुढे म्हणाले, मात्र आगामी विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी आता सुरू झाली आहे. त्यामुळे माढा लोकसभा मतदार संघात पुन्हा जोमाने सक्रिय झालो असून, मतदाराच्या गाठीभेटी घेणे सुरू केले आहे. खासदारकीच्या कार्यकाळात माढा लोकसभा मतदार संघात आपण अनेक विकास कामे केली आहेत. काही योजना रखडल्या आहेत. त्या योजना पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी आणून त्या योजना पुर्ण करणार आहे, असे ही माजी खासदार नाईक-निंबाळकर यांनी यावेळी सांगितले.

# तामलवाडीत रात्रीच्या वेळी ड्रोनच्या घिरट्या

## नागरिकांत भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**



तुळजापूर तालुक्यातील तामलवाडीत शिवरत्ननगर येथील घोटकर गल्ली परिसरात गेल्या रात्रीच्या वेळी ड्रोन घिरट्या घालत असल्याने तेथील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन भीतीचे वातावरण पसरले आहे.

तामलवाडी येथील शिवरत्न नगरच्या, घोटकर गल्ली परिसरात रात्रीच्या वेळी ड्रोन घिरट्या घालत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे तेथील नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली असून, भीतीचे वातावरण पसरले आहे. हा ड्रोन चोरी करण्याच्या उद्देशाने तर फिरवला जात नाही ना? हा ड्रोन रात्रीच्या वेळेस गावातील काही भागातच कशासाठी उडवला जातोय, या मागचा नेमका हेतू काय? असे अनेक प्रश्न नागरिकांना पडत आहेत. याबाबत तामलवाडी पोलिसांना नागरिकांनी माहिती देताच काही पोलिसांनी येवून पाहणी केली मात्र तोवर हा ड्रोन दूरवर निघून गेला होता. हा ड्रोन गेल्या तीन दिवसांपासून फिरत असल्याने नागरीकांमध्ये वेगवेगळ्या चर्चा होताना दिसत आहेत. हा ड्रोन नेमकं रात्रीच्या वेळेसच कोण उडवतय? रात्रीच्या वेळीच ड्रोन घिरट्या घालत असल्याने नागरीकांमध्ये वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले असून, घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा ड्रोन कशासाठी रात्रीच्या वेळी घिरट्या घालत आहे, याचा शोध पोलिसांनी घेऊन रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या ड्रोनमुळे नागरीकांमध्ये जी संभ्रम अवस्था निर्माण होऊन भितीचे वातावरण पसरले त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही जाणकार नागरिकांमधून होत आहे.

### व्यवहार रद्द झाल्याबाबतची जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. संतोष रामदास दुबास, रा.१८४९, दाजीपेठ, सोलापूर यांनी सांगीतलेवरुन, तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१. मिळकतीचे वर्णन :-

डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी येथील गट नं.५४० यापैकी नियोजित धर्मा नगर या नांबाने ओळखल्या जाणाऱ्या मधील प्लॉट नं.५ याचे क्षेत्र ५१२ चौ.मी. अथवा ५५०९ चौ.फुट इतके होतात.यासी चतुःसिमा :-

पुर्वेस :- प्लॉट नं. ६ — पश्चिमेस :- रस्ता
दक्षिणेस :- ओपन जागा — उत्तरेस:- सोलापूर ते अक्कलकोट रस्ता

२. वर नमूद कलम १ मधील मिळकत आमचे अशिल श्री संतोष रामदास दुबास यांच मालकी व कब्जेबहिवाटीची आहे. सदर मिळकतीच्या विक्री बाबत श्री. शेषकुमार भरतकुमार शालगर रा.सोलापूर यांचेशी व्यवहार ठरलेला होता. ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे मुदतीत कराराप्रमाणे रक्कम श्री. शेषकुमार भरतकुमार शालगर यांनी देऊन खरेदीखत करुन घेतलेली नाही. त्यामुळे उभयतांत ठरलेला व्यवहार रद्द झालेला आहे. त्यामुळे मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध श्री. शेषकुमार भरतकुमार शालगर यांचा राहिलेला नाही.

ही व्यवहार रद्द बाबतची जाहिर नोटीस दिली. दि.१६/०९/२०२४

सही/-
अशिल : संतोष दुबास, यांचे तर्फे
**अॅड. राजरतन द. श्रीराम**
ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर ४१३००५
मो.नं. ९८८१२४०५१६

# कॉ. सीताराम येचुरी यांना सर्वपक्षीय नेत्यांनी वाहिली आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे राष्ट्रीय महासचिव माजी खासदार कॉ. सीताराम येचुरी यांचे गुरुवार, १२ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता दिल्ली येथील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. कॉ. सीताराम येचुरी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवार, १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता लाल बावटा कार्यालय, दत्त नगर येथे सर्व पक्षीय शोकसभा पार पडली.

यावेळी प्रजा नाट्य मंडळ कला पथकाच्या वतीने शाहिरांनी कॉ. सीताराम येचुरी यांच्या जीवन चरित्र गाण्याच्या रूपाने सादर केले. तत्पुर्वी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे येचुरी यांच्या सोबतच्या आठवणीना उजाळा देताना म्हणाले की, देशातील लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्ष तत्वांसाठी प्राण पणाला लावणारा महान प्रतिभावंत मार्क्सवादी कॉ. सीताराम येचुरी यांच्या निधनाने काँग्रेस, माकपसह डाव्या पक्षांची मोठी हानी झाली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे अॅड. यु. एन. बेरिया, सुधीर खरटमल, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख प्रा. अजय दासरी, भाकपचे प्रा. तानाजी ठोंबरे, अॅड. रा. गो. म्हेत्रस, समाजवादी पक्षाचे अबूतालिब डोंगरे, जनरल कामगार युनियनचे नेते साथी बशीर शेख, कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे नेते कॉ. अशोक इंदापुरे, इतिहासाचे अभ्यासक पत्रकार सर्फराज अहेमद, सामाजिक कार्यकर्ते रियाज सय्यद आदी विविध राजकीय पक्षाचे संघटनेच्या नेत्यांनीही मनोगत व्यक्त केले.



> कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे राष्ट्रीय महासचिव, माजी खासदार कॉ. सीताराम येचुरी हे मार्क्सवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांना पोरके करून गेले. त्यामुळे पक्षाची कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झालेली आहे. ही पोकळी भरून काढण्यासाठी त्यांनी आम्हाला दाखवलेला लोकशाही क्रांतीचा मार्ग आणि मार्क्सवाद-लेनिनवाद जनमानसात रुजविण्यासाठी या देहातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत वर्ग संघर्षासाठी लढत राहणे आणि लढता लढता शहीद होणे हीच खरी श्रध्दांजली असेल.
>
> **- माजी आमदार कॉ. नरसय्या आडम**

शोक सभेचे प्रास्ताविक पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. एम.एच.शेख यांनी केले. सूत्रसंचालन कॉ.अनिल वासम यांनी केले.

यावेळी चेतन नरोटे, सुरेश हसापुरे, अंबादास तडकापल्ली, प्रवीण मत्सूद, प्रा. दत्ता घोलप, ए.बी.कुलकर्णी, माकपाचे सचिव मंडळ सदस्य कॉ. नसीमा शेख, नलिनीताई कलबुर्गी, कॉ. युसुफ शेख (मेजर), कॉ. व्यंकटेश कोंगारी, कॉ. शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला,रंगप्पा म रेड्डी, प्रा. अब्राहम कुमार, कामिनिताई आडम आदींसह कार्यकर्ते शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| | १) तिकीट सुपरवायझर (१७३६ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | १३/१०/२४ |
| | २) ट्रेन मॅनेजर (३१४४ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | |
| | ३) स्टेशन मास्तर (९९४ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | |
| | ४) टायपिस्ट (१५०७ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३६ पर्यंत | |
| | ५) वरिष्ठ लिपीक (७३२ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३६ पर्यंत | |
| २) | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| | कॉन्स्टेबल GD (३९४८१ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | १०/१०/२४ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्अॅपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्अॅप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ३) | **केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल GIST** | | | |
| | १) कॉन्स्टेबल (११३० पदे) | बारावी (शास्त्र) उत्तीर्ण पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३०/०९/२४ |
| ४) | **स्टेट बँक ऑफ इंडिया SBI** | | | |
| | १) सहा. प्रबंधक (७९८ पदे) | B.E./ B.Tech (कॉम्प्यु/आय टी/ इलेक्ट्रॉ/इलेक्ट्रॉ अॅन्ड टेली/MCA | ३० पर्यंत | ०४/१०/२४ |
| ५) | **दि. अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को ऑप बँक लि** | | | |
| | १) लिपीक (६८७ पदे) | पदवी (५०%) गुणवंत उत्तीर्ण व MSCIT आवश्यक | ४० पर्यंत | २७/०९/२४ |
| | २) वाहन चालक (०४ पदे) | दहावी उत्तीर्ण व LMV वाहन परवाना | ४० पर्यंत | |
| | ३) सुरक्षा रक्षक (०५ पदे) | कोणत्याही शाखेतील पदवीधर असावे | ४५ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org

## SHRIRAM HOUSING FINANCE — श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

### मागणी सूचना

**नोंदणीकृत कार्यालय:** कार्यालय क्रमांक १२३, अंगप्पा नायकन स्ट्रीट, चेन्नई-६०० ००१;
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाळे प्लाझा, डफरीनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१ **वेबसाइट:** www.shriramhousing.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार/सहकर्जदार/जामिनदार यांनी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडून वित्तीय सहाय्यता घेतली आहे. आम्ही नमूद करीत आहोत कि , वित्तीय सहाय्यता घेतल्यानंतरही कर्जदार / जामीनदारांनी देय तारखेनुसार व्याज आणि मुद्दल रक्कम जमा करण्यात कसूर केलेली आहे . भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा वितरित निर्देशन / मार्गदर्शानुसार सदर खाते नॉन -परफॉर्मिंग अॅसेट्समध्ये वर्गीकृत करण्यात आले आहे. श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारीनुसार सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ अन्यवे आणि सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ३ सहावाचिता कलम १३(२) अन्यवे प्राप्त अधिकारा अंतर्गत सरफायसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अन्यवे खाली नमूद तारखांना मागणी सूचना वितरित करण्यात आली होती आणि त्यानुसार सदर सूचना प्राप्ती तारखेपासून ६० दिवसांच्या आत रक्कम पूर्णपणे जमा होईपर्यंत प्रासंगिक खर्च , शुल्क इत्यादी आणि सदर सूचनेत नमुद रकमेवरील करारदारने पुढील व्याजासह एकत्रित सूचनेत नमूद रक्कम जमा करण्याबाबत खालील कर्जदार/जामीनदार/तारणकर्ता यांना कळविण्यात आले होते.
या प्रकाशनाद्वारे त्यांना जारी करण्यात आलेल्या नोटिसा त्यांना याद्वारे सार्वजनिक नोटीसद्वारे त्याबद्दल कळविण्यात येत आहेत.
कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्द वेळेसंदर्भात कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) ची तरतूद आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | थकबाकी रक्कम | कर्जाची रक्कम | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता |
|---|---|---|---|
| **१. श्री धनाजी चंद्रकांत गायकवाड (कर्जदार) २. श्रीमती शोभा धनाजी गायकवाड (सह-कर्जदार) 3. मंगेश धनाजी गायवाड (सहकर्जदार) दोघांचा निवासाचा पत्ता आहे: ०१, गुलमोहर पार्क, एमएसईबी कार्यालयाजवळ, मोहोळ, सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१३ येथे देखील:GAT नं.९३६/३/ए ४८, गुलमोहर पार्क, प्लॉट क्र.४८, ऑफ कुरुळ रोड, मोहोळ, सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१३** एनपीए दिनांक : ०३-०९-२०२४ मागणी सूचना दिनांक १०-०९-२०२४ | तारीख: ०६-०९-२०२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SLPHSOLR0000307 अंतर्गत रु. २३५४५१५/- (रुपये तेवीस लाख चौपन्न हजार पाचशे पंधरा फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादींसह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसारपुढील व्याजासह आणि / किंवा निर्धारित केल्यानुसार. | कर्ज क्र. SLPHSOLR0000307 कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. २२,७०,६८१ /- (रु. बावीस लाख सत्तर हजार सहाशे ऐक्याऐंशी फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, गट क्र.936/3/A, त्यापैकी प्लॉट क्र.४८, Adm.०.९९.२२ चौ.मीटर गुलमोहर पार्क, कुरुळ रोड, मोहोळ, सोलापूर महाराष्ट्र येथे स्थित-४१३२१३ खालीलप्रमाणे बांधलेले: पूर्व: रस्ता पश्चिम : भूखंड क्र.३७ दक्षिण : भूखंड क्र.४७ उत्तर : भूखंड क्र.४९ |
| **१. श्री धनाजी हरी बनसोडे (कर्जदार), २. श्रीमती सविता धनाजी बनसोडे (सह-कर्जदार), दोघांचा निवासाचा पत्ता आहे: तवशी, पंढरपूर शिंगण वस्ती, पंढरपूर महाराष्ट्र -४१३३०४ तसेच येथे: फ्लॅट क्रमांक ०७, शिवाजी अपार्टमेंट गॅट ८०/१/बी/१/ए, भूखंड क्रमांक ०९, चौथा मजला, प्रशांत प्रियकर नगर, पंढरपूर,महाराष्ट्र-४१३३०४** एनपीए दिनांक : ०३-०९-२०२४ मागणी सूचना दिनांक १०-०९-२०२४ | तारीख: ०६-०९-२०२४ रोजी कर्ज संदर्भ क्र SHLHSOLR0000342 अंतर्गत रु. १३,६३,५३३/- (रु. तेरा लाख त्रेसष्ट हजार पाचशे तेहतीस फक्त) करारानुसार पुढील व्याजासह, पूर्ण आणि अंतिम पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंत आनुषंगिक खर्च, खर्च शुल्क इत्यादींसह वरील रकमेवर SHFL/NHB/ RBI द्वारे वेळोवेळी करारानुसारपुढील व्याजासह आणि / किंवा निर्धारित केल्यानुसार. | कर्ज क्र. SHLHSOLR0000342 कर्ज वाटप केलेली रक्कम: रु. १७,३८,१३२/- (रुपये सतरा लाख अडतीस हजार एकशे बत्तीस फक्त) | स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, गट ८०/१/बी/१/ए,ले आउट प्लॅन-प्लॉट क्र.०९, Adm२७८.८१ चौरस मीटर, कोणत्या इमारतीवर "शिवाजी अपार्टमेंट" असे नाव दिले आहे आणि फ्लॅट क्र.०७, चौथा मजला, Adm.६०.३९ चौ.मी. इसबावी, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र येथे स्थित-४१३३०४ खालीलप्रमाणे बांधलेले: पूर्व: बाजूचा समास पश्चिम : फ्लॅट क्रमांक ०८ दक्षिण : बाजूचा समास उत्तर: बाजूचा समास |

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता वर नमूद कर्जदार , सहकर्जदार आणि / किंवा त्यांचे जामीनदार (जेथे लागू असेल तेथे ) यांना येथे सूचना देण्यात येत आहे कि, त्यांना सदर सूचना प्रकाशन तारखेंपासून ६० दिवसांत वर नमुद केलेली थकबाकी रक्कम तसेच पुढील व्याज व लागू शुल्क व्याज एकूण जमा करावी . अन्यथा सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ चे कलम १३(४) आणि त्यातील लागू नियमाअंतर्गत कर्जदार व तारणकर्ता यांच्या प्रतिभूत मालमत्तेचा ताबा घेण्यासह प्रतिभूत मालमत्तेचा विरोधात सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या समाप्तीनंतर पुढील कारवाई केली जाईल . **कृपया नोंद असावी कि, सदर कायद्याच्या कलम १३(१३) अन्यवे कोणत्याही कर्जदारास प्रतिभूत धनकोंच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय सूचनेत नमुद त्यांची प्रतिभूत मालमत्ता विक्री , भाडेपट्टा किंवा अन्य इतर प्रकारे हस्तांतर करता येणार नाही .**

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १७-०९-२०२४

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

## महत्त्वाचे

### श्रीलंकेचे दुनिथ, हर्षिता ठरले महिन्याचे मानकरी





**दुबई** : श्रीलंकेचे क्रिकेटपटू दुनिथ वेललागे व महिला क्रिकेटपटू हर्षिता समरविक्रमाला सोमवारी ऑगस्ट २०२४ साठी आयसीसी ऑगस्ट महिन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. वेललागेने भारताविरुद्धच्या वन-डे मालिकेत श्रीलंकेसाठी उत्कृष्ट कामगिरी केली व समरविक्रमाने आयर्लण्डविरुद्धच्या दौऱ्यात शानदार कामगिरी केली. याच महिन्यात एकाच देशातील खेळाडूंनी पुरस्कार हे पुरस्कार जिंकण्याची ही दुसरी वेळ आहे. यावर्षी जूनमध्ये महिन्यातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून जसप्रीत बुमराह व स्मृती मंधानाने हा पुरस्कार पटकावला होता. वेललागेने दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराज व वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज जेडेन सील्सयांना मागे टाकले. श्रीलंकेच्या पुरुष खेळाडूने पुरस्कार जिंकण्याची ही पाचवी वेळ आहे. यापूर्वी अँजेलो मॅथ्यूज (मे २०२२), प्रभात जयसूर्या (जुलै २०२२), वानिंदू हसरंगा (जून २०२३) आणि कामिंदु मेंडिस (मार्च २०२४) आदिंनी हा मान मिळविला होता. समरविक्रमा ही आयसीसी महिला खेळाडूचा महिन्याचा मानकरी पुरस्कार जिंकणारी श्रीलंकेची दुसरी खेळाडू आहे. कर्णधार चामारी अथापथुने या वर्षी मे-जुलैमध्ये दोन वेळा हा पुरस्कार जिंकला आहे.

### पंजाब एफसीचा केरळ ब्लास्टर्सवर २-१ ने विजय

**कोची** :इंडियन सुपर लीग (आयएसएल फुटबॉल स्पर्धेत येथील नेहरू स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात पंजाब एफसीने केरळ ब्लास्टर्सवर २-१ ने शानदार विजय नोंदविला. संघाच्या विजयात स्लोव्हेनियाच्या लुका मॅसेनने महत्त्वपूर्ण एक गोल केला. केरळ ब्लास्टर्सला स्टार मिडफिल्डर अॅड्रियन लुनाशिवाय खेळावे लागले, कारण तो आजारी आहे. सामन्याच्या अखेरच्या सात मिनिटांत सामना निकाली लागला. ८६व्या मिनिटाला पेनॉल्टीला गोलमध्ये रुपांतर करून पंजाबने आघाडी मिळवली. त्यानंतर इंज्युरी टाईममध्ये नवीन आक्रमक खेळाडू जिझस जिमेनेझने केरळ ब्लास्टर्सला बरोबरी मिळवून दिली. पण तीन मिनिटांनंतर फिलिप म्झलजाककडून मिळालेल्या पासवर मॅसेनने अचूकपणे गोल नोंदवून घरच्या चाहत्यांचा आनंद हिरावून नेल मॅसेनने गोल नोंदवत पंजाब एफसीच्या विजयावर शिक्कामोर्तब केला व पंजाबने तीन गुण मिळविले.

### उद्या राजीव गांधी स्टेडियमवर डॉजबॉल प्रशिक्षण शिबिर

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत होणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धेकरिता डॉज बॉल या खेळातील काही नवीन नियमावलीच्या बदलातील अनुषंगाने शहर व जिल्हा डॉजबॉल असोसिएशन, जिल्हा क्रीडा कार्यालय व महानगरपालिका क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने येथील राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर एक दिवसीय डॉजबॉल प्रशिक्षण शिबिराचे आयोजन बुधवारी (दि. १८) सायंकाळी पाच वाजता करण्यात आले आहे. इच्छुकांनी शरण वांगी (मो.९१४६०३२४७३) यांच्याशी संपर्क साधावा. तरी या प्रशिक्षण शिबिराचा सर्व शाळा, महाविद्यालय, खेळाडू, मार्गदर्शक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे सचिव सुदेश मालप, क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार व महापालिका क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप यांनी केले आहे.

### हिंदुस्थानी स्कूलची कंदेपल्ली हिची विभागीय योगा स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**



येथील हिंदुस्थानी कॉन्व्हेंट चर्च स्कूलची नावनीय राहुल कंदेपल्ली हिची विभागीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली. तिने शहर स्पर्धेत रिदमिक योगा प्रकारात १४ वर्षाखालील वयोगटात द्वितीय क्रमांक संपादिला. या कामगिरीवर तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला क्रीडा शिक्षक श्री बर्नार्ड अँथनी व सुहेल शेख यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य एस्टर व्ही. जेम्स, पर्यवेक्षक रवी पांडे, रुपाली उजागरे यांनी अभिनंदन केले.

# गतविजेता भारत अंतिम फेरीत

## आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी ● कोरियावर ४-१ ने विजय



भारत व कोरियादरम्यानच्या सामन्यातील चुरशीचा क्षण

◆ **हुलुनबुर, १६ सप्टेंबर**

आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेत गत विजेत्या भारतीय पुरुष हॉकी संघाने आपली विधी घोडदौड गायम राखत सोमवारी उपांत्य सामन्यात कोरियाचा ४-१ अशा गोलफरकाने पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली व सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावण्याच्या दिशेने आपली आगेकूच कायम राखली.

पहिल्या उपांत्य फेरीत पाकिस्तान व यजमान चीन यांच्यातील निर्धारित वेळेतील लढत बरोबरीत राहिल्यानंतर पेनॉल्टी शूटआऊटमध्ये चीनने पाकिस्तानचा पराभव केला. मंगळवारी अंतिम फेरीत भारताचा सामना यजमान चीनशी होणार आहे. एथनिक पार्क, हुलुनबुर येथील निसर्गरम्य मोकी हॉकी प्रशिक्षण तळावर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या उपांत्य

सामन्यात भारताला विजय मिळवून देताना पहिल्या चरणात उत्तम सिंगने १३ व्या मिनिटाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर कर्णधार हरमनप्रीत सिंगने १९ व्या मिनिटाला व ४५ व्या मिनिटाला असे दोन गोलची भर घातली. जर्मनप्रीत सिंगनेही आपल्या खेळाचे कौशल्या दाखवत ३२ व्या मिनिटाला महत्त्वपूर्ण एका गोलची भर घातली. कोरियाकडून जिहुन यांगला ३३ व्या मिनिटाला एकमेव गोल करण्यात यश मिळाले.

हरमनप्रीत सिंग, उत्तम सिंग व जर्मनप्रीत सिंगने गोल करून भारताला पुन्हा एकदा स्पर्धेची अंतिम फेरी गाठून देण्यास मोलाचा वाटा उचलला. भारतीय संघाने चेन्नई येथे गत आशिया चॅम्पियन्स चषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते.

टोकियो पाठोपाठ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय पुरुष हॉकी संघाने या स्पर्धेत पाच विजय नोंदवत स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने राऊंड रॉबिन साखळी फेरीत चीनचा ३-०, जपानचा ५-१ व मलेशियाचा ८-१ असा पराभव केला, त्यानंतर कोरियाला ३-१ आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला २-१ ने हरवले आणि शेवटचे दोन सामने कठीण होते. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने उपांत्य फेरीत प्रशंसनीय कामगिरी केली. ◂(वृत्तसंस्था)

# बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारत सज्ज

◆ **चेन्नई, १६ सप्टेंबर**

पाकिस्तानविरुद्ध ऐतिहासिक कसोटी मालिका विजयानंतर आत्मविश्वास बळावलेला बांगलादेश क्रिकेट संघ आता दोन सामन्यांच्या कसोटी मालिका व तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. उभय संघादरम्यानचा पहिला कसोटी क्रिकेट सामना १९ सप्टेंबरपासून चेन्नईच्या एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर खेळला जाणार आहे. नवीन मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघ कसून सराव करत आहे.

प्रशिक्षक म्हणून गंभीर यांच्या कारकिर्दीतला हा पहिला कसोटी सामना असेल. भारताने अलिकडच्या काळात कसोटी सामना मार्च महिन्यात घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध खेळला होता व यात रोहित शर्माच्या संघाने एक डाव व ६४ धावांनी विजय मिळवला होता.

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत वरिष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत सर्फराज खान, रजत पाटीदार, देवदत्त पडिक्कल, आकाश दीप व ध्रुव जुरेल यांच्यासह अनेक नवीन खेळाडूंनी कसोटी पदार्पण केले. आता विराट कोहलीच्या पुनरागमनामुळे के.एल. राहुल व ऋषभ पंत या नव्या खेळाडूंसाठी संधी मर्यादित आहे. केवळ सर्फराज, जुरेल व आकाशने आपले स्थान कायम राखले आहे. या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेमुळे भारताला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत आपले स्थान बळकट करण्याची संधी मिळणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई येथे भारताची कसोटी क्रिकेटमधील कामगिरी

सामने : ३४
विजय : १५
पराभव : ७
अनिर्णीत : ११
टाय : १

**शेवटचा सामना:** भारताने इंग्लंडचा ३१७ धावांनी पराभव केला (२०२१)

**सर्वोच्च धावसंख्या:** २०१६ मध्ये इंग्लंडविरुद्ध भारताचा ७ बाद ७५९ धावांवर डाव घोषित

**सर्वात कमी धावसंख्या:** १९७७ मध्ये इंग्लंडविरुद्ध भारत सर्वबाद ८३ धावा

**चिदम्बरम स्टेडियमवर सर्वाधिक कसोटी धावा काढणारे भारतीय खेळाडू**

सुनील गावस्कर (१०१८ धावा, १२ सामने), सचिन तेंडुलकर (९७० धावा, १० सामने), गुंडप्पा विश्वनाथ (१० सामने, ७८५ धावा), वीरेंद्र सेहवाग (७२९ धावा, ६ सामने), कपिल देव (७०८ धावा, ११ सामने)

**सर्वाधिक बळी टिपणारे भारतीय गोलंदाज**

अनिल कुंबळे (८ सामने, ४८ बळी), हरभजन सिंग (७ सामने, ४२ बळी), कपिल देव (११ सामने, ४० बळी), इरापल्ली प्रसन्ना (३६ सामने, १८ बळी) व बिशनसिंग बेदी (६ सामने, ३१ बळी).

# पानगल प्रशालेचा चौकार

## शालेय शहर सेपक टकरा स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

नेहरूनगर येथील जय जवान जय किसान प्रशालेच्या क्रीडांगणावर झालेल्या शालेय सेपक टकरा स्पर्धेत एम.ए.पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजने चार गटात विजेतेपद पटकाविले.

पानगलच्या संघाने १४ वर्षाखालील मुले व मुली आणि मुलांच्या १७ व १९ वर्षाखालील गटात ही कामगिरी केली.



१४ वर्षाखालील मुलांच्या अंतिम सामन्यात त्यांनी सेंट जोसेफ प्रशालेचा २-१ ने पराभव केला. १४ वर्षाखालील मुलींच्या गटात त्यांनी इप्पाकायल प्रशालेस २-0 असे हरविले. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात त्यांनी स.हि.ने. प्रशालेवर २-0 असा विजय मिळविला. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात जय जवान जय किसान सैनिकील स्कूलला २-0 असे नमविले. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात मात्र, त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. राज मेमोरियल स्कूलने त्यांना २-0 हरविले. संघास क्रीडाशिक्षक अल्ताफ सिद्दिकी, नावेद मुंशी व इक्बाल दलाल यांचे मार्गदर्शन लाभले.

संघाचे प्राचार्य डॉ. हारुन रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ. सुरैया परविन जहागीरदार, निकहत नल्लाबंदू, जाकिर शहापुरे आदींनी अभिनंदन केले.

विजेता संघ : १४ वर्षाखालील मुले : कोतकुंडे बासित, मुनशी माज, पटेल मो. मुजफ्फर, अत्तार मो.युसुफ, मोहोळकर अब्दुल रजाक. मुली : पठाण स्वलेहा, बागवान अक्सा, शेख खतिजा, शेख असीला, शेख अलीना. १७ वर्षाखालील मुले : पटेल मुजम्मिल, शेख आकीब, हन्नुरे अबू जेद, सिद्दिकी मोहम्मद मुजताबा, दलाल कामरान.१९ वर्षाखालील मुले : बागवान आयान, बागवान मोहम्मद सुफियान, कुरेशी अमीर खुसरो, पटेल अब्दुल्ला, हवालदार असदुल्ला.

उपविजयी संघ : १७ वर्षाखालील मुली : बागवान निकत, शेख फेमिदा, शेख अलमिनाज, बडेघर फलकनाज, शेख अमवाज.



# पोलीस पब्लिक, बटरफ्लाय, संगमेश्वर स्कूलची सलामी

## शालेय १४ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. १५ सप्टेंबर-**

पोलीस पब्लिक, बटरफ्लाय व संगमेश्वर स्कूलने शालेय १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेची विजयी सलामी दिली. सलामीच्या सामन्यात पोलीस पब्लिक स्कूलने स्वामी विवेकानंद प्रशालेवर, बटरफ्लाय स्कूलने हिंदुस्थान स्कूलवर, संगमेश्वर पब्लिक स्कूलने युनिक स्कूलवर विजय मिळविला.

या स्पर्धेचे उद्घाटन हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर प्रशालेचे ज्येष्ठ पर्यवेक्षक लकण्णा कमळे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी क्रीडाशिक्षक प्रमोद चुंगे, अक्षय गवळी, प्रशिक्षक प्रकाश कंपली, संदेश पवार, राजकुमार माने आदी उपस्थित होते.



### ह.दे. प्रशालेत ट्रायडेंट रोलर स्केटिंग अकॅडमीची सुरवात

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

हरिभाई देवकरण प्रशालेत आता शाळा व शाळाबाह्य मुलांना स्केटिंग शिकता यावे म्हणून ट्रायडेंट रोलर स्केटिंग अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक अक्षय गणेश रास्ते यांनी स्केटिंग क्लासेस चालू केले आहे. प्रशालेचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या सहकार्याने मुख्याध्यापिका दीपा फाटक यांच्या हस्ते अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने, भानुदास बनसोडे, आप्पासाहेब राऊत, क्रीडा शिक्षक अक्षय गवळी, प्रकाश कंपली आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राघवेंद्र पिल्ले यांनी केले. रास्ते हे स्वतः स्केटिंग खेळाडू असून त्यांनी आतापर्यंत राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीयस्तरावर स्केटिंग केले आहे. १०० किमी नॉनस्टॉप स्केटिंग ४.१८ तासांत पूर्ण करत आशियाई विक्रम केला आहे.

# बालगटात जान्हवी उबाळे, मोठ्या गटात वैशाली कडगुंटी प्रथम

## श्री सार्वजनिक मध्यवर्ती मंडळाची रन फॉर गर्ल सेफ्टी मॅरेथॉन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. १६ सप्टेंबर -**

गणेशोत्सवानिमित्त श्री सार्वजनिक मध्यवर्ती मंडळाच्यावतीने मुलींच्या संरक्षणार्थ घेण्यात आलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत बालगटातून जान्हवी उबाळे तर मोठ्या गटातून वैशाली कडगुंटी हिने प्रथम क्रमांक पटकाविला.



येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे श्रीगणेशोत्सवानिमित्त श्री दत्त चौक येथून उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर, ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे यांच्या हस्ते सोमवारी सकाळी आठ वाजता हिरवा झेंडा दाखवुन मॅरेथॉन स्पर्धेस सुरुवात झाली. महाराष्ट्राचे राज्यगीतानंतर दौडला प्रारंभ करण्यात आला. विकृत प्रवृत्तीच्या विरोधात मुलींना स्वालंब बनण्यासाठी रन फॉर गर्ल सेफ्टी या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत चारशे विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. मध्यवर्ती मंडळातर्फे घोषवाक्य लिहिलेले टी शर्ट देण्यात आले होते.

ही मॅरेथॉन दौड दत्त चौक, राजवाडे चौक, नवी पेठ, गंगा विहिर, चौपाड, मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस, चाटी गल्ली, मंगळवार पेठ पोलीस चौकी, सराफ बाजार, मधला मारुती, माणिक चौक, सोन्या मारुती, दत्त चौक मार्गे सरस्वती मंदिर येथे विसर्जित करण्यात आली.

या स्पर्धेतुन पाचवी ते सातवी गटातुन जान्हवी उबाळे हिला सायकल, मेडल व प्रशस्तिपत्र देण्यात आले तसेच सातवी ते आठवी गटातुन अनुष्का काशीद, नववी ते दहावी वैशाली कडगुंटी, पुर्वा शिंदे, वैभवी घराटे, राधिका बघेल, ऋतुजा भास्कर, तनुष्का पल्लोलु, समृध्दी जगझाप यांना मेडल व प्रशस्तिपत्र देण्यात आले.

या स्पर्धेतील विजेत्यांना माजी आमदार दिलीपराव माने यांच्या हस्ते मध्यवर्तीच्या माध्यमातून मेडल, प्रशस्तिपत्र देण्यात आलेया पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी माजी आमदार ट्रस्टी नरसिंग मेंगजी, उत्सव समिती अध्यक्ष विनायक महिंद्रकर, ट्रस्टी उपाध्यक्ष विजय पुकाळे, ट्रस्टी श्रीशैल बनशेट्टी, सोमनाथ मेंडके तसेच माजी महापौर शोभा बनशेट्टी, माजी नगरसेविका रोहिणी तडवळकर, लता फुटाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संजय शिंदे, गौरव जक्कापुरे यांनी मांडले. यावेळी उत्सव उपाध्यक्ष चक्रपाणी गज्जम, उत्सव कार्यवाह आकाश हारकुड, संतोष खंडेराव, मल्लिनाथ सोलापूरे, आशिष उपाध्ये, विजयकुमार बिराजदार, विरेश सक्करगी, दिलीप पाटील, द्वारकप्रसाद तावनीया, अभिषेक रंपुरे, प्रसाद कुमठेकर, गिरीश शहाणे, प्रसिध्दीप्रमुख शिवानंद येरटे आदींची उपस्थिती होती. या स्पर्धेसाठी पोलीस प्रशासन, मध्यवर्ती ट्रस्टी, उत्सव समिती पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्राचे किशोर व किशोरी खो-खो संघ जाहीर

## सिद्धी भोसले, श्री दळवी व वैष्णवी भावले कर्णधार

## झारखंड येथील राष्ट्रीय अजिंक्यपद व वडोदरा येथील राष्ट्रीय महिला लीग खो-खो स्पर्धेत भाग घेणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर-**

राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी किशोर व किशोरी आणि अस्मिता खेलो इंडिया महिला लीग स्पर्धेसाठी किशोरी असे तीन संघ महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी धाराशिव येथे जाहीर केले.

धाराशिवची सिद्धी भोसले व सांगलीचा श्री दळवी यांची झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तर छत्रपती संभाजीनगरच्या वैष्णवी भावले हिची वडोदरा (गुजरात) येथे होणाऱ्या अस्मिता खेलो इंडिया महिला लीग स्पर्धेसाठी कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

हे संघ निवडण्यासाठी धाराशिव जिल्हा खो- खो संघटनेच्या वतीने मैदान निवड चाचणी धाराशिव येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मैदानावर झाली. त्यातून अमोल मुटकुळे (हिंगोली), विशाल पाटील (जळगाव), राजाराम शितोळे (सोलापूर) व वर्षा कछवा (बीड) या निवड समिती सदस्यांनी हे संघ निवडले. त्यानंतर हे संघ











डॉ. जाधव यांनी जाहीर केले. या संघास महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार अॅड. गोविंद शर्मा यांनी शुभेच्छा दिल्या.

झारखंड येथे २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या ३४ व्या किशोर व किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आणि २८ ते २९ सप्टेंबर २०२४ या कालावधीत वडोदरा (गुजरात) येथे होणाऱ्या अस्मिता खेलो इंडिया महिला लीग किशोरी गट स्पर्धेत हे संघ सहभागी होणार आहेत.तिन्ही संघाचे सराव शिबिर मुंबई येथे १८ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे.

**महाराष्ट्राचे संघ असे :**

**राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा - किशोर गट :** भिमसिंग वसावे (धाराशिव), विनायक बनगे (ठाणे), प्रथमेश कुंभार, प्रसाद बळीप (सातारा), श्री दळवी (सांगली),सुरेश वसावे, प्रफुल्ल वसावे (धाराशिव),सुयश चव्हाण, सचिन थोरात (पुणे), मयूर जाधव (सातारा), संस्कार वाळवे (सांगली),निलेश गवळी (नाशिक),श्रावण राऊत (सोलापूर),हिमांशू ठाकरे (छ. संभाजीनगर), अथर्व खरड (अहमदनगर), राखीव :श्रेयस शिंदे(मुं. उपनगर), अमन गुप्ता (ठाणे), सार्थक हिरेकुर्ब (सांगली), प्रशिक्षक : श्री. विकास सूर्यवंशी (छ. संभाजीनगर), सहाय्यक प्रशिक्षक : विकास परदेशी (अहमदनगर), व्यवस्थापक : राम चोखट (परभणी).

**किशोरी गट :** सिद्धी भोसले (धाराशिव), वेदिका तामखडे (सांगली),गौरी जाधव (सातारा), कोमल पासले (सोलापूर), ईश्वरी सुतार , राही पाटील, मुग्धा सातपुते (धाराशिव), श्रावणी तामखडे, पायल तामखडे (सांगली), अपर्णा वर्दे, ज्ञानेश्वरी इंगळे (पुणे), प्रणिती जगदाळे (ठाणे), प्राजक्ता बोरसे, पल्लवी सहारे (नाशिक), कादंबरी तेरवणकर (मुंबई). राखीव : भवरम्मा ऊटगी (सांगली), सलोनी गांगुर्डे (धाराशिव), श्रेया करे (पुणे), प्रशिक्षक : अतुल जाधव (सोलापूर), सहाय्यक प्रशिक्षक मयूर परमाळे (पुणे), व्यवस्थापिका : रोहिणी आवारे (धाराशिव).

**अस्मिता खेलो इंडिया महिला लीग - किशोरी गट :** ऋतुजा सुरवसे, कीर्ती काटे (सोलापूर), आरोही पाटील (धाराशिव), कार्तिकी फारणे (सांगली). आरती घाटे (पुणे), गौरी रोडे, निधी जाधव (ठाणे), प्रांजल जाधव, दिशा बोंद्रे (सातारा), नीलम मोहंडकर (नाशिक), वैष्णवी फुटक (रत्नागिरी), रोहिणी गावित (नंदुरबार), वैष्णवी भावले (छ. संभाजीनगर), वैष्णवी मदन (जालना), राणी भालेराव (परभणी), प्रशिक्षक : महेंद्रकुमार गाढवे (सातारा), व्यवस्थापक : नंदिनी धुमाळ (मुंबई).

### सोलापूर जिल्ह्याचे चौघे, वाडी कुरोलीचे अतुल जाधव प्रशिक्षक

महाराष्ट्र संघात सोलापूर जिल्ह्यातील चौघांचा समावेश आहे. तसेच किशोरी संघाच्या प्रशिक्षकपदी वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथील अतुल जाधव यांची निवड झाली आहे. न्यू सोलापूर क्लबचा श्रावण राऊत आणि कल्याणराव काळे स्पोर्ट क्लब वाडीकुरोली येथील कोमल पासले व ऋतुजा सुरवसे आणि साकत प्रशाला बार्शीची कीर्ती काटे हे चौघे या स्पर्धेत सहभागी होतील. सर्वांचे सोलापूर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तणाव व्यवस्थापनाची जीवनविद्या शिकल्यास आयुष्य बनेल आनंदी

## निवृत्त पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय : जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

आज मनुष्याला होत असलेले ७० ते ८० टक्के आजार केवळ मानसिक स्वास्थ बिघडल्यामुळे होत आहेत. त्यामुळे आपण तणाव व्यवस्थापनाची जीवनविद्या शिकल्यास आपले आयुष्य निश्चितच आनंदी बनेल, असे प्रतिपादन निवृत्त पोलीस महासंचालक भूषणकुमार उपाध्याय यांनी केले.

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे चौथे आणि अखेरचे पुष्प सोमवारी श्री. उपाध्याय यांनी गुंफले. ताण तणाव व मानसिक स्वास्थ्य असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यानमालेचे यंदाचे ४८ वे वर्ष होते.

प्रारंभी दीप प्रज्वलन आणि श्री गणेश पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक ॲड. प्रदीपसिंग राजपूत, जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार उपस्थित होते.



श्री. उपाध्याय म्हणाले, विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात गणित, विज्ञान आदी विषय शिकवले जातात. परंतु तणावाचे व्यवस्थापन कसे करावे हे शिकवले जात नाही. त्याची आज अत्यंत गरज आहे. मनुष्याला आलेला तणाव आणि नैराश्य कसे घालवावे याचे अचूक उपाय भारतीय सांगितले आहेत. योग प्राणायाम ध्यानधारणा आणि श्वासावर लक्ष केंद्रित केल्याने आपण तणावमुक्त होऊ शकतो, असेही श्री. उपाध्याय यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांनी शरीरात चालणारी श्वासासंबंधीची यंत्रणा, जगामध्ये याबाबत चाललेले संशोधन आदींची सखोल माहिती सोलापूरकरांना दिली.

याप्रसंगी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक ॲड. प्रदीपसिंग राजपूत, सी. ए. गिरीश बोरगांवकर, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक राजेश पवार, जगदीश भुतडा, पुरूषोत्तम उडता, विनोद कुचेरिया, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य डॉ. अजितकुमार देशपांडे, जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार आदी उपस्थित होते. विनायक कुरापाटी यांनी सूत्रसंचालन तर मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार यांनी आभार प्रदर्शन केले.

# मनसेच्यावतीने २२ सप्टेंबरला मंगळवेढयात मनसे केसरी कुस्त्या

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१६ सप्टेंबर**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पंढरपूर व मंगळवेढा तालुक्याच्यावतीने रविवार दि.२२ सप्टेंबर रोजी इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथे मनसे केसरी-२०२४ जंगी कुस्त्याच्या मैदानाचे आयोजन केले असल्याची माहिती मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी दिली.





उपमहाराष्ट्र केसरी पै. महेंद्र गायकवाड व छत्रसाल स्टेडियम दिल्लीचे पै.आशिष हुड्डा यांच्यामध्ये ५ लाख रुपयांची कुस्ती होत आहे. महाराष्ट्र केसरी पै. सिकंदर शेख व दिल्लीचे पै.दिपक कुमार यांच्यामध्ये ५ लाख रुपयांची कुस्ती होईल. सकाळी १० ते १२ या वेळेत १०० रुपयापासून ५ हजारांपर्यंतच्या कुस्त्या जोडण्यात येतील तर मैदानाची वेळ दुपारी ३.०० वा. असेल, गंगावेस तालीम कोल्हापूरचे पै.माऊली जमदाडे व हरियाणाचे पै.रोहित दलाल यांच्यामध्ये दोन लाखांची कुस्ती,कोल्हापूरचा पै.उमेश चव्हाण व काका पवार तालीमचे पै. संग्राम साळुंखे यांच्यात १ लाखाची कुस्ती, पंढरपूरचे पै.तात्या जुमाळे व पै.विजय शिंदे यांच्यात १ लाख रुपयांची कुस्ती, काका पवार तालीमचे ज्योतिबा आटकळे व सह्याद्री संकुल पुणेचे पै.संग्राम अस्वले यांच्यात ७५ हजार रुपयांची कुस्ती, जयमल्हार कुस्ती संकूल मंगळवेढाचे वस्ताद मारुती वाकडे यांचा पै.सौरभ घोडके व विठ्ठल आखाडा पंढरपूरचे पै.सुनिल हिप्परकर यांच्यात ५० हजार रुपयांची कुस्ती होणार आहेत आणि वेगवेगळ्या प्रकारचे बक्षिसही जाहीर करण्यात आलेले आहेत.

यावेळी महाराष्ट्र केसरी पै.समाधान घोडके हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तसेच अर्जुन ॲवार्ड, हिंद केसरी, रुस्तूम ए हिंद, मल्ल सम्राट, कुस्ती सम्राट, भारत भिम, तसेच महाराष्ट्र केसरी, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त ऑल इंडिया चॅम्पियन, महाराष्ट्र चॅम्पियन, राष्ट्रकुल सुवर्णपद विजेते तसेच कुस्ती शौकिन, पैलवान व आजी माजी वस्ताद उपस्थित राहणार आहेत. मैदान शुभारंभ कुस्ती पै. करण बंदपट्टे विरूध्द पै.वैभव साठे, पै.अर्जुन बंदपट्टे विरूध्द पै.राजवर्धन पाटील अशी कुस्ती होईल. पै.प्रणित भोसले विरूध्द पै.सागर चौगुले, पै.समाधान कोळी विरूध्द पै.सुमित आसबे, पै.बालाजी मळगे विरूध्द पै.समर्थ काळे, पै.विजय धोत्रे विरूध्द पै.अजय नागणे, पै.कामण्णा धुमुकनाथ विरूध्द पै.राजेंद्र नाईकनवरे, पै.दिग्विजय वाकडे विरूध्द पै.अमर मळगे, पै.रणजित घोडके विरूध्द पै. शंकर गावडे, पै.यश धोत्रे विरूध्द पै.शंतनू शिंदे अशा कुस्त्या होणार आहेत. आखाडा प्रमुख म्हणून मारुती वाकडे, दामोदर घुले, भिमण्णा माळी, सोमनाथ बुरजे, महेंद्र देवकते हे काम पाहणार असून समालोचन पै.धनाजी मदने, अशोक धोत्रे, ज्ञानेश्वर आस्वले हे करणार आहेत.




# मनसोक्त हसायला शिका : संजय कळमकर

## वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १६ सप्टेंबर**

प्रत्येकाला वाटतं आपलंच दु :ख मोठ आहे पण जगामध्ये आपल्यापेक्षाही दु:ख मोठी आहेत, विनाकारण दु:खाला कुरवाळत बसु नका, आनंदी राहा, मनसोक्त हसायला शिका, हसण्याने प्रकृती चांगली रा- हते, असे व्याख्याते संजय कळमकर म्हणाले. ते वीरशैव विद्या संवर्धिनी मंडळ लिंगायत बोर्डिंग येथे आयोजित व्याखानमालेत 'हसण्यासाठी जन्म आपुला' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष रावसाहेब मनगिरे, डीवायएसपी जालिंदर नालकुल, अजित कुंकूलोळ, एन.आर. कुलकर्णी, प्रमोद माळी, संतोष कोकणे, वसंत हवालदार, रविंद्र बुडूख, अनिल वेदपाठक, अमित आपटे, संतोष सुर्यवंशी, गणेश भोळे, धनंजय धारुरकर, शिवलींग मठपती, प्रभुलिंग स्वामी, गिरीष बरिदे, योगेश घंटे, मनिष सावळे, अनिल शेटे, संतोष मनगिरे, बंडु मनगिरे, दादा कोरे आदी उपस्थित होते .

यावेळी कळमकर म्हणाले, नॅचरल हसण्याचे फायदे आहेत. तसे हास्य क्लबमध्ये कुत्रिम हसण्याचे तेवढे फायदे होताना दिसत नाही..जुने पुर्वीचे लोक समाधानी होते, ते बोलत होते त्यांचेत संवाद, चर्चा करत एकमेकात गंमती जमती सांगत, मनमोकळेपणाने हसत होते. पण आताची पिढी मोबाईलमध्ये अडकली आहे.

आपापल्या विश्वावात रमू लागली आहे. हसणे विसरत चालली आहे. तिसऱ्या पुष्पाने या व्याख्यानमालेची सांगता करण्यात आली. यावेळी ॲड. सचिन शेटे यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचलन शिल्पा मठपती तर आभार विवेक देवणे यांनी मानले.

# संत सेवालाल निधी व श्रीगणेश फायनान्सच्या अपहाराची रक्कम सव्वा चार कोटींपर्यंत वाढली

## फसवणूक झालेल्या गुंतवणुकदारांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

संत सेवालाल निधी लिमिटेड व श्री गणेश फायनान्स या संस्थांच्या माध्यमातून फसवणुक झालेल्या नागरीकांच्या व रकमेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या संस्थेकडून आतापर्यंत ७६ गुंतवणुकदारांची फसवणुक करण्यात आली असून फसवणुकीची रक्कम ४ कोटी १६ लाख ७६ हजार ७९५ रुपयांपर्यंत गेली आहे. या संस्थेकडून फसवणुक झालेल्या गुंतवणुकदारांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.




शिवाजी गोपाळ जाधव (रा. विठाई नगर, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर सध्या रा. १२/२ साफल्य नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर) याने व त्याच्या इतर साथिदारांनी योगेश नागनाथ पवार (रा. अभिषेक पार्क, धुम्मा वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर) यांची फसवणुक केल्याबाबतचा गुन्हा सदर बझार पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याची व्याप्ती पाहता या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. या गुन्ह्याच्या तपासामध्ये पोलिसांनी आतापर्यंत केलेल्या तपासात फसवणुक झालेल्या गुंतवणुकदारांची संख्या ही ७५ पर्यंत पोहोचली असून फसवणुकीची रक्कम ही ४ कोटी १६ लाख ७६ हजार ७९५ रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

दरम्यान, शिवाजी जाधव व त्यांच्या साथीदारांविरुध्द सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील मंद्रुप पोलिस ठाण्यात याच संस्थांच्या माध्यमातून फसवणुक केल्याप्रकरणी आणखी एक दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याबाबत योगेश पवार यांनी जिल्हा न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

या गुन्ह्यातील मे. श्रीगणेश फायनान्स व संत सेवालाल निधी लिमिटेडचे प्रवर्तक/संचालक शिवाजी जाधव यांच्याकडून फसवणुक झालेल्या गुंतवणुकदार किंवा ठेवीदारांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# पर्युषण महापर्व आत्मसाधनेचा पर्व

**आपल्या भारतीय संस्कृतीत अनेक सण,उत्सव,पर्व साजरे केले जातात.व्यवहारिक पर्व व आध्यात्मिक पर्व असे दोन प्रकारचे पर्व पहायला मिळतात. व्यवहारिक पर्व भौतिक सुखाशी संबंधित आहेत.तर आध्यात्मिक पर्व हे आत्मसाधनेशी संबंधित आहे.पर्युषण पर्व आत्मशुद्धी आणि आत्मसिद्धीचा पर्व आहे. या पर्वात देवपूजा, व्रत, उपवास, शास्त्र-स्वाध्याय करून जीवनचे सार्थक केले जाते.**

पर्युषण महापर्व सार्वकालिक, सार्वभौमिक, सार्वजैविक व सार्वजनिक पर्व आहे. पर्युषण पर्व वर्षातुन तीन वेळा येतो. भाद्रपद, माघ व चैत्र महिन्याच्या शुक्ल पंचमी पासुन ते चतुर्दशीपर्यंत हा पर्व साजरा करतात.या पर्वात उत्तम क्षमादी शुद्ध भावांची प्रधानता असल्यामुळे हा पर्व सर्वोत्कृष्ट पर्वाधिराज महापर्व म्हटल्या जातो. पर्युषण पर्वात आत्म्याच्या दहा गुणांची आराधना केली जाते. म्हणुन या पर्वास दशलक्षण पर्व असे ही म्हणतात .हे दशधर्म धर्माचे प्रकार नसुन ती धर्माची दहा लक्षणे आहेत. ती दहा धर्माची लक्षणे खालील प्रमाणे आहेत.

**क्षमा धर्म -**

क्रोध मानसिक विकृती आहे. निजात्म्याच्या आश्रयाने आत्म्यामध्ये क्रोधाच्या अभावपुर्वक जी शांतीची स्वरूप पर्याय प्रगट होते, त्यास क्षमा असे म्हणतात. क्षमा शांतिदायक आहे. क्षमाभाव धारण करणारा व्यक्ति अंतकरणाने उदार, संयमी व गुणगंभीर असतो.जीवन जगण्याची निर्दोष प्रक्रिया क्षमा आहे.क्षमा धर्माचा अंगिकार केल्याने हिंसा, शत्रुता, द्वेष, दुराचार, घृणा नष्ट होवुन समाजात सहअस्तित्व व मैत्रिभाव प्रस्थापित करता येतो.

**मार्दव धर्म -**

अहंकार हा सदगुणांचा नाशक दुर्गुण आहे. अहंकार केल्याने व्यक्तिची प्रगती थांबते.वमार्दव धर्म म्हणजे कोमलता, विन्रमता, सर्वांप्रति विनयवान राहणे होय. विनयवान व्यक्तिस मानसिक शांतीची प्राप्ती होते. विनय धारण केल्याने ज्ञानप्राप्ती होते. विनम्र ज्ञानी व्यक्तीची सर्वत्र प्रशंसा होते. विनम्र भावनेमुळे साधर्मी वात्सल्यभावना निर्माण होते. मनुष्याच्या विचार व व्यवहारामध्ये जी सहज नम्रता,कोमलता आहे त्यास उत्तम मार्दव धर्म असे म्हणतात.

**आर्जव धर्म -**

मायाचार, छलकपट, विश्वासघात करणे दुखदायी आहे.मन वचन व आचरणात कुटिलता नसणे. विचार, उच्चार व आचार यामध्ये एकरूपता असणे.म्हणजे आर्जव धर्म आहे. मन निर्मळ,निष्पाप व निष्कपट असावे. मधुर हितकारी वचन बोलावे, आचरण अहिंसक व धर्मानुकुल असावे. याच उद्देशाने उत्तम आर्जव धर्माचे महत्व आहे. आर्जव धर्म धारण केल्याने व्रत, उपवास, जप, तप धर्मक्रिया सार्थक होतात.

**शौच धर्म-**

क्रोध, माण, माया, लोभ हे चार मानसिक मळ आहेत. शुर्चेभाव:शौचम अर्थात शुचिता म्हणजे पवित्रता आत्म्याच्या शुद्ध,पवित्र परिणामांना शौचधर्म असे म्हणतात.मलिन अंतकरणाने देवपूजा व आत्म साधना होवू शकत नाही. लोभी लोभाच्या आवेशात सर्व प्रकारची पापे करतो. अपेक्षा,इच्छा व लोभरहित होवुन शुद्ध ज्ञाता दृष्टा निर्मळ स्वभावी राहणे हाच उत्तम शौच धर्म म्हटला जातो.

**सत्य धर्म-**

उत्तम सत्य धर्माचे स्वरुप अत्यंत व्यापक, विशाल, सुंदर व सुखद आहे.सत्य हेच धर्माचे मुळ




आहे. सत्य हे अप्रतिम, अकृत्रिम आहे. सत्य वंदनीय व अनुकरणीय आचरणीय आहे. सत्य सर्वजनप्रिय, हितकारक व कल्याणकारी आहे. सत्याच्या प्रभावाने जीवनात सुख, शांती व समृद्धी नांदते. सत्यवचन बोलल्यामुळे व सत्यरुप आचरण केल्यामुळे व्यक्ति निडर, निशंक, निर्विकारी बनतो.

**संयम धर्म -**

पापकार्यात रममाण होणाऱ्या मन, वचन, कायेच्या प्रवृत्तीला रोकणे. म्हणजेच संयम आहे.संयम धारण न केल्यामुळे पापकर्माचा बंध होतो व अनंत दु:ख भोगावे लागते. हिंसा न करणे, मनात सदैव दया, करुणा, वात्सल्यभाव ठेवणे. शास्त्र स्वाध्याय करणे, परमात्म्याचे ध्यान, चिंतन-मनन इत्यादीमुळे संयम धर्माचा अंगिकार होतो.संयमपूर्वक केलेली धर्म आराधना व आत्मसाधना सुखाला कारणीभूत आहे.

**तप धर्म-**

आत्म्याने आत्म्यामध्ये आत्मप्राप्तीसाठी केलेली आत्मआराधना म्हणजे तप आहे. आत्मध्यानपूर्वक आत्मप्राप्तीची चिंतन प्रक्रिया म्हणजे तप आहे. तप केल्याने मनाची एकाग्रता वाढते. स्मरणशक्तिचा विकास होतो. मनशुद्धी होते. मनाला शांत व प्रसन्नतेचा अनुभव होतो. तपस्वी अहिंसाप्रेमी, क्षमास्वभावी, सद्विचारी, समाताभावी, संयमी आत्मध्यानी व आत्मज्ञानी असतात. तप केल्यानेच आत्मशुद्धी व आत्मसिद्धी होवून आत्मसुखाची प्राप्ती होते.

**त्याग धर्म -**

ईच्छा,आसक्ति,आकांक्षा,लोभ या विकारी परिणांमापासुन निवृत्त होणे म्हणजे उत्तम त्याग धर्म आहे. सत्पात्राला योग्य जीवनावश्यक वस्तु, पदार्थ, धन देणे यास दान म्हणतात. परपदार्थावरील इच्छा, आसक्ती, कमी करून इतरांच्या कल्याणासाठी आहारदान, औषधदान, अभयदान व ज्ञानदान करावे. लोभादी विकारी परिणाम व बाह्य धनादी पदार्थ यांच्या आसक्तिचा त्याग करणे. हे उत्तम त्याग धर्मात अपेक्षित आहे.

**आंकिचन्य धर्म -**

साधक आहे. सुखप्राप्ती साध्य आहे. परद्रव्यनिवृत्ती व स्वरूप प्रवृत्ती ही आत्मसाधना आहे. आणि हिच आत्मसाधना म्हणजे उत्तम आंकिचन्य धर्म आहे.परद्रव्य निवृत्ती त्याग आहे तर स्वरूप प्रवृत्ती आंकिचन्य धर्म आहे.परद्रव्याच्या आसक्तिने मोह, राग, ईच्छा या विकारी परिणामात विखुरलेली आत्मशक्ति आत्मकेन्द्रित करणे.यास उत्तम आंकिचन्य धर्म असे म्हणतात.

**ब्रम्हचर्य धर्म -**

परद्रव्य निवृत्ती म्हणजे त्याग आहे. स्वरूपप्रवृत्ती म्हणजे आंकिचन्य आहे तर स्वरूप लिनता म्हणजे ब्रम्हचर्य आहे.त्रिकाली ध्रुव,शुद्ध निज आत्म्यात लिन होने म्हणजे उत्तम ब्रम्हचर्य धर्म आहे. पंचेद्रिंयविषय, कषाय,भोग व कामवासनारूप परिणाम न करणे यास उत्तम ब्रम्हचर्य धर्म असे म्हणतात.ब्रम्हचर्य धर्मामध्ये आत्मानुशासन, स्वयंशिस्त, संयम, तप, त्याग, अहिंसा, शिल, समता या गुणांना महत्त्वपूर्ण स्थान आहे.

**- पण्डित प्रा.रवीन्द्र काळे, जैनदर्शनशास्त्री**
वालचंद कॉलेज, सोलापूर

## संक्षिप्त वृत्त



### वटवृक्ष मंदिरात पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १६ सप्टेंबर-**

गुरुपौर्णिमेनिमीत्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरासह अक्कलकोट शहरात उत्कृष्टरित्या नियोजन करून भाविकांच्या सोयीसाठी राबवलेल्या पोलीस बंदोबस्तानिमित्त सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व सहकाऱ्यांचा श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन स्वामींचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांनी स्वामींचे कृपावस्त्र व प्रसाद देऊन अतुल कुलकर्णी यांचा हा सन्मान केला. याप्रसंगी अक्कलकोटचे पोलीस उपअधीक्षक विलास यामावार, साऊथ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, नॉर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांचाही स्वामींचे कृपावस्त्र व प्रसाद देऊन महेश इंगळे यांनी या प्रसंगी सन्मान केला. याप्रसंगी बोलताना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस बंदोबस्तच्या माध्यमातून स्वामी दर्शना करीता आलेल्या भाविकांची सेवा करण्याची संधी मिळाल्याने व मिळालेली संधी सुरळीत पार पडल्याने समाधान लाभले असल्याचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, गोपनीय खात्याचे धनराज शिंदे, गजानन शिंदे, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, श्रीकांत मलवे आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.

### अक्कलकोट गणेश विसर्जन मिरवणुक देखाव्याची मोठी उत्सुकता

**अक्कलकोट दि . १६ सप्टेबर**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील बहुचर्चित श्री गणेश मंडळाच्या श्री विसर्जन मिरवणुक देखावे कुठल्या ज्वलंत विषयावर आरास होणार याबद्दल उत्सुकता शिगेला पोहचली आहे. गणेश मंडळाची मिरवणुक तयारी नामवंत वादय लेझीम ढोल बॅजो बॅन्ड पथक पाचारण केले आहेत. सुमारे वीस ते ४० गणेश मंडळे श्री विसर्जन मिरवणुक आरास देखाव्या त विदयुत रोषणाईत निघेल असा अंदाज आहे. राम गल्ली, आझाद गल्ली, जय जवान गल्ली, बेडर गल्ली, महादेव नगर, जुना राजवाज, नविन राजवाज चाळ, पागा चाळ, सुभाष गल्ली, जयजवान गल्ली, एकता गणेश वेताळ चौक, संजय नगर, समता नगर, कालीका नगर, हसापुर रोड, नागनाथ खासबाग, सावरकर चौक, संभाजी चौक, शिवशक्ती, नेहरू गल्ली, खोडवे गल्ली, गुरु मित्र, जय भवानी, श्री कृष्ण वेताळ चौक, मोची गल्ली, बालाजी समाधी मठ, जय भवानी, बंजारा क्रांती यासह इतर मंडळा कडून श्री विसर्जन समाज प्रवोबधन पोराणिक ज्वलंत विषयावर देखावे आरास मिरवणुक भव्य दिव्य मिरवणुक निघणार आहे. याची चर्चा तालुक्यात मोठया प्रमाणात चालु आहे उत्सुकता शिगेला पोहचली आहे.



### अक्कलकोट गृहरक्षक दल कार्यालय अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते श्रीचे पुजन

**अक्कलकोट दि . १६ सप्टेबर**

सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते अक्कलकोट विभाग विभागीय पोलीस अधिकारी विलास यमावार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गृहरक्षक दल कार्यालय अक्कलकोट येथील श्री गणेशा चे पुजन करण्यात आले. उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे दक्षिण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, पोलीस कर्मचारी व गृहरक्षक दल अधिकारी पुरुष महिला गृहरक्षक आदि उपस्थित होते.

### डॉ. शिवरत्न शेटे यांना स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**



गीता परिवारातर्फे दरवर्षी दिला जाणारा स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार यंदा ख्यातनाम शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती गीता परिवाराचे कार्याध्यक्ष संजय मालपाणी यांनी दिली. राष्ट्र, धर्म, समाजासाठी जाणीव जागृतीचे उत्तुंग कार्य करणाऱ्या व्यक्तींना गीता परिवारातर्फे स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येते. स्मृतिचिन्ह, मानपत्र, महावस्त्र आणि ७१ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सोमवार, २३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये आयोजित छत्रपती शिवाजी महाराज कथा कार्यक्रमात गीता परिवाराचे संस्थापक अध्यक्ष प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी महाराज यांच्या हस्ते डॉ. शिवरत्न शेटे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. गीता परिवारातर्फे बालक आणि युवकांना श्रीमद् भगवद्गीता शिकवण्याचे काम करण्यात येते. केवळ कोविड काळापासून आजवर तब्बल १४२ देशांमधील ८ लाख जणांना गीता परिवारातर्फे ऑनलाईन माध्यमातून श्रीमद् भगवतगीता शिकवण्यात आली आहे.


## गणेश मंडळ देखावा पाहण्यासाठी गर्दी



सोलापूर : आंध्रा मारुती देवस्थान मंडळाने आदियोगी भोलेनाथ (कोईम्बत्तुर) देखावा केला.




सोलापूर : पुर्व भाग परिसरात तिरुपती देखावा पाहण्यासाठी सोलापुरकरांनी रविवारी तुफान गर्दी. (छायाचित्र : केवल तिवारी)




सोलापूर : तरुण भारतच्या श्रींची महापूजा भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी मोहन डांगरे यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी उपस्थित तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा आवृत्तीप्रमुख राजाराम मस्के आदी.




सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची महापूजा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाजपाचे माजी नगरसेवक अनंत जाधव, किरण पवार आदी.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची महापूजा एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी त्यांचा मित्रपरिवार उपस्थित होता.




सोलापूर : दै.तरुण भारतच्या श्रींची महापूजेप्रसंगी सावाचे अध्यक्ष संतोष उदगिरी, उपाध्यक्ष निशांत पोरे, सेक्रेटरी अक्षय झवेरी, सहसेक्रेटरी सचिन क्षीरसागर, खजिनदार पांडुरंग कोल्हापुरे, मोहन वैद्य, लक्ष्मीकांत उदगिरी, रोहित जोगीपेठकर, सामाजिक कार्यकर्ते ब्रीजमोहन फोफलीया आदी.



दैनिक तरुण भारतच्या श्रींची महापूजा मार्ग फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी संतोष राठोड, दैनिक तरुणचे मंद्रुप प्रतिनिधी अमोगसिद्ध मुंजे, मेघराज राठोड, सतीश राठोड, पिंटू राठोड, अजय चव्हाण, विनोद चव्हाण, अजय चव्हाण, सागर चव्हाण आदी.




सोलापूर : तरुण भारतच्या श्रींच्या महापूजेप्रसंगी ॲड. बसवराज सलगर, श्री ठाकूर, तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ बी. श्रीनिवास, ॲड.प्रकाश जाधव.




सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची पूजेप्रसंगी सोलापूर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील आणि मित्रपरिवार.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची पूजा करताना शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी नगरसेवक गणेश वानकर, उद्योजक दीपक डोके.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची महापूजा लोकमंगल सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंग बायस यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी बँकेचे राहुल कोल्हटकर. कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने.



दैनिक तरुण भारतच्या श्रींची महापूजेप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ पदाधिकारी तथा शिवालय आश्रमशाळचे संस्थापक दत्ता गणेशकर.

## ॲक्शनपट 'रानटी' चित्रपट रुपेरी पडद्यावर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

प्रदर्शित झालेल्या पोस्टरवरनं 'रानटी' चित्रपट दिसतोय तेवढाच हिंस्त्र आणि त्याहून अधिक ॲक्शनने भरलेला आहे.

मराठी सिनेमांत आजपर्यंत कधीही न पाहण्यात आलेल्या दिग्दर्शनाची शैली,थरारक ॲक्शन दृश्य,जबरदस्त पटकथेचा जॉनर आणि अचूक संकलन हे 'रानटी' चित्रपटात पहायला मिळणार आहे. शरद केळकर हा हिंदी-मराठी चित्रसृष्टीतील आघाडीचा नट आहे. चित्रपटाच्या पोस्टरमधूनही कळतंय आणि त्याचा 'रानटीपणा' नेमका किती आहे हे चित्रपट प्रदर्शित झाल्यावर कळेलच. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना शरद सांगतात की,अधर्मी वृत्तींचा नाश करणाऱ्या विष्णूची भूमिका मी यात केली आहे. २२ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



## महावीर बँकेच्या सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर

**● वार्षिक सर्वसाधारण सभेत चेअरमन दीपक मुनोत यांची घोषणा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

श्री महावीर अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुजराती भवन येथे बँकेचे विद्यमान चेअरमन दीपक मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहाने व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभिरे व श्री आदेश्वर जैन बेत्तांबर मूर्ती पूजक संघाचे अध्यक्ष इंदरमलजी जैन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सभासदांनी १०% लाभांशला मान्यता दिली तसेच बँकेचे कार्यक्षेत्र वाढवून संपूर्ण महाराष्ट्र राज्य करणेकरिता बँकेच्या पोटनियम दुरुस्तीस सर्व सभासदांनी एकमताने मंजूरी दिली. बँकेच्या २०१२ साली असलेल्या ३८ कोटी ठेवीवरुन आज अखेर ५०० कोटीपर्यंतचा ठेवीचा पल्ला पार केला आहे व बँकेश १६.५७ कोटी ढोबळ नफा, ३.५४ कोटी निव्वळ नफा मिळविला आहे. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना चेअरमन दीपक मुनोत यांनी समर्पक उत्तर देऊन सभासदांचे समाधान केले. रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँकेस नुकतेच मोबाईल बँकिंग, आयएमपीएस, यूपीआयचे लायसन दिले आहे व बँकेस फायनानशील साउंड अँड वेल मॅनेजड बँक या वर्गात ठेवले आहे व बँकेस ऑडीट वर्ग अ दिला आहे.

सध्या बँकेच्या स्वम ालकीच्या ३ वास्तू असून मुख्य शाखेसाठी भव्य कार्पोरेट ऑफिस उभारण्याची सूचना करण्यात आली. बँकेस आदर्श बँक पुरस्कार, बँको ब्लू रिबन पुरस्कार, बैंकिंग फ्रंटीअर पुरस्कार, सहकार सुगंध पुरस्कार इत्यादी मिळाले आहेत.

या सभेस बँकेचे व्हा. चेअरमन संजय सेठीया, संचालक रवींद्र गुजराथी, नारायण गंजी, गोविंद भैया, गिरीश देवरमणी, गौतमचंद संचेती, श्रीनिवास चिलका, संतोष भंडारी, भैरूलाल कोठारी, इंदरमल जैन, चेतन बाफना, शामसुंदर पवार, राजशेखर हिरेमठ, अरुण साळुंखे, माधुरी पारेख, पूनम लोणावत, नितीन नावंदर, नंदकिशोर उदगीरी उपस्थित होते.



## गुजराती मित्र मंडळाची वार्षिक सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**

येथील श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळाची ८६वी वार्षिक सर्वसाधार सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

अध्यक्षीय भाषणात मुकेश मेहता यांनी गुजराती समाजाने केलेल्या प्रगतीबद्दल सर्व सभासदांचे आभार मानत भविष्यकालीन योजनांबद्दल माहिती दिली. महिला मंडळाच्या सचिवा प्रज्ञा ठक्कर यांनी महिलांनी केलेल्या विविध कार्यक्रमाबत माहिती दिली.

प्रारंभी सहसचिव संदीप जव्हेरी यांनी झालेल्या वार्षिक सभेचे वृत्तांत वाचले. त्यानंतर सचिव जयेश पटेल यांनी २०२३-२४ चा वार्षिक अहवाल मांडला. उपाध्यक्ष मणिकांत दंड यांनी गतवर्षाचे ताळेबंदपत्रक व हिशोब मांडला. वर्ष २०२४-२५चे अंदाजित ताळेबंद पत्रकास मंजुरीसाठी सादर केले. त्यास उपस्थित सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

या सभेत प्रतीक राडिया व नेरल गडा या सभासदांनी संचालक मंडळांनी केलेल्या कामांची प्रशंसा करीत काही सूचना मांडल्या. संदीप जव्हेरी यांनी आभार मानले. सभेस ट्रस्टी बिपिन पटेल, विजय पटेल, केशवजी राम्भीया, रमेश गोरडीया सह निलेश पटेल हितेंद्र वोरा, अतुल पटेल, कांतीलाल पटेल, अमित पटेल, कौशिक शाह, संजय शाह, जगदीश पटेल, भरत शाह, पारुल पटेल, स्वाती देसाई आदी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : महापालिका प्रशासनाच्या वतीने गणेश विसर्जनानिमित्त गणपती घाटावर विसर्जन तयारी पुर्ण झाली आहे.



## ▶▶ क्राईम वृत्त...

### दुचाकीच्या धडकेने रस्ता ओलांडणाऱ्या तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**
शहरातील अक्कलकोट रोडवर दुचाकीच्या धडकेने रस्ता ओलांडणाऱ्या तरूणाचा मृत्यू झाला. खंडोबा प्रकाश घोडके (वय ३७, रा. श्रीदेवी नगर भाग २, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत अंबादास विठोबा घोडके (वय ४८, रा. श्रीदेवी नगर भाग २, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आदित्य आप्पासाहेब पाटील (रा. चपळगाव, ता. अक्कलकोट) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.१४ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास खंडोबा घोडके हे जुना अक्कलकोट नाका येथे त्यांचा काका अंबादास घोडके यांच्यासाठी नाष्टा आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी जुना अक्कलकोट नाका येथे रस्ता ओलांडताना अक्कलकोटकडे जाणाऱ्या एमएच १३ डीएस ४५५५ क्रमांकावरील दुचाकीस्वार आदित्य पाटील याने त्याच्या दुचाकीची घोडके यास जोरदार धडक दिली. यामध्ये खंडोबा घोडके हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. म्हणून याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### आकांक्षा ट्रॅव्हल्सच्या बसचालकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**
दुचाकीला कट मारून पळून गेलेल्या आकांक्षा ट्रॅव्हल्सच्या बसचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत संजय आण्णाराव पाटील (वय ५२, रा. ब्लॉक नं. ९५, रा. ओम नमः शिवाय नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आकांक्षा नावाच्या ट्रॅव्हल्सच्या अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ सप्टेंबर रोजी ८ च्या सुमारास संजय पाटील हे त्यांच्या एमएच १० एडी ६४६३ क्रमांकाच्या दुचाकीवरून सोलापूर शहराकडे येत होते. त्यावेळी बाळे पोलिस चौकीसमोरील ब्रिज संपल्यानंतर पुढे ओढ्यावरील ब्रिजच्या सुरूवातीस पाठीमागून आलेल्या आकांक्षा नावाच्या ट्रॅव्हल्सच्या बस चालकाने त्याच्या ताब्यातील बस हयगयीने चालवून पाटील यांच्या दुचाकीस कट मारला. त्यामुळे पाटील हे खाली पडून गंभीर जखमी झाले व त्यांच्या दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यानंतर बसचालक पळून गेला. म्हणून पोलिसांकडे नोंद करण्यात आला आहे. हवालदार परीट पुढील तपास करीत आहेत.

### तरूणास फरशीच्या तुकड्याने मारहाण

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**
तरूणास फरशीच्या तुकड्याने मारहाण करणाऱ्या दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अक्षय विष्णु चौगुले (वय २२, रा. हिमगिरी नगर, नविन विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नागेश बंदपट्टे, मनोज बंदपट्टे (रा. व्यंकटेश नगर, बोळकोटे नगर, नविन विडी घरकुल, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ सप्टेंबर रोजी बोळकोटे नगरच्या कमाणीसमोरील रोडवर नागेश बंदपट्टे व मनोज बंदपट्टे यांना अक्षय चौगुले याने त्याचे घर सोडून गेलेल्या आई, भाऊ व बहिणीबद्दल विचारपूस केली असता त्याचा राग मनात धरून बंदपट्टे यांनी चौगुले यास मारहाण करून फरशीच्या तुकड्याने डोक्यात मारहाण केली. म्हणून पोलिसांकडे नोंद करण्यात आली आहे. हवालदार कटके पुढील तपास करीत आहेत.

### मड्डी वस्तीतून ४० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**
भवानी पेठेतील मड्डी वस्तीतून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत साहिल संजीव धोत्रे (वय २४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ सप्टेंबर रोजी साहिल धोत्रे याने त्याची एमएच २५ ऐपी ७९३८ क्रमांकाची दुचाकी ही हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.



# गणपती बाप्पांचे आज विसर्जन!

## ● अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**
लाडक्या गणरायाने नऊ दिवसांचा पाहुणचार आटोपून दहाव्या दिवशी आपल्या भक्तांचा निरोप घेतला. परंपरेनुसार भक्तांनी आपल्या दहा दिवसांच्या गणपती बाप्पांचे गणपती घाट येथे विधीवत विसर्जन केले. यावेळी चिमुकल्या बालगोपाळांनी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या या घोषणा दिल्या.

परंपरेनुसार आपल्या दहा दिवसांच्या गणपती बाप्पांचे सोमवार (दि.१६) सप्टेंबर रोजी शहरातील गणपती घाट आणि विष्णू घाट येथे गणपती विसर्जन करण्यासाठी भक्तांची सकाळपासून वर्दळ होती. गणेशभक्तांनी गणपती बाप्पाची आरती करून जड अंतःकरणाने बाप्पाला निरोप दिला. यावेळी विसर्जनस्थळी महापालिकेकडून अनंत चतुर्दशी अर्थात गणपती विसर्जन पार्श्वभूमीवर योग्य नियोजन आणि व्यवस्था करण्यात आली आहे. गणपती विसर्जन करताना कर्मचाऱ्यांनी मर्यादापलीकडे पाण्यात जाऊ नये यासाठी ड्रम ठेवून बॉर्डर करण्यात आली. त्याचप्रमाणे निर्माल्य संकलन केंद्र तसेच गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी ज्यादा कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस आणि होमगार्ड यांचा बंदोबस्त पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आला आहे.

परंपरेनुसार दहा दिवसांच्या गणपती बाप्पांना यावेळी असंख्य भाविकांनी निरोप दिला. विसर्जन स्थळावर स्वच्छता आणि पवित्रता राखण्यासाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्याच पद्धतीने गणपतीचे विसर्जन करण्यासाठी पाण्यात गेलेल्या कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये यासाठी जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. यांसह मिरवणूक मार्गावर बॅरिगेटिंग आणि खड्डे बुजवण्याचे काम प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. नऊ दिवसाच्या आणि दहा दिवसांच्या गणपती बाप्पांचे विधिवत विसर्जन झाल्यानंतर, उद्या मंगळवार ( दी.१७) सप्टेंबर रोजी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातील गणेश मूर्तींचे तसेच घरगुती बाप्पांचे विसर्जन होणार आहे. त्या अनुषंगाने देखील सर्व पूर्वतयारी करण्यात आली आहे.

विसर्जनापूर्वी राहिलेली कामे पूर्ण करण्यासंदर्भात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. श्री गणेश विसर्जनकरिता महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या निर्देशानुसार इंद्रभुवन येथील मीटिंग हॉल येथे श्रीगणेश उत्सव विसर्जनासंदर्भात सर्व खाते प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली.

महानगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सवाच्या विसर्जनाकरिता ११ विसर्जन कुंड तर ७८ संकलन केंद्र उभारण्यात आले आहेत. तुळजापूर रोड येथील खाण, विष्णू घाट,गणपती घाट त्याचबरोबर घरकुल येथील माढा विहीर तसेच इतर विसर्जन कुंड, गणपती विसर्जनासाठी महापालिकेने तयारी पूर्ण केली असून मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवणे, झाडांचे फांद्या कट करणे तसेच लाईटची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व विसर्जन कुंड्यातील सालाबादप्रमाणे बॅरिगेटिंग, फ्लेक्स, मंडप, लाईट, स्पीकर इत्यादीची सोय करण्यात आली आहे. त्याचबरोबर कंबर तलाव, गणपती घाट, हिप्परगा खाण येथे सी.सी.टीव्हीच्या माध्यमातून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. विसर्जनापूर्वी राहिलेली कामे पूर्ण करण्यासंदर्भात कारंजे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



### दहा दिवसांच्या गणपतींचे विसर्जन...

रुढी परंपरेनुसार दहा दिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जन केले. काहींच्या घरी नऊ दिवस तर काहींच्या घरी दहा दिवसांचे गणपती बाप्पा विराजमान होतात. त्यामुळे नऊ आणि दहा या दिवशी बाप्पांचे मोठ्या प्रमाणात विसर्जन झाले आहे. मात्र यंदाच्या वर्षी मंगळवारी अनंत चतुर्दशी आल्याने त्या दिवशी गणपती बाप्पाला निरोप देऊ नये , मंगळवार हा गणपती बाप्पाचा वार असल्याने यादिवशी गणपती बाप्पाचे विसर्जन करू नये, असे सांगण्यात आले आहे त्यामुळे दहाव्या दिवशी गणपती बाप्पांचे विसर्जन मोठ्या प्रमाणात झाले आहे.

**- श्रीनिवास भणगे, गणेशभक्त**

### अनंत चतुर्दशी निमित्त प्रशासन सज्ज

अनंत चतुर्दशीला लाडक्या गणरायाला निरोप दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने शहरातील विविध भागात असणाऱ्या विसर्जनस्थळांवर प्रशासनाच्या वतीने तयारी पूर्ण करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी आज दहाव्या दिवशी गणपती बाप्पांचे विधिवत पूजन करून विसर्जन करण्यात आले आहे. विसर्जन कुंडातील पाणी शुद्ध असून गणपती बाप्पांचे प्रशासनाकडून पावित्र्य राखले जात आहे.

**- नवनाथ बाबर, झोन अधिकारी सोलापूर महापालिका**

### ● असे राहणार कर्मचारी व यंत्रणा

श्री ची मूर्ती संकलनासाठी व विसर्जनासाठी ७ क्रेन,३ होडी व १०४ गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर १८ घंट्यागाड्या, ३ आरसीएस गाड्या, ८ मुख्य आरोग्य निरीक्षक,५० आरोग्य निरीक्षक,१८० सफाई कर्मचारी तसेच गणेश मूर्ती संकलना केंद्र व विसर्जन कुंड येथे ९०० मजूर इत्यादी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### ● डॉक्टरसह ॲम्बुलन्सची व्यवस्था

तसेच हिप्परगा खाण, नियोजन भवन,जगदंबा चौक,पद्मशाली चौक, नवी वेस पोलीस चौकी या अग्निशामक विभागाचे गाड्या उभे करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर डॉक्टर सह ॲम्बुलन्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मिरवणूक मार्गावरील मोकाट जनावर यांचे बंदोबस्त करण्यासंदर्भात संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या.

### ● गणेशभक्तांसाठी बैठक व्यवस्थेचे नियोजन

लष्कर मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या मिरवणूक मार्गांवर मोठ्या प्रमाणात पारंपारिक वाद्यवृद्धांची मिरवणूक काढण्यात येते. सदरच्या मिरवणुका पाहण्यासाठी आबालवृद्ध गणेशभक्त दाखल होतात. त्याच पार्श्वभूमीवर गणेशभक्तांना बैठव्यवस्था करण्यात येत आहे. सात रस्ता परिसरात भक्तांना बसण्यासाठी बेंचेस लावण्यात येत आहेत. तसेच मिरवणूक मार्गांवर करडी नजर ठेवण्यासाठी पोलीस टॉवर देखील उभारण्यात आले आहेत.

# प्रसिद्ध राज घराण्यातील ऐतिहासिक दुर्मिळ गणेश तिकीटांचा संग्रह

**तभा वृत्तसेवा,**
**ॲड.विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**
स्वातंत्र्य पूर्व काळामध्ये भारतात अनेक इतिहास प्रसिद्ध राजघराणी होती, त्या काळातील संस्थानिकांची चलनी नाणी, नोटा, स्टम्प, कोर्ट फी टिकीट बाँड पेपर, पोस्टकार्ड, व इतर ऐतिहासिक दस्तावेज सध्याच्या स्थितीत कालबाहा होत आहेत. या अमूल्य वारसांचा संग्रह गोळा करून ते संवर्धन करण्याचे कार्य सोलापुरातील इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर करत आहे.

स्वातंत्रपूर्व भारतात अनेक संस्थाने होती. त्यापैकी मिरज, सांगली, कुरूंदवाड जूनियर, जमखंडी आदी महत्वपूर्ण संस्थानाचे कुलदैवत श्री गणपती होते. हे संपूर्ण संस्थानिक राजघराणी गणेशाचे भक्त होते. म्हणूनच त्यांनी आपले आराद्य दैवत श्री गणरायाचा बसलेला फोटो विविध रंगात आपल्या संस्थनिक तिकीटावर, बाँड पेपरवर छापलेला दिसून येतो. असे विविध ४ आणे, ८ आणे, १० आणे, एक रूपया असे पेपर, कोर्ट फी, तिकीटे, मोडी दस्तावेज विविध असंख्य किमतीचे तिकीटे अणवेकर यांच्या संग्रही आहेत. गेल्या कित्येक वर्षापासून अनेक गावातील सर्व्हे करून संकलन करत आहेत. अणवेकर यांच्या संग्रहात १५० हून जास्त विविध संस्थानिकांची असंख्य पत्रे, तिकीटे, बाँड व विविध ४० हजारहून जास्त वापरलेले तिकीटे पाहायला मिळतात.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात संशोधनात्मक सर्वे करत असताना सिद्धापूर गावातील समाज सेवक संतोष सोनगे यांच्याकडील काही दुर्मिळ कागदपत्रे पाहताना सांगली संस्थानिकाच्या गणपतीचा फोटो असलेले पाहायला मिळाले. तेव्हा समजले की, सोलापूर जिल्ह्यातील काही माचे ही जुन्या सांगली संस्थानात मोडत होते हे कळाले. आज ही या परिसरातील अनेक गावातील लोकांकडे विविध गणपतीचे चित्रे असलेले संस्थानिकांची तिकीटे पाहायला मिळतात, असे अणवेकर यांनी सांगितले.










मंगळवेढा, सांगली, मिरज, कुरूंदवाड, वाडी, जमखंडी हा परिसर पटवर्धन संस्थांच्या अधिपत्याखाली होता. त्यांनी तत्कालीन सर्व व्यवहाराच्या कागदपत्रावर आपल्या आराध्यदैवताचे म्हणजेच गणतीचे चित्र छापले होते. त्या परिसरात जुन्या सर्व स्टँम्प पेपर, कोर्ट फी तिकीटावर आजही बसलेल्या गणपतीचे चित्र दिसून येतात.

**- नितीन कृष्णानंद अणवेकर,**
ऐतिहासिक तिकीट संग्रह, सोलापूर



# कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ सप्टेंबर-**
कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या ४३व्या स्मृतिदिनानिमित्त नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज, इंग्लिश मीडियम मध्ये अभिवादन करण्यात आले.

पर्यवेक्षक मधुकर धायगुडे यांच्या हस्ते कै.झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार समर्पित करण्यात आला. सहशिक्षक संभाजी सरगर यांनी बापूसाहेबांवर लिहिलेली सुरेल प्रार्थना गायली. यावेळी साक्षी बाबर हिने कै.झपके यांच्या जीवन प्रवासातील विविध संकल्पना स्पष्ट केली. त्यानंतर हरित सेना विभागाच्या वतीने प्राचार्य बिभीषण माने, स्कूलच्या मुख्याध्यापिका मंगल पाटील व हरित सेना विभाग सोमनाथ सपाटे यांच्या हस्ते पुण्यतिथीचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले.

# बाप्पा निघाले... २०० मंडळांचा विसर्जन मिरवणुकीत असणार सहभाग

## ● शहरात ११४८ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून नोंदणी
## ● शहरातील ८ रस्ते विसर्जन मिरवणुकीसाठी बंद



**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर -**
गणपती आले आले म्हणता त्यांच्या विसर्जनाची वेळ आली. १७ सप्टेंबर मंगळवारी सर्वत्र श्री विसर्जन मिरवणुक काढण्यात येणार असून सोलापूर शहरात ११४८ सार्वजनिक मंडळाकडून नोंदणी करण्यात आली आहे. त्यापैकी २०० मंडळे विविध मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकीत सहभागी होऊन श्रीं चे विसर्जन करणार आहेत. शहर वाहतूक शाखेकडूनही स्वतंत्र बंदोबस्त लावण्यात आला आहे.

### सोलापुरात गणपती विसर्जनासाठी वाहतुकीत मोठे बदल...

गणेश विसर्जन मिरवणुक मंगळवारी (दि.१७) रोजी काढण्यात येणार असून, या दिवशी मिरवणूक मार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी काही ठिकाणावरील वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. सकाळी सहावाजेपासून ते मिरवणूक संपेपर्यंत वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. शहरात जडवाहतुकीस बंदी ही मिरवणूक संपेपर्यंत असणार आहे. बंदीमध्ये मार्केट यार्ड चौक-जुना बोरामणी नाका-शांती चौक-अक्कलकोट रोड हा मार्ग जडवाहतुकीस येण्या-जाण्यास सुरू राहणार आहेत. गणपती विसर्जन मिरवणूक दिवशी पोलिसांची वाहने, अत्यावश्यक वाहने (रुग्णवाहिका, दवाखान्यांची वाहने, अग्निशामक वाहने, संरक्षित व्यक्तींची वाहने) यांना शहरातून प्रवास करण्यास परवानगी असणार असून बुधवार (दि.१८) सप्टेंबरपासून सर्व वाहतुकीचे मार्ग पूर्ववत होतील.

### गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकांचा मार्ग (बंद करण्यात आलेला मार्ग) :

● लोकमान्य गणेशोत्सव मंडळाचा मिरवणूक मार्ग : पत्रा तालीम-सळई मारुती-गवंडी गल्ली-मल्लिकार्जुन मंदिर-बाळीवेस-तरटीनाका पोलिस चौकी-पांजरापोळ चौक-मेकॅनिक चौक-सरस्वती चौक-लकी चौक-आसार मैदान ते गणपती घाट.

● मध्यवर्ती गणेशोत्सव विसर्जन मार्ग : दत्त चौक-राजवाडे चौक-गंगा विहीर (नवी पेठ)-चौपाड-विठ्ठल मंदिर-बालाजी मंदिर-पंजाब तालीम-मल्लिकार्जुन मंदिर-बाळीवेस-चाटीगल्ली-मंगळवार पेठ पोलिस चौकी-मधला मारुती-माणिक चौक-कसबा पोलिस चौकी-खाटीक मशीद-हाजीमाई चौक ते गणपती घाट.

● पूर्व विभाग गणेशोत्सव मंडळ : कन्ना चौक-जुनी जोडभावी पेठ पोलिस चौकी-वडलकोंड निवास-नेताजी नगर-भुलाभाई चौक-मार्कंडेय चौक-जोडबसवण्णा चौक-भद्रावती पेठ-सरकारी रूग्णालय-दत्त नगर-कुचन नगर-पद्मशाली चौक-जगदंबा चौक-जेलरोड पोलिस ठाणे-किडवाई चौक-बेगम पेठ चौकी-पंचकट्टा-पठाण बागेसमोरून विष्णू घाट.

● लष्कर विभाग गणेशोत्सव मंडळ : नळबाजार चौक-पेंढारी मस्जिद -मुर्गीनाला-सतनाम चौक-कुंभारगल्ली-मौलाली चौक-जगदंबा चौक-हुमा मेडिकल-सात रस्ता-शासकीय दुध डेअरी-पत्रकार भवन चौकमार्गे कंबर तलाव (धर्मवीर संभाजी तलाव).

● विजापूर नाका मध्यवर्ती मंडळ : विजापूर नाका बस स्टॉप-आयटीआय पोलिस चौकी-जुना विजापूर नाका-धर्मवीर संभाजी तलाव.

● होटगी रोड मध्यवर्ती मंडळ : महावीर चौक-बच्चुवार बंगला-पत्रकार भवनमार्गे धर्मवीर संभाजी तलाव.

● घरकुल मध्यवर्ती मंडळ : पंचमुखी देवस्थान-वैष्णवी मारुती मंदिर चौक-संभाजी शिंदे हायस्कूलसमोरून पोषम्मा चौक-महालक्ष्मी चौक-सागर चौक-विजय मारूती चौक-नवनीत चौक-वळसा घेऊन गणेश मंदिर-बी ग्रुप-श्रीनेत्र चौकातून म्हाडा विहीर.

● निलम नगर मध्यवर्ती मंडळ : दुर्गादेवी मंदिर-निलम नगर-सिद्धेश्वर चौक-माजी आमदार दिलीप माने संपर्क कार्यालय-मानाचा शिवगणेश मंदिर-करली चौक-बनशंकरी हॉटेल-पद्मा ट्रेडर्स-गवळी वस्ती-परळकर विहीर.




### सर्व प्रकारच्या वाहनांसाठी (पर्यायी मार्ग) :

● रेल्वे स्टेशन व एसटी स्टॅण्डकडे येणाऱ्या वाहनांसाठी विजापूर नाका-आय.टी.आय पोलिस चौकी-निर्मिती विहार-लिमयेवाडी चौक-सलगर वस्ती पोलिस ठाणे समोर-सलगरवाडी-नागोबा मंदिर-रेल्वे स्टेशन तसेच मरिआई चौक-शेटे नगर बोगदा-निराळेवस्ती-हॉटेल ॲम्बेसेडर-एसटी स्टॅण्ड असा पर्यायी मार्ग असेल.

● शहरातून ये-जा करणाऱ्या चारचाकी प्रवासी वाहनांसाठी जुना पुना नाका, जुना तुळजापूर नाका, जुना बोरामणी नाका, अशोक चौकमार्गे शहरात येण्याचा मार्ग असेल.

● विजयपूरहून पुणे व हैदराबादकडे जाणाऱ्या वाहनांसाठी नवीन विजापूर नाका येथून नवीन बायपासमार्गे केगाववरून सोलापूर विद्यापीठमार्गे पुढे.

● पुणे रोडकडून विजयपूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी नवीन पुना नाका येथून नवीन बायपासमार्गे विजयपूर रोडकडे.

● हैदराबादहून पुणे-विजयपूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी नवीन हैदराबाद नाका-जुना हैदराबाद नाका-मार्केट यार्ड-नवीन पुना नाका-नवीन केगाव बायपासमार्गे पुढे.

● बार्शी रोडवरील वाहनांसाठी बार्शी रोड टोल नाका येथून खेडमार्गे केगाव ब्रिज हा पर्यायी मार्ग राहील.

### ३५०० पोलिसांचा चोख बंदोबस्त :

सोलापूर शहर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व मध्यवर्ती मंडळांच्या मिरवणुकीसाठी चोख बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. सोलापूर शहरासह बाहेर ठिकाणाहूनदेखील पोलिस बंदोबस्त मागणविण्यात आला आहे. श्रीं च्या विसर्जन मिरवणुकीसाठी ३ पोलिस उपायुक्त, ६ सहायक पोलिस आयुक्त, २६ पोलिस निरीक्षक ९७ सहायक पोलिस निरीक्षक/पोलिस उपनिरीक्षक, १३५० कर्मचारी, ५०० होमगार्ड, राज्य राखीव पोलिस दलाची एक कंपनी असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या हस्ते शमी विघ्नेश मंदिरात आरती

**अक्कलकोट, दि. १६ सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी उत्तर पोलिस ठाणेचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांचा न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विविध धार्मिक विधिवत पूजा न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्याकडून करण्यात आली. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, विश्वस्त लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, आप्पा हंचाटे, गोटू माने, प्रविण घाटगे, नामा भोसले, कुमार सलबत्ते, दत्ता माने, पिंटू साठे, प्रा. शिवशरण अचलेर, राजू पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, सुमित कल्याणी, सतीश महिंद्रकर, किरण साठे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### भाजपाच्या ग्रामविकास विभाग ग्रामीण जिल्हा उपाध्यक्षपदी सोनिया गुप्ता

**बार्शी, दि. १६ सप्टेंबर-**


येथील सोनिया रोहित गुप्ता यांची भारतीय जनता पार्टीच्या पंचायतराज व ग्रामविकास विभागाच्या ग्रामीण जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या दीर्घकाळच्या कार्याचा हा मान असल्याचे मानले जाते. बार्शीतील गणपती मंडळाच्या कार्यक्रमात झालेल्या या निवडीत श्री. विशाल चंद्रकांत निलाखे यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. निवड झालेले प्रमाणपत्र अंकिता रणवीर राऊत यांनी प्रदान केले. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख व्यक्तींसह अनेक कार्यकर्ते आणि महिला नेत्यांनी सोनिया गुप्ता यांना त्यांच्या नव्या पदाबद्दल शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांमध्ये नगरसेवक विजय चव्हाण, युवराज ढगे, दिपक ढगे, ॲड. राजश्री तलवाड, शशोभा कांबळे, ममता चोप्रा, कविता चोप्रा, पूजा ढगे, मनीषा जाधव, ज्योती गोरे, माधुरी खेडकर, अर्चना शिंदे, प्रतिभा मोरे, रतन शिंदे, लक्ष्मी कांबळे, शालन नलगे यांचा समावेश होता.



### गुणवंत कर्मचारी पुरस्काराने अंबादास शिंदे सन्मानित

**अक्कलकोट दि १६ सप्टेंबर**

सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक माध्यमिक व उच्च्य माध्यमिक संघातर्फे अक्कलकोट तालुक्यातील उडगी हायस्कूल उडगी येथील प्रयोगशाळा परिचारक अंबादास तुकाराम शिंदे यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. उडगी (ता.अक्कलकोट) येथील अंबादास शिंदे हे ४१ वर्षापासून उडगी हायस्कूल येथे प्रशालेच्या स्थापनेपासून प्रयोगशाळा परिचारक म्हणून काम करत आहेत. विज्ञान प्रदर्शनात भाग घेऊन प्रशालेला पुरस्कार मिळवून दिला आहे. गावातील प्रत्येक सामाजिक कार्यात देखील ते सक्रिय सहभागी असतात. यात्रेतील अनेक नाटकांमध्ये त्यांनी भाग घेतलेला आहे. या सर्व सामाजिक व शैक्षणिक कार्याची दखल घेऊन सोलापूर जिल्हा माध्यमिक संघाकडून त्यांना आदर्श गुणवंत कर्मचारी म्हणून पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत आसगावकर, माध्यमिक शिक्षण अधिकारी जगताप, शिक्षण उपसंचालक मिरगणे, प्राथमिक शिक्षणाधिकारी शेख, लेखापरीक्षक राऊत, महाराष्ट्र मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तानाजी माने, मुख्याध्यापक संघाचे सल्लागार सुभाष माने यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. यावेळी उडगी हायस्कूलचे मुख्याध्यापक जानराव, माजी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व शंकरलिंग वसतीगृहाचे कर्मचारी उपस्थित होते.



### सांगोला रोटरी क्लबतर्फे शहरातील अभियंते सन्मानित

**सांगोला, दि. १६ सप्टेंबर-**

थोर अभियंते भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिन १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिनानिमित्त सांगोला रोटरी क्लब तर्फे शहरातील अभियंते यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी इंजि.मधुकर कांबळे,रमेश जाधव, संतोष भोसले, संतोष गुळमिरे, शरन्नाप्पा हळ्ळीसागर, बाळासाहेब नकाते, सदाशिव पुजारी, साई यादव, सुरवसे, रणजीत राऊत, चेतन कांबळे, विकास देशपांडे, विलास बिले यांचा तसेच या अभियंत्याना अध्यापन केलेल्या प्रा.बोराळकर, प्रा. भगवंत कुलकर्णी, प्रा.राजेंद्र ठोंबरे,अरविंद डोंबे गुरुजी यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रा.भगवंत कुलकर्णी, प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक रोटरी क्लब अध्यक्ष विकास देशपांडे यांनी तर आभार सचिव विलास बिले यांनी मानले.

## जल जीवन मिशन... प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये तीन नळ जलमित्रांची नेमणूक


### उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**



अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने बहु-कौशल्यावर आधारित जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये गवंडी (प्लंबर), मेकॅनिक, फिटर व इलेक्ट्रिशियन पंप ऑपरेटर याप्रमाणे तीन नळ जल मित्र यांची नेमणूक करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव यांनी दिली.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी जाधव म्हणाले, जिल्ह्यात शिखर समितीच्या मान्यतेनुसार प्रति ग्राम पंचायतीप्रमाणे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मल्टी स्किलीग आर. पी. एल. मॉडेलच्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या कौशल्य संच पुढीलप्रमाणे आहेत. प्लंबर (गवंडी), मोटर मेकॅनिक फिटर, इलेक्ट्रिशियन पंप ऑपरेटर या तीन ट्रेडसाठी ग्रामपंचायतीमधील पुर्वानुभव



असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे.

तसेच ग्रामसेवक यांनी प्रत्येक ट्रेड साठी ३ उमेदवार सहभागी करून एकूण ९ नळ जल मित्र त्याची गुणवत्ता यादीनुसार अनुक्रमे विहित नमुन्यातील पत्राद्वारे तयार व आधार कार्ड पंचायत समिती प्रमाणे अंतिम ९ पैकी ३ उमेदवार येथे सादर करावयाची आहे. निवड करण्यात येणार आहे तरी त्यानंतर त्यांची प्रि-स्क्रिनिंग टेस्ट इच्छुक उमेदवारांनी आपल्या ग्राम करण्यात येणार आहे. यामधून प्रति पंचायतीशी संपर्क साधावा असे ग्रामपंचायत कौशल्य संचसाठी आवाहनही उपमुख्य कार्यकारी एक ट्रेडसाठी एक उमेदवार प्रम अधिकारी जाधव यांनी केले आहे.



जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना कार्यान्वित घरगुती नळ जोडणीद्वारे प्रती माणसी प्रती दिन ५५ लीटर विहित गुणवत्तेसह व दैनंदिन स्वरुपात उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. सदर योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी व योजना शाश्वत टिकविण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायत स्तरावर तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता असणे आवश्यक आहे.

**- कुलदिप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी**



## कॅन्सर दिनानिमित्त ५८ महिलांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ सप्टेंबर**

बदलत्या जीवनशैलीमुळे कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. परंतु वेळीच निदान झाल्यास हा आजार रोखता येऊ शकतो. याचेच महत्व जाणत लायन्स क्लब बार्शी रॉयल व नर्गीस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय कॅन्सर दिनाचे औचित्य साधून मोफत कॅन्सर निदान शिबिराचे आयोजन दि. १४ सप्टेंबर , रोजी करण्यात आले होते. यास महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. ५८ महिलांची तपासणी या अंतर्गत करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रांतपाल एम जे एफ ला एम के आण्णा पाटील यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. व सरांनी उपस्थितांना मार्गदर्शन ही केले.

या कार्यक्रमासाठी किशोर परांजपे (प्रशासकीय अधिकारी, कॅन्सर हॉस्पिटल), डॉ. अपर्णा सरवदे (एम.सी.ओ., कॅन्सर हॉस्पिटल) व कॅन्सर हॉस्पिटलचा ८ जणींचा महिला स्टाफ तपासणीसाठी उपस्थित होता. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थित माजी प्रांतपाल एम जे एफ ला जितुभाई माढेकर व रीजन १ चे रीजन चेअरमन एम जे एफ ला राहुल माढेकर ही उपस्थित होते व त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रकल्प समन्वयक म्हणून ला. डॉ. स्नेहल माढेकर, ला. डॉ. किरण लाड व ला. डॉ. चित्रा अणवेकर या क्लब सदस्यांनी काम पाहिले. शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे तपासणीनंतर महिलांना मोफत मल्टीविटामीन, कॅल्शियम व गरजेनुसार इतरही औषधे मोफत देण्यात आली. यावेळी क्लबच्या अध्यक्षा ला. वर्षा खांडवीकर (अध्यक्ष), सचिवाला अमृता गुंडेवार व खजिनदार ला. राजुल कांकरीया या उपस्थित होत्या.



## करमाळ्यात लाडकी बहीण योजनेची जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१६ सप्टेंबर**

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार प्रत्येक गावात किमान ५० घरात जाऊन आम्ही मुख्यमंत्री लाडकी योजना पोहोचवत असून त्याची जनजागृती करत आहोत या योजनेत ज्या अडचणी येत आहे त्या अडचणी दूर करण्यासाठी महिला आघाडी सक्षमपणे काम करत आहे असे शिवसेना महिला आघाडीच्या समन्वय पद्मजा इंगोले यांनी सांगितले.

संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने व जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या मार्गदर्शनानुसार शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख आरती बसवंती, मोबीना मुलानी उपजिल्हाप्रमुख ज्योती शिंदे, साधना मोरे यांच्या आदेशाने करमाळा गाव भेट दौरा जिल्हा समन्वयक पद्मजा इंगवले यांनी सुरू केला आहे. तालुक्यातील ११८ गावात प्रत्येक ठिकाणी शिवसेना महिला आघाडी सुरू करणार असल्याचे पद्मजा इंगवले यांनी सांगितले.

## जिल्ह्यात गुरुवारी स्वच्छता महाश्रमदान

**एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी मोहीम**

### सीईओ कुलदीप जंगम यांची संकल्पना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

स्वच्छता ही सेवा या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा. येत्या १९ सप्टेबर रोजी जिल्ह्यात स्वच्छता महाश्रमदानाचे आयोजन करणेत साजरा करणेत आले आहे. या निमित्तीने सर्व ग्रामपंचायतींमध्ये स्वच्छता महाश्रमदान होणार आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

शिवरत्न सभागृहात जिल्ह्यातील गटसंसाधन केंद्रातील वॉश अंतर्गत अभियंते, बीआरसी व सीआरसी, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची बैठक प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी घेतली. या प्रसंगी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सनियंत्रण सल्लागार यशवंती धत्तुरे, जिल्हा प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, सहा. लेखाधिकारी अर्चना कणकी, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हटे, संवाद सल्लागार सचिन सोनवणे आदी प्रमुख उपस्थित होते.

स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत महाश्रमदान अंतर्गत एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी देणे साठी ठिकाणे निश्चित करणेत येणार आहेत. स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण व शहरी यांच्या संयुक्त विद्यमाने, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने याचाच एक भाग म्हणून प्रथम प्राधान्याने धार्मिक व अध्यात्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू, संस्थात्मक इमारती, वारसा स्थळे, नदी, समुद्र किनारे, कार्यालय, व्यावसायिक व बाजारपेठा, सार्वजनिक वाहतुक केंद्रे व अभयारण्ये परिसरात स्वच्छता करण्याकरीता जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये दि.१९ सप्टेंबर २०२४ रोजी महाश्रमदान एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी हे विशेष मोहिम राबविण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी सांगितले.



### सर्व ग्रामपंचायती नोंद होणार : शेळकंदे

ग्रामपंचायतींचा ६० टक्के निधी हा पाणी व स्वच्छतेसाठी राखीव ठेवणेत आला आहे. ज्या ग्रामपंचायती सहभागी होणेस टाळाटाळ करतील अशा ग्रामपंचायतींची नोंद घेतली जाणार असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी दिली. संबंधित विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांना जबाबदार धरणेत येईल. असेही शेळकंदे यांनी सांगितले.

## नागेश आडगांवकर यांच्या अभंगवाणीने वातावरण भक्तीमय

**विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती गणेशोत्सव महोत्सव**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ सप्टेंबर-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांच्यावतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके आणि सर्व सन्माननीय सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून प्रतिवर्षाप्रमाणे सुरू असलेल्या श्री संत तुकाराम भवन येथे श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवात पाचवे पुष्प महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक नागेश आडगांवकर यांनी गुंफले

सुरुवातीला सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, सदस्या शकुंतला नडगिरे व्यवस्थापक मनोज श्रोत्री. गायक नागेश आडगांवकर, रोहन पंढरपूरकर, ज्ञानप्रसाद फुलारी यांच्या हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीला सुंदर ते ध्यान



उभे विटेवरी अभंग गात वातावरण भक्तीमय करत विविध संतांच्या भावपूर्ण भक्तीरचना आपल्या दमदार व भावपूर्ण स्वरांतून सादर केल्या. गुरु उस्ताद रशीद खान यांची आठवणी जागवल्या. शेवटी सावळे रुपडे भैरवी गाऊन कार्यक्रमाची सांगता केली.त्यांना तितकीच सुंदर आणि साजिशी साथसंगत तबला रोहन पंढरपूरकर हार्मोनियम ज्ञानप्रसाद फुलारी पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ माऊली खरात, स्वरसाथ शुभम भोरकर, वैष्णव गेवतरकर, भैरवनाथ जाधव यांनी केली.अविस्मरणीय कार्यक्रम लक्षात राहील असा झाला.

सूत्रसंचालन विक्रम बिस्किटे यांनी केले. यावेळी पंढरपूर व पंढरपूर पंचक्रोशीतील कला रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी अधिकारी आणि कर्मचारी अधिक परिश्रम घेत आहेत या संगीत महोत्सवाची सांगता पं. रघुनंदन पणशीकर यांच्या गायनाने होणार असून यासाठी रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने करण्यात आले आहे.



## विनापरवाना वृक्षतोड वाहतूक करत असताना ट्रॅक्टर जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ सप्टेंबर-**

रविवारी सांगोला वनपरिक्षेत्राधिकारी तुकाराम जाधवर हे सांगोला नियत क्षेत्रात फिरती करत असताना सांगोला ते महूद रस्त्यावर विनापरवाना वृक्षतोड व वाहतूक करत असताना कडूलिंब लाकूड भरलेला ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. सदर ट्रॅक्टर वनपरिक्षेत्राधिकारी सांगोला कार्यालयाजवळ ठेवला आहे.

याप्रकरणी नितीन पांडुरंग बोंडरे रा.शिरभावी,राजू दिगंबर ओव्हाळ रा.वाकी शिवणे यांच्यावर वन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई सांगोला वनपरिक्षेत्राधिकारी सांगोला तुकाराम जाधवर यांनी केली. विनापरवाना करणाऱ्यांनी धसका घेतला आहे.



## २०० मी.धावणे स्पर्धेत कोमल अडसूळ प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ सप्टेंबर-**

तालुकास्तरीय २०० मी. धावणे स्पर्धेत ॲड. दिलीपराव सोपल प्रशालेतील कोमल नागनाथ अडसूळ नववी हिने प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे. तिला क्रीडाशिक्षक राहुल ठोंगे सर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मोहन ठोंगे, प्रशालेचे मुख्याध्यापक सचिन काळे व सर्व शिक्षक वृंद यांच्यातर्फे तिला शुभेच्छा देण्यात आल्या.

## महात्मा फुले पतसंस्थेतर्फे सभासदांना १५ टक्के लाभांश

### चेअरमन राजेंद्र गिरमे यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. १६ सप्टेंबर-**

येथील महात्मा फुले सहकारी पतसंस्थेने चालू आर्थिक वर्षात १३८ कोटी रुपयांची उलाढाल करून संस्थेने दोन कोटी एक लाखाचा नफा मिळवला. संस्था अधिक भक्कम राहण्यासाठी या नफ्यातून तरतुदी करून निव्वळ नफा ६८ लाख ६९ हजार इतका राहिला. संस्थेने स्थापनेपासून ऑडिट वर्ग अ तर मिळवलाच आहे परंतु संस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी यावेळी सालाबादप्रमाणे सभासदांना १५ टक्के डिव्हिडंट जाहीर करून सभासदांनी



मागणी केल्यानुसार भविष्यात यापेक्षा जास्त लाभांश देता येईल का याबाबत माहिती घेऊन तो देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

पतसंस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथील सौभाग्य मंगल कार्यालयात आयोजित केली होती. त्यावेळेस चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी गेल्या आर्थिक वर्षात संस्थेच्या उलाढालीचा व कामकाजाचा आढावा घेतला. त्यावेळेस त्यांनी बोलताना सांगितले की संस्थेकडे मोठ्या प्रमाणात ठेवींचा ओघ आहे परंतु कर्ज वाटप आणि ठेवी याचा ताळमेळ घालण्यासाठी सध्या काही दिवस ठेवी स्वीकारणे बंद केले आहे. संस्था चांगल्या प्रकारे ठेवीवर व्याज देत असल्यामुळे ठेवी वाढत आहेत. पतसंस्थेकडे एकूण १८ कोटी ३८ लाख ठेवी जमा आहेत. गुंतवणूक १४ कोटी ४९ लाख रुपये.

सभेसाठी संस्थेचे व्हाईस चेअरमन महादेव एकतपुरे, संचालक निळकंठ भोंगळे, किरण गिरमे, चंद्रकांत जगताप, अंकुश फुले, जयवंत चौरे, सुरज वाघमोडे, कृष्णा भजनावळे तसेच ज्येष्ठ सभासद विजय नेवसे या मान्यवरांसह संस्थेचे मॅनेजर योगेश कचरे, कर्मचारी वर्ग आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी स्वागत सुरज वाघमोडे यांनी केले तर आभार व्हाइस चेअरमन महादेव एकतपुरे यांनी मानले. वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल वाचन व आर्थिक व्यवहारावर सभासद विजय नेवसे यांनी विचारलेल्या प्रश्नाला मॅनेजर योगेश कचरे यांनी उत्तरे दिली.

## प्रचंडे प्रशालेत हिंदी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ सप्टेंबर-**

नागणसूर (ता.अक्कलकोट) येथील प्रचंडे प्रशालेत हिंदी दिन साजरा झाला. प्राचार्य शंकर व्हनमाने व सुनीता बंदीछोडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. आठवीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी स्वागत गीतांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविक शिक्षक संजय गंगदे यांनी केले. याप्रसंगी चित्रलेखन, शब्दलेखन आणि भाषण स्पर्धेतील विजेत्यांचे प्रमाणपत्र व शैक्षणिक साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. सदर स्पर्धेत सारिका प्रचंडे, भाग्यश्री धनशेट्टी, प्रणिता बोरगाव, अनिल सावळी, ऊर्वी मेणसे, सौंदर्या मांग, सारिका नागलगाव, सानिया पट्टेवाले, सौंदर्या कोळी, सुमैय्या मुजावर इत्यादी विद्यार्थ्यांनी यश मिळवले. याप्रसंगी युसुफ मकानदार या विद्यार्थ्याने शेरोशायरी प्रस्तुत केले. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी मनोगत व्यक्त केले. पारितोषिक समारंभाचे नियोजन आरती देवरमनी, पूजा राठोड, नम्रता खिलारी, रक्षिता कुसेकर, तनिषा नदाफ, संस्कृती खिलारी यांनी केले. सूत्रसंचालन कुमारी अंबिका खेड तर आभार श्रद्धा चव्हाण यांनी केले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये एमबीए अभ्यासक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ सप्टेंबर-**

येथील शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या एमबीए या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात अभिमुख (ओरिएंटेशन) कार्यक्रमाने करण्यात आली.



यावेळी प्रा. नितीन कंगळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. प्रा. सविता उपल्ली यांनी विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाविषयी माहिती देत एमबीए या अभ्यासक्रमाविषयी विषद केले. प्राध्यापक भरत साठे यांनी अभ्यास केंद्रांची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. या वेळी विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्राध्यापिका कुमारी स्नेहा यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सहकार महर्षी कै. शंकरराव - मोहिते पाटील व कै. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाला एमबीए अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेले विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी घेतली धनगर समाजाच्या उपोषणकर्त्यांची भेट

**पंढरपूर, दि. १६ सप्टेंबर-**

धनगर समाजाची एसटी प्रवर्गामध्ये अंमलबजावणी व्हावी या मागणीसाठी गेल्या आठ दिवसांपासून सकल धनगर समाजाच्या प्रतिनिधींचे टिळक स्मारक, पंढरपूर येथे आमरण उपोषण सुरू आहे. डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी त्यांच्या समवेत निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे उपस्थित होते. तसेच दि. १५ सप्टेंबर रोजी सह्याद्री अतिथी गृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत सकल धनगर समाजाच्या प्रतिनिंधी सोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आलेले मुख्यमंत्री यांची स्वाक्षरी असलेल्या निर्णयाची प्रत विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार यांनी उपोषणस्थळी सविस्तर वाचून दाखवली. सदर प्रत उपोषणकर्त्यांना देण्यात आली. समाजासाठी आपण सुदृढ आणि व्यवस्थित राहणं गरजेचं असून, उपोषणकर्ते यांना उपोषण सोडण्याची विनंती त्यांनी यावेळी केली. त्याचबरोबर आमदार गोपीचंद पडळकर, माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनीही बैठकीत झालेल्या निर्णयाबाबतची माहिती यावेळी दिली.




### सुशीलरत्न पुरस्काराने अशोक पाचकुडवे सन्मानीत

**सांगोला, दि. १६ सप्टेंबर-**

मोहोळ येथील पंचशील मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवा निवृत्त शिक्षक तसेच संगीत विद्यालयाचे सचिव प्रा.अशोक पाचकुडवे यांना शैक्षणीक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सोलापूर येथे सुशीलरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ड्रीम फाऊंडेशन परिवार, चाणक्य अकादमी व सुशील स्पर्धा परीक्षा आभ्यसिका यांच्या संयुक्त विद्यमाने या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी सहाय्यक पोलीस आयुक्त दिपक आर्वे, जेष्ठ लेखिका माजी प्राचार्या डॉ. नसीमा पठाण यांच्या हस्ते सन्मान पत्र, सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. यावेळी राजेश फडकुले, सामजिक कार्यकर्त्या ज्योती आलकुंटे, संगीता पाटील ड्रीम फाऊंडेशनचे सर्वेसर्वा काशिनाथ भतगुणकी, भुजंगराव पाचकुडवे, शिवाजी आवारे, बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष प्रा. प्रकाश शिंदे, जिल्हा अध्यक्ष युवराज भोसले, शिवाजी जगताप उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष यशवंत गुंड, उपाध्यक्ष संतोष गायकवाड, प्राचार्य सुधीर गायकवाड, बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेश आण्णासाहेब भालशंकर आदींनी त्यांचे आभिनंदन केले.



### तालुकाध्यक्षपदी शंकर सुरवसे; जिल्हा उपाध्यक्षपदी पवार, पावले

**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

पंढरपूर तालुका रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेच्या प्र. तालुकाध्यक्ष व शहराध्यक्षपदी शंकर सुरवसे व जिल्हा संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी शरद पवार व दिलीप पावले तर जिल्हा प्रवक्तापदी विजय कुलकर्णी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पंढरपूर येथे पार पडलेल्या रास्त भाव दुकानदार संघटनेच्या बैठक शुभारंभ प्रसंगी अखंड हिंदुस्थानचे आराद्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर व स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ माँसाहेब ह्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पित करत अभिवादन केले. यानंतर श्री.विठूमाऊलीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. संघटना वाढीसाठी युवकांना संधी देत जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर, यांनी तालुकाध्यक्ष शंकर सुरवसे, शरद पवार, विजय कुलकर्णी, वहाब शेख, उमेश आसादे यांना सन्मानपुर्वक नियुक्तीपत्र देऊन पदाची घोषणा केली. यावेळी प्रभारी तालुकाध्यक्ष व पंढरपूर शहराध्यक्ष पदी शंकर सुरवसे व जिल्हा संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी शरद पवार व दिलीप पावले तर जिल्हा प्रवक्ता पदी विजय कुलकर्णी ह्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे- कौशल्या पाटील: जिल्हा संघटक, आप्पा भुई : तालुका संघटक, नाना भुई :जिल्हा संघटक, सुधाकर शेळके -जिल्हा संघटक, सुरेश पवार :-जिल्हा संघटक, दीपक यलमार -जिल्हा संघटक, शहर उपाध्यक्ष : अपर्णा तारके, संजय पवार, शहर संघटक : सागर जाधव, सचिव : सोमनाथ कुलकर्णी, सह सचिव अमर भांडेकर, खजिनदार सोहम भिंगे, मार्गदर्शक मंडळ हरिभाऊ चव्हाण, शशिकांत सुगंधी, विठ्ठल भिसे, माऊली पारसवार आदी आहेत.ह्या सर्व नूतन पदाधिकारी नियुक्ती पत्र यावेळी मान्यवर उपस्थित यांच्या हस्ते देण्यात आले.

## ठेकेदाराचा हलगर्जीपणा; तीन तालुक्यांमध्येच आनंदाचा शिधा

### आठ तालुक्यातील लाभार्थ्यांकडून नाराजीचा सूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ सप्टेंबर-**

गौरी-गणपतीनिमित्त राज्य सरकारच्या वतीने आनंदाचा शिधा वाटप करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र ठेकेदाराने वेळेत शिधा कीट न पाठविल्याने अवघ्या ३ तालुक्यातच हा आनंदाचा शिधा वाटप करण्यास सुरूवात झाली आहे. गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना झाली आणि आता बाप्पा गावाला निघाले तरी इतर ८ तालुक्यातील जनतेला अद्यापही हा आनंदाचा शिधा मिळाला नाही. दरम्यान, याला जबाबदार शिधा कीट वितरण करणारा ठेकेदारच असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली.

जिल्ह्यातील उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट या तीन तालुक्यातच या शिधाचे वाटप झाले मात्र उर्वरित आठ तालुक्यात शिधा मिळाला नाही. अद्याप रेशन दुकानात शिधा उपलब्ध झालेला नाही. उद्या दि. १७ रोजी बाप्पांच्या विसर्जन मिरवणुकीची तयारी झाली मात्र शिधाचा पत्ताच नाही. लाभार्थी रेशन दुकानात चकरा मारून वैतागले असून, अक्षरशः शिधापत्रिका धारकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

यंदाच्या वर्षी गौरी-गणपती सणानिमित्त शासनाने पुन्हा आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला होता मात्र ठेकेदाराने रेशन पुरवठा न केल्याने नागरिकांना हा शिधा मिळाला नाही. अद्याप काही तालुक्यात शिधा न पोहोचल्यामुळे लाभार्थी चकरा मारून वैतागले आहेत. जिल्हा व शहर पुरवठा विभागाच्या वतीने व्यवस्थित नियोजन केले असते तर शिधा वेळेत, सुरळीत वितरीत झाला असता असेही लाभार्थी म्हणत आहेत.

> सोलापूर शहरात अंत्योदय - ६ हजार ०८९, अन्नसुरक्षा १ लाख १३ हजार ७०० असे लाभार्थी आहेत तर सोलापूर ग्रामीण लाभार्थी अंत्योदय ५९ हजार २३३, अन्नसुरक्षा ३ लाख ५० हजार ४५४ आहेत. तीन तालुक्यांत शिधा वाटप करण्यात आला आहे. उर्वरित आठ तालुक्यांत वाटप व्हायचे बाकी आहे. पुरवठा विभागाकडून अद्याप आनंदाचा शिधा वितरित झालेला नाही. त्यामुळे शिध्याच्या आम्ही प्रतीक्षेत आहोत. साखर, रवा आलेला उर्वरीत दोन वस्तू आल्या नाहीत. रोज पाठपुरावा करीत आहोत. दोन दिवसांत आनंदाचा शिधा येईल.
>
> **- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी**




> सोलापूर शहरात ३१४ पैकी फक्त १०० दुकानात आनंदाचा शिधा मिळाला असून, एका दुकानात वाटप आणि दुसऱ्या वाटप होत नसल्यामुळे ग्राहक व दुकानदार यांच्यामध्ये शाब्दिक चकमकी होत आहेत. अद्याप काही दुकानात आनंदाचा शिधा पोहोचला नाही. त्यात काही दुकानात फक्त रवा पोहोचला आहे. यामुळे त्यांनाही शिधा कीट बनविता येत नाहीत. यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी आणि शहर पुरवठा अधिकाऱ्यांनी ठेकेदारांकडून कीट लवकर उपलब्ध करावेत.
>
> **- नितीन पेंटर, जिल्हाप्रमुख, रेशन दुकानदार संघटना**

## कुकडीच्या पाण्याने मांगी तलाव ओव्हरफ्लो

### आमदार संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१६ सप्टेंबर-**

करमाळा तालुक्याचे आमदार संजयमामा शिंदे यांचे आमदार झाल्यापासून मांगी तलावाकडे लक्ष आहे. मांगी तलावाला कुकडीचे पाणी कायमस्वरूपी मिळावे यासाठी महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्येच बंद पाईप मधून तलावाला पाणी देण्याचे सर्वेक्षणाचे आदेश माजी मंत्री जयंत पाटील कडून आमदार शिंदे यांनी घेतले होते. या बाबीवरतीच समाधान न मानता आमदार संजयमामा शिंदे यांनी कुकडी प्रकल्पाचे करमाळा तालुक्याचे हक्काचे पाणी उजनी धरणात सोडावे व तिथून कुकडी उजनी उपसा सिंचन योजना टप्पा १ आणि टप्पा २ या माध्यमातून ते पाणी लाभक्षेत्रातील चाळीस गावाच्या २४ हजार हेक्टर क्षेत्राला देण्याचे धोरण आखले. हे धोरण आखत असतानाच टप्पा २ वरून मांगी तलावाला पाणी देण्याचे नियोजनही आ. संजयमामा शिंदे यांनी आखले. गतवर्षी दुष्काळामुळे मांगी आणि पंचक्रोशी यांना फटका बसलेला होता. याची दखल घेऊन आ.संजयमामा शिंदे यांनी यावर्षी कुकडी प्रकल्पामध्ये चांगले पर्जन्यमान होत असताना २६ जुलै २०२४ रोजी अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य कृष्णा खोरे महामंडळ यांच्याकडे ओव्हरफ्लो चे पाणी मांगी तलावत सोडण्याची मागणी सर्वप्रथम केली आणि त्यानुसार जुलैमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे १६ सप्टेंबर २०२४ अखेर मांगी तलाव ओहर फ्लो होत आहे.आमदार संजयमामा शिंदे यांचे हे ऋण मांगी गावासह या तलावाच्या पाण्याच्या उजव्या आणि डाव्या कालव्यावर अवलंबून असलेल्या गावातील जनता कधीही विसरणार नाही.

> **मांगीच्या डाव्या व उजव्या कालव्याचे दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर : एस.के.अवताडे**
>
> उपअभियंता, कुकडी डावा कालवा उपविभाग क्र. १२.यांत्रिकी विभागाकडून करमाळा पाटबंधारे विभागाला मशिनरी उपलब्ध झाल्यामुळे गेल्या १५ दिवसापासून मांगी तलावाच्या उजवा आणि डावा या दोन्ही कालव्याच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. मांगी तलावाच्या लाभक्षेत्रातील गावांच्या मागणीनुसार या दोन्ही कालव्याला पाणी देण्याचे नियोजन आखलेले आहे.



## आ. राऊतांच्या आंदोलनाला ७९ ग्रा.पं., ४८ संघटनांचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि १६ सप्टेंबर-**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे व यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे, तसेच कोणतीही अट न घालता राज्यातील सर्वच समाज घटकांतील मुला-मुलींना सर्वच प्रकारचे शिक्षण मोफत द्यावे या मागणीसाठी आमदार राजेंद्र राऊत यांनी गुरुवारपासून सुरु केलेल्या ठिय्या आंदोलनाच्या चौथ्या दिवशी ही विविध संस्था, संघटना, व्यापारी, ग्रामपंचायती यांचा पाठिंबा मिळत असून तालुक्यासोबतच शेजारच्या तालुक्यातील मराठा बांधव ही पाठिंबा देण्यासाठी येत आहेत.

बीड व उस्मानाबाद येथील मराठा बांधव आंदोलन स्थळी भेट देऊन चर्चा करीत आहेत. २८८ आमदारांपैकी फक्त एका आमदारांनी ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन करावे हेही समाजासाठी भूषणच आहे, अशी चर्चा नागरिकांतून होत आहे.

गुरुवारपासून आमदार राऊत यांनी बार्शीतील शिवसृष्टी मधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर बेमुदत ठिय्या आंदोलनाला सुरुवात केली आहे. आजच्या चौथ्या दिवशी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिवसभर कार्यकर्ते व समाज बांधव येत होते. भूम, परांडा, वाशी, कळंब, तुळजापूर, धाराशिव आदी तालुक्यातील बांधव येत होते. ब्राह्मण महासंघ, मराठा सेवा संघ, प्रबुद्ध भारत, चर्मकार समाज आदींनी मागणीला पाठिंबा दिला आहे.

## वडवळच्या नागनाथ तीर्थक्षेत्रास निधी देण्यासाठी वचनबद्ध

### ‘भिमा’चे चेअरमन विश्वराज महाडिक, सुनील चव्हाण यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १६ सप्टेंबर-**

भाजपाचे खासदार तथा भीमा सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा खा. धनंजय महाडिक माध्यमातून महायुती शासनाकडे केलेल्या अविरत पाठपुराव्यामुळेच वडवळसारख्या जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या नागनाथ तीर्थक्षेत्रास चार कोटींचा निधी मिळू शकला. यापुढील काळातही भाजपाच्या माध्यमातून मोहोळ तालुक्यातील मूलभूत सोयी सुविधांसाठी शासनस्तरावरून निधी मंजूर करण्यासााठी निश्चितपणे वचनबद्ध राहू, अशी ग्वाही भीमा कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी वडवळ येथे दिली.



श्री नागनाथ देवस्थान वडवळ (ता.मोहोळ) या तीर्थक्षेत्रास सोलापूर जिल्हा पर्यटन विकास आराखड्या अंतर्गत पायाभूत सुविधांसाठी ४ कोटींचा निधी राज्य शासनामार्फत मंजूर केल्याबद्दल श्री नागनाथ देवस्थान कमिटी वडवळ यांच्यावतीने भीमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विश्वराजभैय्या महाडिक व मोहोळ तालुका भाजपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समिती सदस्य सुनील चव्हाण यांचा श्रीक्षेत्र वडवळ येथे सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते वडवळ येथे बोलत होते.

श्री नागनाथ देवस्थान कमिटीचे अध्यक्ष ह. भ. प. श्रीकांत शिवपुजे महाराज, भिमाचे माजी संचालक ह. भ. प. सुरेश शिवपूजे महाराज सोलापूर जिल्हा भाजप उपाध्यक्ष सुशीलभैय्या शिरसागर,द्रोणाचार्य लेंगरे, महेश कोटीवाले मुजीब मुजावर इत्यादी उपस्थित होते.

## पंढरपुरात विविध विकासकामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ सप्टेंबर-**

उद्योजक राजू खरे यांच्या मागणीनुसार मतदार संघामध्ये शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ज्या ठिकाणी शासनाचा निधी आला नाही. त्याच कामासाठी स्वनिधीचा वापर करीत विकास कामे सुरु करण्यात आली आहेत. या विकासकामांचा शुभारंभ उद्योजक राजू खरे यांच्या हस्ते पार पडला.

उद्योजक राजू खरे यांनी कोट्यावधी रुपयाचा निधी मतदार संघातील विविध गावांमध्ये मंजूर करून आणला आहे. यापैकी पंढरपूर तालुक्यातील चळे येथे विविध विकास कामाच्या ८० लाख रुपये, नेपतगाव येथील ३० लाख रुपये, आंबे येथील ३५ लाख रुपये या वरील तीनही गावातील विविध विकास कामांचा शुभारंभ खरे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी संतोष गायकवाड, सरपंच ज्ञानेश्वर शिखरे, उपसरपंच दीपक मोरे, अतुल मोरे, रणजीत सोनटक्के, बालाजी वाघमारे, सुशील वाघमारे, गोरख गायकवाड, मंगेश गायकवाड, अजय वाघमोडे, सुधाकर मोरे, दरलींग फडतरे, अमोल वाघमारे, धनाजी माने, लखन वाघमारे, रुपेश वाघ, श्रीकांत पंडित, अण्णासाहेब खिलारे, विजय वाघमारे, राजाराम सावंत, दिलीप कोळी, सरपंच सुशील सावंत, उपसरपंच निशाल शिंदे, माऊली कोळी, जयवंत अंकुशराव, अरुण शिंदे, गणेश कांबळे, महादेव शिंदे, नितीन शिंदे, लक्ष्मण गायकवाड, हरी गायकवाड, संभाजी धनवले, नेपतगाव येथील सरपंच आशाबाई पांडुरंग परकाळे, भास्कर हेगडकर, बाळासाहेब बुधनेर, तानाजी येडगे,अशोक कदम, ज्ञानेश्वर लवटे, महेंद्र क्षीरसागर, पोलीस पाटील कुबेर पाटील, अण्णासाहेब कदम, प्रभाकर क्षीरसागर, अभिजीत पालवे, आनंद वाघ, वसंत परकाळे, ज्ञानेश्वर कदम, दामोदर वगरे, श्रीमंत घोडके, नोमिनाथ क्षीरसागर, विठ्ठल हेगडकर, अंकुशराव येडगे, अजित कदम उपस्थित होते.



## केळी उत्पादकांना ‘अच्छे दिन’

### केळीला प्रतिकिलो ३२ रूपये दर

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१६ सप्टेंबर-**

उमरड (ता.करमाळा) येथील केळी उत्पादक शेतकरी अनिल व सुनिल वलटे बंधूच्या शेतातील केळीला प्रतिकिलो ३२ रूपये दर मिळाल्याने केळीच्या गाडीचे पूजन करून फटाके वाजवत केळी खरेदी केलेल्या व्यापाऱ्याचा फेटा बांधून सन्मान करत आनंद व्यक्त केला आहे.

साडे तीन एकर क्षेत्रावरील केळीची हार्वेस्टिंग सुरू असून नव्वद टन उत्पादन मिळून पंचवीस ते सत्तावीस लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. सध्या बाजारात केळीला मोठी मागणी असून केळीची उपलब्धता कमी असल्याने काढणीस आलेल्या केळीला चांगला दर मिळत असल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे



उमरड (ता.करमाळा) येथील शेतकरी अनिल वलटे व सुनील वलटे या वलटे बंधनी केडगाव ता करमाळा हद्दीमधिल विकत घेतलेल्या साडेतीन एकर क्षेत्रावर जैन कंपनीच्या जी नाइन जातीच्या टिश्यू कल्चर केळी रोपांची लागवड केली होती. याअगोदर कांद्याचे पिक घेतल्याने जमीनीचा पोत चांगला होता. शेणखताचा वापर करून चांगली मशागत केली होती नंतर ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खतांचा वापर करून केळीचे जोमदार पिक उभे केले. वेळोवळी फ्रुटकेअर करून योग्य पाणी व खत व्यवस्थापन केल्याने अकरा महिन्यांत केळी हार्वेस्टिंगला आली. सध्या निर्यातक्षम केलेला आखाती देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याने व शेतकऱ्यांकडे अपेक्षित उपलब्धता नसल्याने केलेला चांगला दर मिळत असून कंदर येथील व्यापारी बालाजी पाटील यांनी केळी शेतामध्ये प्रति किलो ३२ रुपयाचा दर ठरवून एकाच दिवशी वीस टन केळी काढून आखाती देशांकडे निर्यातीसाठी पाठवली आहे अनखी पन्नास टन उत्पादन अपेक्षित असून असा दर राहीला तर पंचवीस ते तीस लाख रुपये उत्पन्न अपेक्षित आहे.

## सांगोल्यात ईद-ए-मिलाद साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१६ सप्टेंबर-**

हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती सोमवार दि.१६ सप्टेंबर रोजी सांगोला शहरात मोठ्या उत्साही वातावरणात पार पडली. पैगंबर जयंती निमित्त सांगोला शहरातील शाही जामा मस्जिद येथून भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली होती.



यावेळी आका की आमद मरहबा, लबैक या रसूल अल्लाह,नारे तकबीर अल्लाह हू अकबर, सरकार की आमद मरहबा असा जयघोष करण्यात येत होता.या शोभायात्रेत हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. शोभायात्रेत हिंदू-मुस्लिम बांधवांनी खाऊ, सरबत, पाणीचे वाटप केले. शोभायात्रा ‘स्वच्छ सुंदर सांगोला’ चा शहरवासियांना संदेश दिला.

शेवटी शाही जामा मस्जिद येथे ज्या मुलां-मुलींचे पवित्र कुराण पठण पूर्ण झाले. त्यांचा सत्कार करून त्यांना यावेळी भेटवस्तू देण्यात आली. यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शोभायात्रा कमेटीचे अध्यक्ष नूरमोहम्मद मणेरी, नजीर मुलाणी, सद्दाम बागवान, गणी मुजावर,आयाज मणेरी, निहाल तांबोळी यांनी परिश्रम घेतले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लोकमंगल माऊली कारखान्याचे रोलर पुजन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ सप्टेंबर -**
लोहारा तालुक्यातील लोहारा (खुर्द) येथील लोकमंगल माऊली इंडस्ट्रीज लिमिटेड या कारखान्याचे हंगाम सन २०२४-२५ करीताचे रोलर पुजन दि.१५ सप्टेंबर रोजी हभप. महेश महाराज माकणीकर व कारखान्याचे संचालक प्रशांतजी पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी वरिष्ठ सर व्यवस्थापक छगन भोगाडे, पंचक्रोशीतील शेतकरी बांधव, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, यांच्यासह मान्यवर विभाग प्रमुख व कर्मचारी बांधवांच्या उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### आ. पाटील यांनी केली त्रिविक्रम मंदिराची पहाणी

**तेर, दि.१६ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील पुरातन त्रिविक्रम मंदिराची आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी १५ सप्टेंबरला पहाणी केली. राज्यात सर्वात पुरातन असलेले त्रिविक्रम मंदिर असून गर्भगृहाच्या समोरील लाकडी मंडप पडण्याच्या स्थितीत होता. आ. पाटील यांनी यांची दखल घेऊन सांस्कृतिक विभागाच्या वतीने दोन कोटी नव्वद लाख रुपये निधी मंजूर केला आहे. पुरातत्व विभागाच्या वतीने त्रिविक्रम मंदिराच्या गतवैभवास प्रारंभही झालेला असून आ. पाटील यांनी वामन जयंती निमित्ताने त्रिविक्रम मंदिरास भेट देऊन दर्शन घेतले व मंदिर कामाची पहाणी केली. यावेळी श्री संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पद्माकर फंड, उपसरपंच श्रीमंत फंड, नवनाथ नाईकवाडी, विठ्ठल लामतुरे, अजित कदम, संजय धाकपाडे, विजयकुमार बडवे, कल्याण कानडे, बाळकृष्ण बडवे, अभिजित करंडे, अर्शाद मुलांनी आदी उपस्थित होते.



### दहिटणा ग्रामपंचायत उपसरपंचपदी माधुरी पाटील यांची बिनविरोध निवड

**जळकोट, दि.१६ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील दहिटणा ग्रा.पं.च्या उपसरपंचपदी माधुरी पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी सरपंच शिवकांता कांबळे, विस्तार अधिकारी आगतराव कावळे, ग्रामसेवक मोकाशी, आप्पासाहेब पाटील, सोमनाथ गुड्डे, संजय कदम, शंकर कांबळे, केरणाथ वाघमारे, शंकर चव्हाण, परमेश्वर कांबळे, राजेंद्र नागरसे, राजेंद्र कदम, सुभाष पाटील, नंदकुमार पाटील, विश्वनाथ कुंभार, श्रीपती पाटील, हनुमंत बिराजदार, सिद्धाराम पाटील, प्रशांत पाटील, रोहित नागरसे, सागर सुरवसे, मेजर गोकुळ वाघमारे यांच्या ग्रामस्थ उपस्थित होते.



### शासकीय तंत्र प्रशालेत संविधान मंदिर उद्घाटन सोहळा

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**
धाराशिव जागतिक लोकशाही दिनानिमित्त आज दि.१५ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तंत्र प्रशालेत संविधान मंदिराचे उद्घाटन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते (अभासी पध्दतीने) करण्यात आले. शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, धाराशिव येथील संविधान मंदिराचे उद्घाटन धाराशिव जिल्हा व्यवसाय व शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण जे. औताडे यांच्या हस्ते व प्रमुख पाहुणे अविनाश पोफळे यांच्या उपस्थितीत संप्पन झाले. यावेळी धाराशिव नगरीतील ज्येष्ठ नागरीक माने, देशमुख, जाधव आणि धाराशिव प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचनाकेंद्राचे का. अधिक्षक एम.जी.पिसे यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमास शासकीय तंत्र प्रशाला, केंद्र धाराशिव व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय धाराशिव येथील सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच विविध शाळामधील विद्यार्थी देखील उपस्थित होते.



### बावी आश्रमशाळा कबड्डी स्पर्धेत धाराशिव तालुक्यात अव्वल

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**
जय हिंद विद्यालय तडवळे येथे दि.१३ व १४ सप्टेंबर रोजी शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये वसंत प्राथमिक आश्रमशाळा बावी मुले वय वर्षे १४ गटातील विद्यार्थ्यांनी प्रतिस्पर्धी संघ जय हिंद विद्यालय तडवळे यांच्यावर अंतिम सामन्यांमध्ये १२ गुणांनी विजय मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला. त्याचबरोबर १९ वर्षे मुले वयोगटाच्या अंतिम सामन्यात जवाहर कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ प्रतिस्पर्धी येडशीच्या संघावर तब्बल २३ गुणांनी विजय मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला. त्याचबरोबर १४ वर्षे वयोगटामध्ये मुलींचा संघ द्वितीय आला. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विदयानंद राठोड, प्राचार्य दयानंद राठोड यांनी अभिनंदन केले. या विजयासाठी कृष्णा राठोड, धिरज राठोड, अभिजित राठोड, अमर राठोड, या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.

---

लाडक्या बाप्पाला निरोप; गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात...

# धाराशिव जिल्ह्यात ९९९ गणेश मूर्तींचे आज विसर्जन

### जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**
धाराशिव जिल्ह्यात यावर्षीच्या गणेशोत्सवात एकूण १४८५ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना केली होती त्यापैकी ४१० गणेश मूर्तींचे विसर्जन झाले असून अनंत चतुर्दशीच्या दिवशी ९९९ गणेश मूर्तींचे विसर्जन होणार आहे. यासाठी जिल्हा पोलीस दलाने पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

गणेश विसर्जना दरम्यान ईद-ए-मिलाद जुलूस काढण्यात येणार नसून धाराशिव, नळदुर्ग शहर, लोहारा आणि कळंब येथे १९ सप्टेंबर रोजी तर परंडा येथे १८ सप्टेंबर रोजी जुलूस मिरवणुका काढण्यात येणार आहेत.



ईद-ए-मिलाद आणि गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसोबत ४२१ बैठका, शांतता कमिटीच्या २१८ बैठका, मोहल्ला समितीच्या, १६१ बैठका तसंच इतर विभागांच्या ५४ बैठका घेऊन जिल्ह्यातील सण उत्सव शांततेत आणि वातावरणात पार पडावे या दृष्टीने प्रयत्न केले असून यादरम्यान १५८६ गुंड उपद्रवी समाजकंटक व गुन्हेगारी वृत्तीच्या इसमाविरुद्ध विविध कायद्याप्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आले आहेत. मिरवणुकांवर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस विभागाकडून ड्रोन कॅमेराचा पहिल्यांदाच वापर करण्यात येणार असून नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करून सण उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत केले. या पत्रकार परिषदेत बोलताना जाधव पुढे म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यात गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे दोन्हीही सामाजिक उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने उपविभागीय अधिकारी स्तरावरील पाच अधिकारी वीस पोलीस निरीक्षक ४७ पोलीस उपनिरीक्षक १३५० पोलीस कर्मचारी, दोन दंगल नियंत्रण पथक दोन जलद प्रतिसाद पथक तसेच राज्य राखीव दलाची एक तुकडी याशिवाय स्ट्राइकिंग फोर्स याची तीन पथके आणि उपविभागीय अधिकारी स्तरावरील पाच पथके सोबतच ७७० होमगार्ड या बंदोबस्तासाठी असणार आहेत.

श्री गणेश विसर्जन आणि ईद-ए-मिलाद अनुषंगाने नागरिकांनी एकमेकांच्या धार्मिक परंपरा आणि रीती रिवाजांचा आदर करून सौहार्दपूर्ण वातावरणात सण उत्सव शांततेत पार पाडावेत, नागरिकांनी अफवांवर आणि सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या संदेशावर विश्वास न ठेवता सण उत्सव शांततेत पार पाडावेत यादरम्यान डीजे अथवा मोठ्या आवाजाच्या स्पीकर लावू नये, गणेश विसर्जन मिरवणुका दिलेल्या वेळेत आणि त्यापूर्वीच संपवाव्यात, मिरवणुकीमध्ये गुलाला ऐवजी फुलांच्या पाकळ्यांचा वापर करावा, श्री गणेश विसर्जन मिरवणुका डीजे डॉल्बी व दारूमुक्त साजरा कराव्यात, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी यावेळी केले.

### प्लाजमा बिमलाईट, लेझर बीम लाईटला बंदी...

मिरवणूकीदरम्यान प्लाजमा बिमलाईट आणि लेझर बीम लाईटचे प्रखर प्रकाशामुळे मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले आणि मिरवणूक पाहण्यास आलेले लहान मुले, वयोवृद्ध, ज्येष्ठ नागरिक, सामान्य नागरिक यांच्या डोळ्यास इजा होऊन त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धाराशिवच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी अशा लाईट वापर करण्यास मनाई केली आहे. गणेश मंडळाच्या अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी प्लाजमा भीम लाईट आणि लेझर बीम लाईट चा वापर करू नये अन्यथा सक्त कारवाई करण्याचा इशाराही जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या पत्रकार परिषदेत दिला.

---

## भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी काळे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**
भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान (यमगरवाडी सोलापूर) च्या कार्यकारी मंडळाची बैठक नुकतीच पुणे येथे संपन्न झाली. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान मार्फत यमगरवाडी येथे भटके मुक्त समाजाकरिता निवासी शाळा प्रकल्प चालवला जातो. तसेच महाराष्ट्रा मध्ये विविध जिल्ह्यातभटक्या विमुक्त समजाकरिता सामाजिक उपक्रम तसेच पालावरच्या शाळा चालविल्या जातात.

पुणे येथील बैठकीमध्ये नाशिक येथील सामाजिक कार्यकर्ते उद्धव काळे यांची भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



प्रतिष्ठानचे उपाध्यक्षपदी धाराशिव येथील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. अभय शहापूरकर यांची नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त कार्यकारिणी खालील प्रमाणे उद्धव काळे अध्यक्ष, डॉ. अभय शहापूरकर उपाध्यक्ष, विवेक अयाचित कार्यवाह (लातूर), नरेश पोटे (मुंबई) कोषाध्यक्ष, तसेच सदस्य पदी परेशशकांत मांगलिक (मुंबई), अभय कुलकर्णी (पुणे), संतोष शिर्के (सोलापूर), विजय गिजर (पुणे), अशोक संकलेचा (सोलापूर), डॉ. संजय पुरी (परतूर), गोविंद जी पुरोहित (मुंबई), पर्णाद मोकाशी (मुंबई), ॲड. प्रदीपसिंग राजपूत (सोलापूर), डॉ. प्रणिता गडेकर (तुळजापूर), ॲड. जनक पाटील (तुळजापूर) यांची प्रतिष्ठानच्या संचालक पदी नियुक्ती करण्यात आली.

---

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विशेष...

## मराठवाडा मुक्ती संग्रामात लढले आलुरचे वसंतराव बळीराम पोतदार...

मराठवाडा मुक्ती संग्रामात आलुर येथील स्वातंत्र्य सैनिकांचा देखील सहभाग होता.



आलुर हे गाव मराठवाड्यातील महाराष्ट्राच्या अगदी टोकाचे महाराष्ट्र कर्नाटक सिमेवरील गाव आहे आणि या गावच्या अगदी जवळच भारतीय सेनेची व निजाम सरकारच्या चौक्या होत्या. जाता येता रझाकारांचे अत्याचार व लुट आलुर व परिसरातील गावांमध्ये होत होती अशांमध्येच आलुरपासुन वीस किलोमीटरवर असलेल्या नंदगाव गावातील रझाकारांनी केलेल्या जाळपोळीच्या घटनेमुळे दहशत होती. या काळात आलुर येथील स्वातंत्र्य सैनिक देवेंद्र कासार, शिवराया भालके, निलप्पा बोळदे, वसंतराव पोतदार, खंडेराव इंगळे या स्वातंत्र्य सैनिकांनी कुणी भुमिगत तर कुणी प्रत्यक्षपणे स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. चळवळीत कोण काम करेल त्यांना रझाकार त्रास देत असत म्हणुन ते भुमिगत पणे स्वातंत्र्य लढ्यात काम असत. मराठवाडा मुक्ती संग्राम चळवळ चालू असताना पत्री सरकारमध्ये सक्रिय सहभाग असलेले क्रांतिसिंह नाना पाटील यांनी आलुरला भेट दिली होती आणि त्यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळाले, आम्ही भुमीगतपणे सैन्याला बित्तंबातमी पुरवायचो असे मत वसंतराव पोतदार व्यक्त केले. आम्ही काम करत असताना भविष्यात आम्हाला शासनाकडून काही मिळेल या भावनेने कधीच काम केले नाही असेसुद्धा त्यांनी सांगितले.

---

## युवकाने साकारलाय गणपतीसमोर शेतकरी राजाचा देखावा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**
नळदुर्ग येथील सुजय सुधीर विश्वास या युवकांने आपल्या घरातील गणपतीसमोर शेतकरी राजा हा शेतकऱ्यावरील अतिशय सुंदर असा देखावा सादर केला आहे. या देखाव्याच्या माध्यमातुन सुजय विश्वास याने कितीही संकटे आली तरी शेतकरी हा राजाच असतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

सुजय सुधीर विश्वास हा युवक मुळचा पश्चिम बंगाल राज्यातील आहे. मात्र सध्या याचे कुटुंब नळदुर्ग शहरात स्थायिक झाले आहे. गणेशोत्सवात दरवर्षी आपल्या घरातील गणपतीसमोर सुजय हा वेगवेगळ्या ज्वलंत विषयांवर देखावे सादर करतो. गेल्या दहा वर्षात सुजय विश्वास यांने आपले वडील, आई व पत्नीच्या सहकार्याने वेगवेगळ्या विषयांवर वेगवेगळे देखावे सादर केले आहेत. याबद्दल त्याला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. यावर्षी सुजय विश्वास याने आपल्या घरातील गणपतीसमोर शेतकरी राजा हा देखावा अतिशय सुंदरपणे सादर केला आहे. शेतकरी व शेतकऱ्यांचे जोडधंदे काय, काय असतात हे दाखविण्याचा प्रयत्न सुजयने देखाव्यातुन केला आहे. हा देखावा पाहण्यासाठी दररोज नागरीक विशेषता महिला मोठी गर्दी करत आहेत.

---

## जलतरण स्पर्धेत आश्वेता मराठवाड्यात तिसरी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या मराठवाड्यातील महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेमध्ये नळदुर्ग येथील कला. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील बी.एस.सी. प्रथम वर्षात शिकत असलेले आश्वेता शिवाजी गायकवाड यांनी मराठवाड्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे.

दि.१५ सप्टेंबर रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते सत्कार करून तीचा गौरव करण्यात आला आहे.

यावेळी शहर भोई समाजाचे अध्यक्ष सुनील उकंडे, नय्यर जहागिरदार, विलास पुदाले, पाडुरग पुदाले, सुशांत भुमकर, पद्माकर घोडके, दिपक डुकरे, धिमाजी घुगे, सतोष पुदाले, एस.के. बागवान, शतनु डुकरे उपस्थित होते.

---

## एक हजार विद्यार्थ्यांना घडविले तारांगण दर्शन; श्री माऊली तरुण गणेश मंडळाचा उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**
शहरातील माऊली चौक येथील श्री माऊली तरूण गणेश मंडळाच्यावतीने यंदा वेगवेगळ्या शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांना आकाशातील गृह, तारांगणाचे दर्शन घडविण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खगोलशास्त्राची माहिती देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील अंधश्रध्दा कमी होवून वैज्ञानिक दृष्टिकोन रूजविण्यास मदत होणार आहे.

धाराशिव प्रशालेत शनिवार, १४ सप्टेंबर रोजी सकाळी या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक माढेकर, पत्रकार उपेंद्र कटके, बाबुराव चव्हाण, शितल वाघमारे, धाराशिव प्रशालेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. मागील तीन दशकांपासून श्री माऊली तरूण गणेश मंडळाच्यावतीने दरवर्षी विविध सामाजिक, वैज्ञानिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

यंदा विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्रातील विविध संकल्पना, अवकाशातील ग्रह, तारे, ग्रहण, सूर्यमंडळ यांची माहिती थ्रीडी तंत्रज्ञानामध्ये उभारलेल्या डोममध्ये दाखविण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी पोलाद या कंपनीच्या सहकार्याने विविध शाळांतील एक हजार विद्यार्थ्यांना मंडळाच्यावतीने मोफत तारांगण राबविण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष नितीन किशोर मुंडे, उपाध्यक्ष अनिल बाळासाहेब मुंडे, सचिव ॲड. मंगेश गाजरे, कोषाध्यक्ष विनोद मुंडे, रवि मुंडे, संताजी मुंडे, कार्याध्यक्ष अभिजीत मुंडे, प्रथमेश पाटील, हरिओम मुंडे, वैभव प्रवीण मुंडे, सुनील मुंडे, प्रशांत मुंडे यांनी परिश्रम घेतले.

---

# महायुती सरकार महिला शेतकरी युवक यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी : मुख्यमंत्री शिंदे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**
कांदा निर्याती संदर्भात मोठा निर्णय आम्ही घेतला असून जे निर्यात शुल्क रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. कांद्यावरची निर्यात बंदी उठवल्याबद्दल आपण केंद्र शासनाचे आभार मानतो. सोयाबीन वरील आयात शुल्क वाढवले आहेत. त्यामुळे सोयाबीनला चांगला भाव मिळेल. शेतकऱ्यांच्या वीजेचं बील माफ करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला असून शेतकऱ्यांना १ रुपयात पीक विमा प्रिमीअम भरण्याचा निर्णय घेतला आहे.राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र सरकारचे ६ हजार रुपये आणि राज्य सरकारचे ६ हजार रुपये असे १२ हजार रुपये महायुती सरकार देवून शेतकऱ्यांचा सन्मान करत आहे. राज्यात महायुतीचे सरकार आल्यामुळे विकास कामांना गती मिळाली आहे हे सरकार महिला युवक शेतकरी कष्टकरी कामगार आणि सर्वसामान्यांसाठी काम करणारे सरकार असून महायुती सरकारने राबवलेल्या योजना शिवसैनिक पदाधिकारी यांनी प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी काम करावे. जेवढ्या योजना आम्ही सुरू केल्या तेवढ्या योजना कायम सुरूच राहतील असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाराशिव येथे शिवसेना मेळाव्यात केले.

यावेळी व्यासपीठावर आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा संपर्कप्रमुख अनिल खोचरे, जिल्हा संघटक सुधीर पाटील, जिल्हाप्रमुख सुरज साळुंखे, नितीन लांडगे, अजित लाकाळ, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पनुरे आणि शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, आम्हाला बहिणींना लखपती झालेले बघायचे आहे. लाडकी बहीण, लाडका भाऊ, जेष्ठ मंडळी व विद्यार्थी शेतकरी सर्वांचे हे सरकार आहे. मुलींचे शिक्षण मोफत केले आहे. सरकारने मुलींना उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलीची १०० टक्के फी भरण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राला उद्योग व्यवसायात आम्ही अव्वल केले आहे. ५४ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. तुम्ही बळ दिले तर दीड हजाराची रक्कम दोन हजार, अडीच हजार करू ही रक्कम वाढत जाईल. लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली आहे. लाडक्या भावासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना आणली आहे. सुशिक्षित बेरोजगारांना महिन्याला त्यांना मानधन देण्याची व्यवस्था केली आहे. अशा प्रकारची व्यवस्था भावांसाठी करणारी देशातले हे पहिले शासन आहे. तीन सिलेंडर मोफत देणारी योजना सुरू केली आहे. लेक लाडकी योजना सुरू केली आहे. भगिनींना एसटीमध्ये ५० टक्के सवलत दिली आहे. ५० टक्के सवलत दिल्यामुळे आता महिलांची सोय झाली आहे. लेक लाडकी योजना मुलींसाठी सुरू केली. महिलांना एस टीच्या प्रवासात ५० टक्के सवलत देत आहे.

या शिवसेना पदाधिकारी मेळाव्यात धाराशिव शहरातील लिंबराज डुकरे मित्र मंडळाच्या सर्व शाखा प्रमुखांनी आणि स्वतः लिंबराज डुकरे यांनी मुख्यमंत्र्यांचे हस्ते शिवसेनेत प्रवेश केला.

या शिवसेना मेळाव्याचे प्रास्ताविक सुधीर पाटील यांनी केले. त्यात त्यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कळंब-धाराशिव विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचा कोणताही उमेदवार निवडून आणण्यासाठी निर्धार करण्याचे आश्वासन दिले. तसेच आगामी काळात धाराशिव जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी आणि सरकारच्या योजना घरोघरी जाऊन पोहोचवण्यासाठी शिवसैनिकांनी काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# सोयाबीन, कांदा याबाबत सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

केंद्र सरकारने सोयाबीन तेलावरील आयात शुल्क वाढवण्याचा घेतलेला निर्णय आणि कांदा निर्यातीला दिलेलं प्रोत्साहन या दोन्ही निर्णयामुळे केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे असून शेतकऱ्यांच्या फायद्याचे निर्णय घेणारे असल्याचे प्रतिपादन आमदार राणाजगजीत सिंह पाटील यांनी केले ते आज धाराशिव येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी नितीन काळे रामदास कोळगे सतीश दंडनाईक राजसिंहराजे निंबाळकर अजित पिंगळे अभय इंगळे साहेबराव घुगे विजय शिंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना आमदार पाटील पुढे म्हणाले की सोयाबीन दराच्या बाबतीत आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत ,केंद्र सरकारने घेतलेल्या मोठा निर्णय घेत खाद्यतेलावरील आयात शुल्क वाढवण्याचा घेतलेला निर्णय आता शेतकऱ्यांच्या सोयाबीनचा दर वाढवणारा ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीनला आता नक्कीच पाच हजारांच्या पुढे दर मिळेल असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन खरेदी आधारभूत केंद्र पुढच्या काही दिवसात सुरू होतील अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. कांदा निर्यातीलाही सरकारने प्रोत्साहन देण्यासाठी निर्णय घेतला आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्यात खूप मोठ्या प्रमाणात लागवड होणाऱ्या कांद्यालाही आगामी काळात चांगला भाव मिळण्याची शक्यता आमदार पाटील यांनी व्यक्त केली. २०२३ च्या अतिवृष्टी नुकसानी पोटी राज्यातील ११ लाख शेतकऱ्यांसाठी अकराशे कोटी रुपये प्रत्येकी ५००० प्रती हेक्टर प्रमाणे मिळणार असून २०२१ - २२ चे पिक विमा नुकसान भरपाई याचिकांवर कोर्टात प्रक्रिया चालू आहे त्याचाही लवकरच निकाल लागेल असे त्यांनी सांगितले. तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणांची ६० कोटींची कामे आगामी दहा दिवसात सुरुवात होणार असून तुळजापूर तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा प्रस्तावित आहे, त्याची कामेही लवकरच सुरू होतील, असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

उजनीचे पाणी रामदरा तलावात लवकरच येईल, हे पाणी ज्या घाटणे बॅरेज मधून उचलले जात आहे त्या भागात पाण्याची आवक



वाढल्यामुळे याला थोडा विलंब लागत आहे. परंतु आगामी काळात हे पाणी लवकरात लवकर राम दरा तलावात आणण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार राणादादा यावेळी म्हणाले.

## पोदार शाळेमुळे नळदुर्गमध्ये शैक्षणिक क्रांती होईल : संजय जाधव

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**

नळदुर्ग व परीसरातील ग्रामीण भागात पोदार इंटरनॅशनल शाळेची सुरुवात म्हणजे दर्जेदार शिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळेल असे मत धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी व्यक्त केले.

सद्गुरू शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने नळदुर्ग जवळील हॉटेल दिल्ली दरबारच्या समोर पोदार शाळेची उभारणी केली जात आहे याचे भुमिपुजन पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते झाले. उमाकांत मिटकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना मिटकर यांनी म्हटले की, मी लहानपणापासुन नळदुर्ग मध्ये राहतो पण इथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जाची शाळा अद्यापही सुरू झाली नाही अनेक पालकांची मुले ही महानगरामध्ये शिक्षणाला जातात.

यावेळी पोदार शाळेचे प्रतिनिधी प्राचार्य श्रीकांत वारुळे यांनी पोदार शाळेची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. संतोष पवार यांनी केले. यावेळी सद्गुरु शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते आज जिल्हा युवा पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील युवा विकासाच्या कार्यात केलेल्या योगदानाची दखल घेऊन दरवर्षी युवकांना आणि युवकांच्या नोंदणीकृत संस्थांना जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून क्रीडा विभागाच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहणानंतर जिल्हा युवा पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी सन २०१९-२० वर्षाकरिता संजय भुतेकर (थोडसरवाडी ता.जि. धाराशिव), सन २०२०-२१ च्या पुरस्कारासाठी अनिल भोसले (मु.पो. गावसुद), सन २०२१-२२ च्या पुरस्कारासाठी दीपक कारकर मु.पो.जवळा (ता.परंडा) येथील दीपक कारकर आणि सन २०२२-२३ च्या जिल्हास्तरीय युवा पुरस्कारासाठी अजिंक्य वराळे (मुळेवाडी पो. किनी) यांची तर संस्थेचे जिल्हास्तरीय युवा पुरस्कार सन २०१९-२० चा पुरस्कार नवयुवक क्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्था मुळेवाडी (ता.जि.धाराशिव), सन २०२०-२१ चा जिल्हास्तरीय युवा पुरस्कार लोककल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्था काटेवाडी (ता.उमरगा) आणि सन २०२२-२३ चा जिल्हास्तरीय युवा पुरस्कार वात्सल्य सामाजिक संस्था नळदुर्ग यांना पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

पुरस्काराचे स्वरूप जिल्हास्तरावर दरवर्षी एक युवक आणि एक युवती तसेच एका नोंदणीकृत संस्था यांना गौरवपत्र, सन्मानचिन्ह व १० हजार रुपये (प्रति युवक आणि युवती) आणि संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख ५० हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

संविधान मंदिराचा उद्घाटन समारंभ संपन्न...

## भक्कम लोकशाही करिता संविधानाचा जागर घरोघरी व्हावा : संतोष राऊत




**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.१६ सप्टेंबर -**

भक्कम लोकशाही करिता संविधानाचा जागर घरोघरी व्हावा, असे प्रतिपादन कौशल्य विकास व नाविन्यता विभागाचे सहाय्यक आयुक्त संतोष राऊत यांनी शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था कळंब येथील संविधान मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमात केले.

सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारताच्या संविधानातुन प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षनार्थीना सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळावी यासाठी मंगल प्रभात लोढा, मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या संकल्पनेतून राज्यातील ४३४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये संविधान मंदिराची स्थापना करण्यात आलेली आहे.

या संविधान मंदिराचे उद्घाटन उपराष्ट्रपती जयदीप धनखड यांच्या हस्ते दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाइन पद्धतीने झाले. कार्यक्रमास प्रमूख पाहुणे म्हणून डी.एस. लांडगे, उपशिक्षणाधिकारी, आयमसी सदस्य जी.बी. करडे, पी.बी. झोरी, आर.एम. कापसे, श्रीकांत खारके, वैभवराज फाटक, आशा राऊत, सूरज भांडे, महादेव आडसुळ, सुभाष घोडके, सी.आर. घाडगे, बंडू ताटे, प्रकाश भडंगे, अविनाश घोडके, नवनाथ भंडारे, माधवसिंग राजपूत उपस्थित होते.

## युवराज नळे 'रौशन' लिखित तिच्या कविता या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

कलाविष्कार अकादमी, साहित्य भारती आणि म.सा.प. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिच्या कविता या युवराज नळे रौशन लिखित काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

स्त्रीमनाचे हळवे भावविश्व उलगडणाऱ्या, नाती मैत्री प्रीतीच्या नाजूक रेशीमगाठी जपणाऱ्या आणि प्रसंगी सामाजिक



जाणीवांनाही प्रखरतेने मांडणाऱ्या 'तिच्या कविता.... या काव्य संग्रहाच्या प्रकाशनाला केंद्रस्थानी ठेऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रकाशन सोहळा सुवर्णा पवार (उपआयुक्त महिला व बालकल्याण विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या हस्ते व जेष्ठ लेखिका कमल नलावडे, शास्त्रज्ञ डॉ. हेमा शिराळ होगाडे, भरोसा सेल प्रमुख पोलिस उपनिरीक्षक अनघा गोडगे आणि सौ वर्षा नळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

## श्री नृसिंह गणेश मंडळाच्या वतीने विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१६ सप्टेंबर -**

येथील श्री नृसिंह गणेश मंडळाच्या वतीने घेण्यात रविवारी (ता.१५) घेण्यात आलेल्या लहान मुलांच्या नृत्य स्पर्धेला चांगला प्रतिसाद मिळाला.या नृत्य स्पर्धेत चाळीस स्पर्धकांनी सहभागी होऊन काना सोजा रे, दैवत छत्रपती, गाडी घुंगराची, मंगळागौर, येडाई गरबा खेळाया निघाली, लुंगी डांस लुंगी डान्स रिमिक्स गाण्यांवर नृत्य सादर करताना प्रेक्षकांना नृत्याचा तालावर ठेका धरायला लावला.

स्पर्धेचे उद्घाटन येडाई व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका डॉक्टर पल्लवी संदीप तांबारे,प्रणिता सोमनाथ बेदरे, आरती कवडे, जगन्नाथ जनार्दन बारकुल यांच्या हस्ते करण्यात आले. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली.

मोठ्या गटात प्रथम क्रमांक श्वेता पांडुरंग बेदरे द्वितीय रोशनी औदुंबर बारकुल तर तृतीय क्रमांक स्वराज दत्तात्रय बारकुल यांनी मिळविला तर उत्तेजनार्थ वैष्णवी दत्तात्रय बारकुल हीला बक्षिस देण्यात आले.

लहान गटामध्ये प्रथम क्रमांक गौरी सुरज भालेराव द्वितीय क्रमांक प्रांजल अमोल बारकुल तर तृतीय क्रमांकाचे देवांश औदुंबर बारकुल यांने बक्षिसे मिळवले तर उत्तेजनार्थ गौरी सुरेश भालेराव हीला बक्षीस देण्यात आले.

या स्पर्धेतील प्रत्येक स्पर्धकाला मंडळाकडून विजेत्यांना अनुक्रमे रोख रक्कम ट्रॉफी, तर सहभागी स्पर्धाकांना प्रमाणपत्र, भेटवस्तू देण्यात मान्यवारांच्या हस्ते देण्यात आल्या.

मंडळाच्या वतीने रवीवारी (ता. १५) आयोजित ५ वी ते १२ वी स्पर्धा परीक्षेमध्ये प्रथम क्रमांक सिद्धांत मारुती बारकुल द्वितीय क्रमांक शुभम राजेश शिरसट तृतीय क्रमांक धनश्री बालाजी बारकुल यांचेही या कार्यक्रमात सन्मान करण्यात आले.

यावर्षी मंडळाने डीजेसह इतर खर्च टाळून विविध उपक्रम घेतल्यामुळे मंडळाचे ग्रामस्थांतुन कौतुक होत आहे.

## जिल्हा संघटक सुधीर पाटील यांच्या हस्ते शिवसेना शाखांचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

हिंदू हृदय सम्राट तथा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाने धाराशिव जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी धाराशिव जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी शिवसेना शाखा उद्घाटनाचा सपाटा लावला असून त्यांच्या पुढाकारातून व संकल्पनेतून जुनोनी येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी गावातील ज्येष्ठ मंडळी, पक्ष पदाधिकारी व गावातील मंडळी उपस्थित होते. यावेळी गावातील नागरिकांनी मूलभूत अडचणी अण्णांना सांगितल्या व त्या सोडण्याचे आश्वासन ग्रामस्थांना त्यांनी दिले. यावेळी गावातील नागनाथ पाटील, अकबर शेख, राजा मामू शेख, अण्णा पाटील व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच वलगुड येथेही शिवसेना शाखेचे उद्घाटन अण्णांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गावकऱ्यांनी रस्त्याची अडचण अण्णा जवळ काही कामांच्या अडचणी व्यक्त केली. त्यासाठी नक्की पाठपुरावा करू असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी गावातील बिभिषण जाधव, भारत जाधव भोंग, शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच सुर्डी या ठिकाणी शिवसेना शाखेचे उद्घाटन त्यांनी केली. यावेळी गावातील गावकऱ्यांनी धोंडेबुवा महाराज मंदिराच्या सभा मंडपाचे बऱ्याच दिवसापासून रखडलेले काम शासन दरबारी मार्गी लावण्याची मागणी केली हे काम शासन दरबारी लवकरात लवकर मंजूर करून पूर्ण करण्याच्या आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी नाना पाटील, श्रीकांत देशमुख, गावातील मनोज चोपाटे, रमेश शेलार, माळी पांडागळे, कांबळे, लोभे, माने, जोगाडे व गावातील असंख्य नागरिक व शिवसैनिक उपस्थित होते.

तसेच बेगडा या ठिकाणीही अण्णांच्या व ज्येष्ठ ग्रामस्थांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गावाकडे गावकऱ्यांनी बऱ्याच दिवसापासून रखडलेले विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सभामंडपाचे काम व गावातील दोन मंदिर बांधून द्यावी अशी मागणी गावकऱ्यांनी अण्णांकडे केले.

याप्रसंगी पोपट साळुंखे, दीपकराव देशमुख, नाना शेंदारकर, रमेश साळुंखे, कसबे, क्षीरसागर व गावातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

## गांधी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला धाराशिवात भाजपाकडून जोडे मारो आंदोलन




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक धाराशिव या ठिकाणी भारतीय जनता पार्टी, भारतीय जनता युवा मोर्चा, अ.जा.मोर्चा व भारतीय जनता पार्टी सर्व मोर्चे, आघाडी धाराशिव यांच्या वतीने आरक्षण विरोधी राहुल गांधी यांच्या आरक्षण संपवण्याबाबतच्या वक्तव्यामुळे त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून आंदोलन करण्यात आले.

अमेरिकेतील वॉशिंग्टन या ठिकाणी प्राध्यापक व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर लोकसभेचे विरोधी पक्ष नेते तथा काँग्रेसचे सर्वोसर्वा राहुल गांधी यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित घटकांना दिलेले आरक्षण आम्ही सत्तेत आल्यानंतर कालांतराने संपवून टाकू अशा पद्धतीचे बेजबाबदारपणाचं आणि सर्व वंचित शोषितांना चीड आणणारे वक्तव्य केले. इंडी आघाडीने व काँग्रेसने मागील लोकसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपा सत्तेत आल्यानंतर राज्यघटना बदलणार आहे. आरक्षण संपवणार आहे अशा पद्धतीचे संभ्रम तयार करणारे वक्तव्य करून लोकांमध्ये भीती निर्माण करून खासदार निवडून आणले आणि तेच आता आरक्षण संपवण्याची भाषा करत वक्तव्यातून त्यांनी त्यांचा खरा चेहरा सर्वांसमोर आणलेला आहे.आरक्षणाला हात घालण्याचा प्रयत्न केला तर भारतीय जनता पार्टी कदापी माफ करणार नाही अशा पद्धतीचा सज्जड दम देखील आंदोलनावेळी दिला. या वक्तव्याच्या निषेधार्थ धाराशिव येथे राहुल गांधी यांच्या विरोधात घोषणाबाजी करत त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारून आंदोलन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहा राजेनिंबाळकर, प्रकास. प्रवीण पाठक, युवराज नळे, सरचिटणीस, दीपक आलुरे, इंद्रजित देवकते, सुनील काकडे, विक्रमसिंह देशमुख, किसान मोर्चाचे राम दास कोळगे, गुलचंद व्यवहारे, राजाभाऊ पाटील, संतोष बोबडे, अभय इंगळे, विद्या माने यांच्यासह आदींनी आपल्या मुलाखतीतून तीव्र शब्दात राहूल गांधी यांचा निषेध व्यक्त केला.

याप्रसंगी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रा.पं. सदस्य जयमाला करंडे यांचे सदस्यत्व रद्द

### जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांचे आदेश....

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ सप्टेंबर -**

सरकारी जागेवर पतीने केलेले अतिक्रमण सिंदगाव (ता.तुळजापुर) येथील महिला ग्राम पंचायत सदस्याला चांगलेच महागात पडले असुन धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी याप्रकरणी सिंदगाव ग्रा.पं.च्या ग्रा.पं. सदस्या जयमाला शिवानंद करंडे यांचे सदस्यत्व रद्द केले आहे. त्यामुळे नंदगाव पाठोपाठ सिंदगाव येथील महिला ग्राम पंचायत सदस्यांलाही पदावरून पायउतार व्हावे लागले आहे.

सिंदगाव येथील माजी ग्रामपंचायत सदस्य चांदपाशा नदाफ यांनी सिंदगावच्या ग्रामपंचायत सदस्या व विद्यमान उपसरपंच जयमाला शिवानंद करंडे यांचे पती शिवानंद आप्पाशा करंडे यांनी सरकारी जागेत अतिक्रमण केल्याची तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेऊन याप्रकारणी तुजाळपुर तहसिदारांना चौकशी करण्याचे आदेश देऊन अहवाल सादर करण्यास सांगितले होते.

यानंतर तहसिलदार यांनी चौकशी करून शिवानंद आप्पाशा करंडे यांनी अतिक्रमण केले असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला. या अहवालानुसार जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ अन्वये सिंदगावच्या ग्रामपंचायत सदस्या जयमाला शिवानंद करंडे यांना ग्राम पंचायत सदस्य म्हणुन अपात्र केले आहे. त्यामुळे जयमाला करंडे यांचे ग्रामपंचायत सदस्यत्व रद्द झाले आहे.

पतीने केलेल्या अतिक्रमणामुळे एका महिला ग्रामपंचायत सदस्याला पदावरून पायउतार व्हावे लागले आहे.

हे प्रकरण चांदपाशा नदाफ यांनी लावुन धरल्याने हा निकाल आला आहे. धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशामुळे पदाचा गैरवापर करून सरकारी जागेवर अतिक्रमण केलेल्या अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### लोकमान्य टिळक महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न

**कदेर, दि.१६ सप्टेंबर -**

लोकमान्य टिळक विद्यालय कदेर (ता. उमरगा) या प्रशालेतील १९९५-९६ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा १५ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. वरिष्ठ शिक्षक गोविंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा स्नेहमेळावा पार पडला. सूत्रसंचालन चंद्रशेखर गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधीर चौधरी, अतुल औरादे, संजय पाटोळे, परमेश्वर एकुर्गे, भास्कर मानेगोपाळे, तन्वीर शेख, वर्षा बिराजदार, रेखा स्वामी, सुमन हुग्गे आणि इतर सर्व मित्रांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी एम.डी. गायकवाड, एन.के. सूर्यवंशी यांनी सुमधुर गीत गायनातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर देशपांडे, चौधरी, दुर्गे गुरुजी, कलशेट्टी, भोसले यांचेही मार्गदर्शन लाभले.

### महिला काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्षपदी ॲड. तनुजा हेड्डा यांची नियुक्ती

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**



महिला काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्ष पदी ॲड. तनुजा हेड्डा निवड करण्यात आली. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धीरज पाटील, ज्येष्ठ नेते विश्वासराव शिंदे यांच्या हस्ते हेड्डा यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या निवडीबद्दल धाराशिव येथे शहर काँग्रेस तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा काँग्रेस मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, जनता बँकेचे संचालक आशिष मोदानी, डीसीसी बँकेचे संचालक मेहबूबपाशा पटेल, जिल्हा काँग्रेस वरिष्ठ उपाध्यक्ष सय्यद खलील, उपाध्यक्ष प्रशांत काका पाटील, उपाध्यक्ष डॉ. स्मिता शहापुरकर, कोषाध्यक्ष बापू शेळके यांच्यासह आदिंनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

### मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**



मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. तत्पूर्वी सकाळी ८:४५ वाजता पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणातील स्मृतीस्तंभास पुष्पहार अर्पण करतील.



### महात्मा बसवेश्वर विद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा

**उमरगा, दि.१६ सप्टेंबर -**

हिंदी दिना निमित्त श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा शाळेत शाळेतील हिंदी विषयांच्या शिक्षिका श्रीमती जोत्सना पाटील यांनी सूत्रसंचलन केले. या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नेताजी गायकवाड उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीत प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका लोहार उपस्थित होते. तसेच प्रमुख मार्गदर्शन प्राथमिक शाळेतील गोपाळ आष्टे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व मान्यवरांच्या उपस्थितीत भित्तिपत्रकांचे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड यांच्या हस्ते फित कापून उदघाटन झाले. यामध्ये विद्यार्थ्यांनी हिंदी कविता, हिंदी लेखकांचे जिवन चरीत्र, हिंदी वाक्य प्रचार, दोहे आदी उत्कृष्ट पणे तयार करून लावले होते.

### मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे आज ध्वजारोहण

**धाराशिव, दि.१६ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.या ध्वजारोहण कार्यक्रमाला प्रशासकीय इमारतीतील सर्व कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे यांनी केले आहे.

## भारतीय बौद्ध महासभेची लोहारा तालुका कार्यकारिणी जाहीर, अध्यक्षपदी तानाजी माटे

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ सप्टेंबर -**

भारतीय बौद्ध महासभेची लोहारा तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असुन अध्यक्षपदी तानाजी माटे यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका कार्यकारिणीची मुदत संपल्याने नुतन कार्यकारिणी गठित करण्यासाठी जिल्हाध्यक्षा राजश्री कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष कुमार ढेपे, पर्यटन उपाध्यक्ष विश्वास पांडागळे, महीला उपाध्यक्षा शिला चंदनशिवे, विजयकुमार बनसोडे, डॉ.प्रा. विवेकानंद वाहूळे, ब्रम्हानंद गायकवाड, केराबाई कांबळे, बाळासाहेब बागडे, प्रा. सुधाकर गायकवाड, रत्नदीप मस्के, अजय सितापुरे, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेटर मेंबर निकिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### निलंग्यात ईद-ए-मिलादनिमित्त १११ जणांनी केले रक्तदान

**निलंगा, दि. १६ सप्टेंबर-**

शहरात ईद ए मिलाद निमित्ताने समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १११ जणांनी रक्तदान केले आहेत. निलंगा शहरातील जुने मार्केट यार्ड येथे दि. १६ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद निमित्त समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिराचे उद्धघाटन निलंगा पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक देशमुख, गोपनीय शाखेचे प्रमुख दादा शिंदे, रहेमान पटेल यांच्यासह पिरपाशा दर्गाह चे सज्जादे सय्यद इसुफजानी कादरी, नसीम खतीब, असगर अन्सारी, समिऊलाहा कादरी उपस्थित होते. हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश देत अनेक हिंदू-मुस्लिम समाज बांधवांनी सहभागी होऊन ईद ए मिलाद निमित्ताने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान केले असून सकाळी नऊ वाजल्यापासून ते दुपारी तीन वाजेपर्यंत सहा तासात १११ जणांनी रक्तदान केले आहेत. या शिबिरात खलील तीलगुरे, सबदर कादरी, महुमद शेख, समिऊलाहा कादरी, गौस शेख, इम्रान सय्यद, बाबा बिब्राले, वसीम अत्तार, सिराज कादरी यांनी परीश्रम घेतले.



### मंगेशकर महाविद्यालयाच्या आकांक्षा जाधवचे कुस्ती स्पर्धेत यश

**निलंगा, दि. १६ सप्टेंबर-**

औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या आकांक्षा सुरेश जाधव या खेळाडूने दि.१३ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय १९ वर्ष मुलींच्या ५० किलो वजन (फ्रीस्टाईल) गटातील कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविले असून तिची निवड विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी झाली आहे. तिच्या यशाबद्दल शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बसवराज वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ, प्रभारी प्राचार्य डॉ.प्रदीप पाटील, महाविद्यालयातील क्रीडा समिती यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आकांक्षा जाधव यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा.विजयकुमार हंडे, क्रीडा शिक्षिका प्रा.अंजना मुळे यांचे मार्गदर्शन लाभले.



### दिंडेगाव खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक

**लातूर, दि. १६ सप्टेंबर-**

पोलीस ठाणे गातेगाव हद्दीतील दिंडेगाव पाटी परिसरात १० सप्टेंबर रोजी किरकोळ भांडणावरून काही तरुणांनी मिळून लाकडी दांड्याने एका तरुणाच्या डोक्यात, तोंडावर मारहाण करून खून केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे गातेगाव येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास गातेगाव पोलीस करीत होते. गुन्हा घडल्यापासून आरोपी फरार होते. ते आपले राहण्याचे ठिकाणे सतत बदलत असल्याने पोलिसांना मिळून येत नव्हते. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करून गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान सदर पथकाला मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून नमूद गुन्ह्यातील दोन आरोपी रेणापूर फाटा ते दर्जी बोरगाव जाणाऱ्या रोडवर एका कॉम्प्लेक्स जवळ लपून बसल्याची असल्याची माहिती मिळाली. त्यावरून सदर पथक तात्काळ तेथे पोहोचून अतिशय सीताफिने नमूद गुन्ह्यातील संशयित आरोपींना दिनांक ११ सप्टेंबर रोजी ताब्यात घेऊन पोलीस ठाणे गातेगाव येथे आणले. पोलीस ठाणे गातेगाव येथे आणून सदर आरोपीना विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव ऋषिकेश अशोक लोमटे, वय २५ वर्षे, राहणार कासाराजवळा तालुका लातूर. तुकाराम साहेबराव यादव, वय २४ वर्ष, राहणार कासारजवळा तालुका जिल्हा लातूर असे असल्याचे सांगितले. त्यांना पोलीस ठाणे गातेगाव येथे दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. तसेच पोलीस स्टेशन गातेगाव यांनीही नमुद गुन्ह्यातील एक आरोपी नामे प्रीतम अण्णाराव हजारे, वय २१ वर्ष राहणार कासारजवळा याला पण अटक केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे गातेगावचे पोलीस अमलदार पाटील हे करीत आहेत. कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकातील पोलीस अंमलदार रामहरी भोसले, प्रकाश भोसले, राजेश कंचे, चालक पोलीस अंमलदार केंद्रे, सायबर सेलचे पोलीस अमलदार देवडे तर पोलीस स्टेशन गातेगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर सानप, पोलीस उपनिरीक्षक जाधव, पोलीस अंमलदार शेख,गिरी, केंद्रे, पतंगे, गुराळे यांनी केली आहे.

# लिंगायत समाजाला प्रवाहात आणण्यासाठी सन्मान यात्रा : खा. गोपछडे

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि.१६ सप्टेंबर-**

वीरशैव लिंगायत समाज सामाजिक शैक्षणिक आर्थिक व राजकीय दृष्ट्या मागासलेला आहे .मागील कालखंडामध्ये विविध कारणामुळे लिंगायत समाजाच्या सर्वांगीण विकासाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले असून लिंगायत समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कर्मभूमीपासून जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मंगळवेढापर्यंत सन्मान यात्रा काढण्यात आली आहे, असे प्रतिपादन राज्यसभेचे खासदार डॉक्टर अजित गोपछडे यांनी केले.

वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे समन्वयक नितीन शेटे यांच्या संकल्पनेतून आयोजित या यात्रेमध्ये भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या डॉक्टर अर्चनाताई शैलेश पाटील चाकूरकर, आमदार अभिमन्यू पवार, लातूर जिल्हा नियोजन व विकास मंडळाचे सदस्य संतोष मुक्ता, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भीमाशंकर राचट्टे ,भाजपा शहराध्यक्ष सुनील उटगे, माजी नगराध्यक्ष बसवराज वळसंगे, कंठप्पा मुळे, माजी नगराध्यक्ष संगमेश्वर ठेसे, विश्वेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव बस्वराज धाराशिवे, तीपणप्पा राजट्टे, रविशंकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

खासदार डॉक्टर अजित गोपछडे म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लिंगायत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना सुरू आहेत. महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाला ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिलाआहे . या योजनेचा समाज बांधवांनी लाभ घ्यावा. तसेच येणाऱ्या काळात लिंगायत समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थी विद्यार्थिनी साठी मोफत शिक्षण योजना , घरकुल योजना आणि मोठ्या महानगरामध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी मोफत वस्तीगृहाची सुविधा करण्याचे साकडे आपण घालणार आहोत. वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रेच्या समारोपप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची मागणी आपण करणार आहोत . असेही खासदार गोपछडे यांनी स्पष्ट केले. मंगळवेढा येथे आयोजित वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रेच्या समारोपप्रसंगी औसा विधानसभा मतदारसंघातून हजारो कार्यकर्त्यांनी उपस्थित राहवे, असे आवाहन यावेळी आमदार अभिमन्यू पवार आणि डॉक्टर अर्चना पाटील-चाकूरकर यांनी केले. औसा येथील आयोजित सन्मान यात्रेसाठी शहर व तालुक्यातील वीर सेवा समाजाचे मान्यवर उपस्थित होते.





### जिल्हा मध्यवर्तीचे बँकेचे संचालक व्यंकटराव बिरादार यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि.१६ सप्टेंबर-**

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान संचालक मा. व्यंकटराव बिरादार ( पाटील) दैठणेकर यांची जिल्हा मार्केटींग फेडरेशन, मुंबई या संस्थेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल शिरुर अनंतपाळ कृषी.उ.बा.समितीचे माजी उपसभापती बाबुराव बिराजदार यांनी सत्कार केला.

यावेळी शिरूर अनंतपाळ नगरपंचायतचे विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ज्यांची ओळख आहे ते नगरसेवक सुधीर लखनगावे, आणि शिरूर आनंदपाल बाजारपेठेतील एक लौकिक व्यापारी म्हणून ओळख असलेले सोमनाथ तांबोळकर, महादेव कांबळे, दैठणा येथील ज्येष्ठ नागरिक कल्याणराव बिरादार या सर्वाकडून जिल्हा मध्यवर्ती चे संचालक व्यंकटरावजी बिरादार यांचे अभिनंदन केले



### तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि.१६ सप्टेंबर-**

तालुका क्रीडा कार्यालय व श्रीराम विद्यालयाच्या वतीने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून मान्यवरांच्या उपस्थितीत सोमवारी स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड हे होते. तर उद्घाटक म्हणून तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड यांची उपस्थिती होती.

रेणुका शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रविकांत अकनगिरे, सहसचिव विठ्ठल कटके, संचालक आनिता भातीकरे, प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, भारत इगे, दिलीप अकनगिरे, मुख्याध्यापक सतिश मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, तालुका क्रिडा संयोजक हनमंत केसरे, क्रिडा शिक्षक विवेक भातीकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रीराम विद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत १४,१७ व १९ वयोगटातील मुलां - मुलींचे एकूण १८ संघ सहभागी झाले होते. यात प्रथम येणाऱ्या संघाला जिल्हास्तरावरील स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे. प्रास्ताविक प्राचार्य सिध्देश्वर मामडगे यांनी केले.

पंच म्हणून सचिन पलमटे, तुकाराम पलमटे, प्रदीप अकनगिरे, सुग्रीव टिप्परकर, अक्षय मोटेगांवकर, कुमार अकनगिरे, क्रिडा प्रशिक्षक कावळे, राजेश कोडे, संतोष लोखंडे, ओमप्रकाश तपघाले, चंद्रकांत जंगापल्ले, जनार्दन बोंबडे, विजय कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. लहुकांत शेवाळे यांनी केले तर ओम हारडे यांनी आभार मानले.

### उदप शेंद येथे प्रवचन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि.१६ सप्टेंबर-**

दर महिन्याच्या पंधरवड्या एकादशीला ता शिरूरअनंतपाळ तालुक्यातील उदप शेंद येथे वर्षाचे बाराही महिने या ठिकाणी प्रवचन घेतले जाते आणि याचप्रमाणे याही एकादशीला या ठिकाणी दिगंबर महाराज हिप्परगेकर यांचे अतिशय आध्यात्मिक स्वरूपातील प्रवचन साजरे झाले या प्रवचनाला उदप शेंद या तीन गावचे व तसेच परासरीतील अनेक गावचे भाविक नेहमीच एकत्र येतात आणि यावेळी सुद्धा खूप संख्येने एकत्र आलेले दिसून आले.

याप्रसंगी जमलेल्या सर्व भाविकांना एकादशीचे फराळ म्हणून नारायण मोतीराम माने उर्फ बापू या सदभक्ताला एकादशीच्या या पवित्र दिवसाचे फराळाचे अन्नदान घडले अशा प्रकारच्या या सतत घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमामुळे आणि या ठिकाणच्या आध्यात्मिक महत्त्वा मुळे या धार्मिक सांस्कृतिक ठिकाणाला क दर्जातील पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त झालेला आहे हे या ठिकाणाचे विशेष असे आहे या कार्यक्रम प्रसंगी प्रचंड संख्येने महिला वर्ग ज्येष्ठ नागरिक तरुण पिढी व स्थानिक स्वंयसेवक मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित असलेले दिसून आले बाबासाहेब माने पद्माकर माने चंद्रहंस माने शरद पाटील संभाजी माने या गावचे लोकप्रिय क्रियाशील सरपंच देवा माने पंढरी माने पंडित दाजी शिवाजी माने महादराव माने प्रताप माने किसन शेळगे विनायक बिरादार भूषण पाटील पवन बिरादार सुनील माने धोंडीराम माने गोविंद शेळके ज्ञानोबा माने शिवाजीराव बिरादार बापूसाहेब पाटील दत्तू तोटे राजनारायण बिरादार या सर्व भाविकांकडून या ठिकाणी याप्रसंगी उपस्थिती लावण्यात आली

### पद्मिनबाई साबणे यांचे निधन

**वलांडी, दि. १६ सप्टेंबर-**



भालकी तालुक्यातील मेहकर येथील रहिवासी असलेल्या पद्मिनबाई शंकरराव साबणे(वय वर्षे ९१) यांचे आज दि.१६ सप्टेंबर वार सोमवार रोजी सायंकाळी पाच वाजता अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर उद्या दि.१७ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता मेहकर येथील जुन्या सायगाव रोडवरील त्यांच्या शेतामध्ये त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पाश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नात व नातवंडे असा परिवार असून त्या धनाजी साबणे यांच्या मातोश्री तर पत्रकार दत्तात्रय साबणे यांच्या त्या चुलती होत.

## डिसेंबरमध्ये अभिजात शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.१६ सप्टेंबर-**

अभिजात फिल्म सोसायटी, लातूरच्या वतीने शॉर्ट फिल्म( लघुपट), वृत्तचित्र, ॲनिमेशनपट फेस्टिवलचे आयोजन डिसेंबर २०२४ मध्ये करण्यात आले आहे. यासंदर्भातील अधिक माहिती देणाऱ्या वेबसाईटचे उद्घाटन नुकतेच फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष किरणजी शांताराम यांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर येथे गत दोन दशकापासून अभिजात फिल्म सोसायटीच्या माध्यमातून चित्रपट आणि चित्रपट संबंधित असणाऱ्या विविध पैलूंच्या संदर्भात दर्शकांमध्ये जाणिवा विकसित व्हाव्यात यासाठी विविध कार्यक्रम आणि चित्रपटांच्या शोचं आयोजन नियमितपणे केल जाते. दर्शकांना आणि चित्रपट निर्मात्यांना वेगळे प्लॅटफॉर्म मिळावे या उद्देशाने लघुपट फेस्टिवल२०२४ चे आयोजन डिसेंबर महिन्यात करण्यात आले आहे. या फेस्टिवल मध्ये सहभागी होणाऱ्या चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री, संगीत, पार्श्वगायन, संपादन, दिग्दर्शन, छायाचित्रण, पटकथा अशा विविध विभागात सुमारे एक लाख तीस हजार रुपयांची पारितोषिक दिली जाणार आहेत. चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात दर्जेदार निर्मिती बरोबरच ग्रामीण भागातील निर्माता, दिग्दर्शक, लेखक, कलाकार यांना संधी उपलब्ध व्हावी या मूळ देशाने या लघुपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना या स्पर्धेत आपल्या प्रवेशिका पाठवायच्या असतील त्यांनी अभिजातफिल्म डॉट ऑर्ग या(abhijaatfilms.org) संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीच्या वतीने जितेंद्र पाटील, डॉ. स्वप्निल देशमुख, धनंजय कुलकर्णी, डॉ विश्वास शेंबेकर, प्रा. शिवशंकर पटवारी यांच्यासह अन्य पदाधिकारी यांनी केले आहे



### केळगाव येथे ५१ जणांचे रक्तदान

**निलंगा, दि. १६ सप्टेंबर-**

तालुक्यातील केळगाव येथे पयाम ए इन्सानियत फाउंडेशन केळगाव व युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्र गावातील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत ईद-ए मिलादुन्नीबीनिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ५१ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन मुश्ताख पटेल यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी प्रेषित मुहम्मद सल्ल. पैगंबर यांच्या मानवकलण्याच्या विचारावर प्रकाश टाकला. तसेच रक्तदानाचे महत्व सांगितले. यावेळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रक्तपेढीचे समाजसेवा अधीक्षक नितीन मुंढे, शफिक शेख यांनी रक्तसंकलन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शफीक शेख, सहील मुळे, मन्सूर शेख, अतुल पटेल, अझर मुळे, शाहरुख मुजावर, रिझवान मुल्ला, मोहसीन पांढरे, इम्रान पटेल, मदार माकणे, मोहसीन पठाण, अझर शेख, वहिद दलिंबकर, असद पांढरे,साजीद मुजावर,जोहर पांढरे,असीम शेख यांनी परिश्रम घेतले.

# मराठवाडा मुक्ती संग्रामात चाकूरच्या सुपुत्रांचे योगदान

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि.१६ सप्टेंबर-**

निजाम सरकारच्या पोलीस ठाण्यातील तुकाराम नावाच्या शिपायाला आपलंसं करून सहकारी स्वातंत्र्य सैनिकांच्या मदतीने ठाण्यातील बंदुका, दारुगोळा व इतर शस्त्रसाठा लुटला. निजामाचे खबरे, सैनिक व हस्तक अशा जवळपास २५ व्यक्तींना वयाच्या २२ व्या वर्षी बळीराम सोनटक्के यांनी यमसदनी पाठवले. अशा अनेक सशस्त्र क्रांतिकारी लढ्यातील आठवणी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने वयाच्या ९९ व्या वर्षी स्वातंत्र सैनिक बळीराम बापूराव सोनटक्के यांनी जागवल्या आहेत.

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र झाला असला तरी भारतातील तीन संस्थाने स्वतंत्र झाली नव्हती. त्या तीन संस्थानातील एक हैद्राबाद हे निजामाचे संस्थान होते. ते भारतात सामील होण्यास तयार नव्हते. निजाम राजवटीविरुद्ध मराठवाड्यातील अनेक शुरवीरांनी लढा पुकारून आंदोलन उभे केले अन् मराठवाडा निजामाच्या तावडीतून १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्त केला. म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यानंतर तब्बल १ वर्ष १ महिना २ दिवसांनी मराठवाडा स्वतंत्र झाला. यामध्ये मराठवाड्यातील लातूर जिल्हातील चाकूर तालुक्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिकांचा सशस्त्र लढ्यात सक्रिय सहभाग होता. या लढ्याचा अमृत महोत्सव वर्षभर विविध कार्यक्रमांनी शासन स्तरावरून यावर्षी साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने घेतलेला हा आढावा.

निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध व रजाकाराच्या आत्याचारविरुद्ध चाकूर तालुक्यातून अनेक तरुणांनी सशस्त्र लढा उभारला. या लढ्यात चाकूर येथील वयाच्या २२ व्या वर्षी उत्स्फूर्तपणे सहभागी झालेले बळीराम बापूराव सोनटक्के आजही हयात आहेत. चाकूर, वडवळ नागनाथ, नळेगाव, जढाळा, रोहिणा, जानवळ, शिवणखेड बु. आदी गावातील अनेक तरुणांचा या स्वातंत्र्य लढ्यात सहभाग होता. खऱ्या अर्थाने हे स्वातंत्र्यविरच देशाचे प्रथम नागरिक आहेत.

त्याग, बलीदान, समर्पणाची ओळख नवीन पिढीला व्हावी म्हणून या थोर व्यक्तमत्वांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा



सन्मान शासन स्तरावरून गेला जात आहे. चाकूर शहरातील गणेशराव कुलकर्णी, भिमसेनजी आर्य यांनी नागनाथ शेटे यांच्या घरी आर्य समाजाची शाखा चालू करून हिंदू संघटना उभी केली. तसेच गिरीधारीलाल नावंदर यांनी तालीम काढून पैलवानांची फौज तयार केली. नरसिंग भांगे यांनी शस्त्रे, बंदूका, बॉम्ब गोळे तयार करून पुरवठा केला. निजाम सरकारचे रजाकार सैन्य व पोलीसांकडून गावातील हिंदु नागरीकांस त्रास होत असल्याने आधीच हिंदु चिडून होते. पोलादी पुरुष सरदार वल्लभाई पटेल यांचे समर्थक व लातूररोड येथे रेल्वेने बिदरहून आलेले रजाकार सैन्य यांच्यात संघर्ष झाला. चाकूरातील स्वातंत्र्य सैनिकांनी पोलीस ठाण्यातील बंदुकांचा साठा रात्रीतून पळवला अन् दुसऱ्या दिवशी सशस्त्र लढा पुकारला. यामध्ये मारुती बावलगावे, बळीराम बापूराव सोनटक्के, निवृत्ती रेड्डी यांनी जय भवानी गल्लीमधे एक तासात पंचवीस रजाकार सैन्यास यमसदनी पाठवले. ही धूसपूस अनेक दिवस चालली होती. त्यात बाकी काही स्वातंत्र्य सैनिक भूमीगत रहिले परंतु बळीराम बापूराव सोनटके व निवृत्ती रेड्डी यांना अटक झाली. स्वातंत्र्य सैनिकांचा गावात व परिसरात दबदबा होता त्यामुळे न्यायालयात यांच्या विरोधात साक्ष देण्यास कोणीही तयार झाले नाही. या दोघांना अहमदपूर जेलमधे ठेवण्यात आले पण हे दोघे जेलमधे गोंधळ घालत असल्याने त्यांना बिदर येथे साखळदंडाने बांधून ठेवण्यात आले. त्यांना शिक्षा म्हणून बिदर येथे सहा महिण्यांची जेल झाली.

निजाम सरकारच्या पोलीस ठाण्यातील तुकाराम नावाच्या शिपायाला आपलंसं करून सहकारी स्वातंत्र्य सैनिकांच्या मदतीने ठाण्यातील बंदुका, दारुगोळा व इतर शस्त्रसाठा लुटला. निजामाचे खबरे, सैनिक व हस्तक अशा जवळपास २५ व्यक्तींना वयाच्या २२ व्या वर्षी बळीराम सोनटक्के यांनी यमसदनी पाठवले. बळीराम सोनटक्के स्वतः पैलवान असल्यामुळे त्यांच्याकडे तालमीतील मित्रमंडळी मोठ्या संख्येने होती. याचा उपयोग त्यांनी निजाम राजवटीविरुद्ध आंदोलन उभे करण्यासाठी केला. या कार्याची दखल लक्ष्मण पेंटर लिखित 'मी पाहिलेला हैद्राबाद मुक्तीसंग्राम' या ग्रंथात घेण्यात आली आहे. निवृत्ती रेड्डी, गिरीधारीलाल नावंदर, लक्ष्मण पेंटर, नरसिंग भांगे, सिताराम ढोलगे, माणिकराव पाटील, रेवप्पा होळदांडगे, त्र्यंबकराव मोतीपवळे, गणपत कोळी, तानाजी वाघमारे, जिनदास बुरसे, देविदासराव जोशी, गोविंदराव दामोदर साळी, बळीराम होळदांडगे, गोविंदराव क्षीरसागर, देवराव जाधव, नागनाथ तुकाराम शेटे, हरिबा मोरे आदी ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांचा या लढयात सहभाग होता. या सशस्त्र क्रांतिकारी लढ्यातील आठवणी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्ताने वयाच्या ९९ व्या वर्षी स्वातंत्र सैनिक बळीराम सोनटक्के यांनी जागवल्या आहेत.

लातूर
# दिनांक

**लातूर तरुण भारत,** सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## वेस्ट इंडीयन शुगर मिल्सच्या संचालकपदी गौरवी भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १६ सप्टेंबर-**



राज्यात खासगी क्षेत्रातील मराठवाडा व विदर्भात उस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक भाव देणाऱ्या देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालिका गौरवी अतुल भोसले (देशमुख) यांची राज्यातील १३३ खासगी साखर कारखान्याची शिखर संस्था असलेल्या वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशीएशन (वीस्मा) पुणे येथील नवीन २०२४ ते २०२७ या नूतन कार्यकारणी सन्माननीय संचालिका म्हणून बहुमताने निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे राज्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

गौरवी भोसले देशमुख ह्या जागृती शुगर इंडस्ट्रीज च्या अध्यक्षा असून या साखर कारखान्याने शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती केली आहे लातूर जिल्ह्यातील देवणी,उदगीर, चाकुर, निलंगा, शिरूर अनंतपाळ जळकोट तसेच शेजारी असलेल्या कर्नाटक राज्यातील बीदर जिल्ह्यातील अनेक गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम या जागृती शुगर मुळे झालेले आहे त्यांच्या कार्याची दखल घेऊन वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोशीशन (विस्मा) पुणे या कार्यकारिणीवर संचालक म्हणून निवड करण्यात आली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त



### प्रा. सलीम मुंजेवार राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित

**देवणी, दि. १५ सप्टेंबर-**
कुसुम सभागृह, नांदेड येथे माजी सहकारमंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्या हस्ते राज्यस्तरीय शिक्षकरत्न नागरिक पुरस्काराने प्रा. सलीम मुंजेवार यांना शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रा. सलीम घुडूसाहेब मुंजेवार हे विवेक वर्धीनी उच्च माध्यमिक विद्यालय देवणी, येथे मागील २९ वर्षापासून रसायनशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्य करीत आहेत. आपल्या सेवा काळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान शाखेबद्दल त्यांच्यात आवड निर्माण करून त्यांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. या काळात त्यांच्या हातून अनेक डॉक्टर, इंजिनियर, केमिस्ट, शास्त्रज्ञ, शिक्षक, प्राध्यापक घडले. हे करीत असताना त्यांनी आपली मुलगी व मुलासह डॉक्टर व इंजिनिअर बनवले. त्यांच्या कार्याची दखल महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेने घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. त्याबद्दल त्यांचे संस्था सचिव भगवानराव पाटील-तळेगावकर, प्राचार्य एन. व्ही. पटवारी, उपप्राचार्य बी. व्ही. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.




### शिरूर अनंतपाळ येथे संविधान मंदिराचे उद्घाटन

**शिरुर अनंतपाळ, दि. १६ सप्टेंबर-**
महाराष्ट्रातील शासकीय ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संविधान मंदिराचे उद्घाटन ऑनलाईन पध्दतीने मुंबई येथून भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी औ प्र. संस्था शिरूर अनंतपाळ येथे संविधान मंदिराचे उद्घाटक उद्घाटक म्हणून प्रमुख अतिथी मादलापूरे, प्राचार्य श्री नूतन विद्यालय शिरूर अनंतपाळ श्री ॲड. योगेश बरदाळे यांची उपस्थिती होती, या कार्यक्रमाचे औचित्य साधुन संस्थेने 'भारतीय संविधान' या विषयावर भारतीय संविधानाचे गाढे अभ्यासक प्रा. अंतेश्वर गायकवाड यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे गट निदेशक डी.सी. कुलकर्णी होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन एस. के. पवार यानी केले. प्रस्ताविकेनंतर प्राचार्य मादलापुरे यांचे भाषण झाले. यावेळी ॲड. योगेश बरदाळे यांचे देखील भाषण झाले. प्रा. अंतेश्वर गायकवाड भारतीय राज्यघटनेची निर्मिती निर्मितीचा तिचा कालखंड त्यावेळी गुंतलेले मनुष्यबळ भारतीय राज्यघटना निर्माण करण्यासाठी आलेला खर्च अशा प्रत्येक बारीक सारीक गोष्टीचे वर्णन त्यांच्या भाषणातून व्यक्त झाले. याप्रसंगी दैनिक तरुण भारतचे पत्रकार राजनारायण बिरादार, नूतन अनंतपाळचे शैलेश कुलकर्णी, राजू लोणकर तसेच संस्थेतील सर्वश्री मिलींद गायकवाड, विशाल तायडे, जी. एल. गंगणे, श्रीमती डुमने, सुनिल नेहते, सूरज शेरसांडे, अनमोल सोनसळे, अमेल शिंदे, राजकुमार गायकवाड, रवी चव्हाण, सुरक्षा रक्षक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते. संविधान प्रस्तावीकेचे सामुहीक वाचन करुन कार्यक्रम संपन्न झाला.

## ▶▶ निधन वृत्त

### गणपतराव बिरादार

**देवणी, दि. १६ सप्टेंबर-**



दि.१५ सप्टेंबर रोजी दुपारी ठीक ३. ५० वाजता आचवाला (ता. देवणी) येथील गणपतराव बापूराव बिरादार यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९७ व्या वर्षी निधन झाले. दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात एक मुलगा दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रा. दयानंद चोपणे

**निलंगा, दि. १६ सप्टेंबर-**



अशोकराव पाटील निलंगेकर मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष काँग्रेस कार्यकर्ते प्रा. दयानंद व्यंकटराव चोपणे यांचे रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी चारच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ६२ व्या निधन झाले. दि. १६ सप्टेंबर, सोमवारी दुपारी बारा वाजता वाजता शांतीवन सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी मंत्री आ. अमित देशमुख, अशोकराव पाटील निलंगेकर, अभय साळुंखे, पंडितराव धुमाळ, डॉ. शरद पाटील निलंगेकर, सुनील माने, हमीद शेख, अजित माने, डॉ. अरविंद भातांब्रे, बाळासाहेब शिंगाडे, मनोज कोळ्ळे, ड वीरभद्र स्वामी, अंकुश ढेरे, रजनीकांत कांबळे, विलास सूर्यवंशी, यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, वकील, डॉक्टर यांच्या सामाजिक व राजकीय चळवळीतील नेते, कार्यकर्ते, मित्र नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी नगराध्यक्षा सुनीता चोपणे यांचे ते पती होत.

## पानगांव-खरोळा रस्त्याचे काम सुरु करा

### ...अन्यथा गणपती विसर्जन करणार नसल्याचा भक्तांचा इशारा

**अंदोलस्थळासह १४ गणेश मंडळाच्या अध्यक्षांनी घेतला निर्णय**

**पोलीस निरिक्षक, रेणापूर तहसीलदारांना इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि. १६ सप्टेंबर-**
खरोळा ते पानगांव दरम्यानच्या रखडलेल्या महामार्गाचे काम सुरु करावे म्हणुन पानगांव व परिसरातीत नागरिक एक महिन्यापासून खरोळा फाटा येथे उपोषणाला बसले असून महिना उलटला तरीही रस्त्याच्या कामाला सुरवात झाली नाही परिसरातील नागरीकानीं महिनाभर वेगवेगळे आंदोलन करूनही प्रशासन हलत नसल्याने अखेर पानगांव येथील १० गणेश मंडळ, हणमंतवाडी येथील ३ गणेश मंडळ आणि अंदोलन स्थळावर बसविण्यात आलेल्या गणेश मंडळाने जोपर्यंत प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरवात होत नाही तोपर्यंत गणपतीचे विसर्जन न करण्याचा रेणापूर पोलीस निरिक्षक आणि तहसीलदारांना इशारा दिल्याने प्रशासना पुढे नवा पेच निर्माण झाला आहे.

रखडलेल्या खरोळा फाटा ते पानगांव राष्ट्रीय महामार्गाचे रस्त्याचे काम तात्काळ सुरु करा या मागणी करिता पानगांव व परिसरातील नागरिकांकडून १५ ऑगस्ट पासून बेमुदत अंदोलन सुरु असुन आज उपोषणाला एक महिना उलटून गेला तरीही कामास सुरवात झालेली नाही.या अंदोलनाला पाठींबा म्हणुन पानगांवच्या व्यापाऱ्यांनी गावची बाजार पेठ बंद ठेवली, अर्धनग्न अंदोलन, मुंडण अंदोलन केले,राष्ट्रवादी काँग्रेसने आणि मनसेने रास्ता रोको केला.हनमंतवाडी येथील नागरीक व शेतकऱ्यांच्या वतीने दोन तासाचा घंटानाद करीत रास्ता रोको केला. तरीही खरोळा फाटा ते पानगाव पर्यंतच्या केवळ १० कि.मी इतक्या रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला महिना उलटला सुरुवात झालेली नाही. किंवा प्रशासनाने दखल घेतली नाही यामुळे अखेर हनमंतवाडी येथील बंजारा युवा गणेश मंडळाचे अध्यक्ष ऋषीकेश जाधव, बंजारा प्रतिष्ठाण गणेश मंडळाचे अध्यक्ष अजय जाधव, विग्नहर्ता गणेश मंडळाचे अध्यक्ष महादेव राठोड यांनी तर पानगांव येथील प्रभात गणेश मंडळ, ज्योती कला गणेश मंडळ,अलंकार गणेश मंडळ, मोरय्या गणेश मंडळ, शिवा युवक गणेश मंडळ, संत गोरोबा गणेश मंडळ, लोकमान्य गणेश मंडळ, संतसेना महाराज गणेश मंडळ,उल्हासनगर गणेश मंडळ,जगदंबा गणेश मंडळ आणि अंदोलन स्थळावर बसविण्यात आलेल्या विघ्नहर्त्या गणेश मंडळाने रेणापूर तहसीलदार व पोलीस निरिक्षक यांना रस्त्याच्या कामाला जोपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरवात होत नाही तोपर्यंत बसविलेल्या गणेश मुर्त्यांचे विसर्जन करणार नसल्याचे लेखी निवेदन दिल्याने प्रशासनापुढे मोठा पेच निर्माण झाला आहे.

> गणेश चतुर्थी दिवशी खरोळा फाटा येथे सुरू असलेल्या अंदोलन स्थळी विग्रहर्त्या गणेशाचे विधिवत पूजन करून गणेश मुर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली आहे.उद्या १७ रोजी अनंत चतुर्थी असुन प्रतिष्ठापित केलेल्या मुर्तीचे विसर्जन करावयाचे असते परंतु ज्या मागणी करीता आम्ही गेल्या महिण्यापासून अंदोलन करीत आहोत त्या मागण्यांचे शासन-प्रशासनाने अजुन निरसन केले नाही.जोपर्यंत प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरवात होणार नाही तोपर्यंत अंदोलन स्थळावरील गणपतीचेही आम्ही विसर्जन करणार नाहीत.
>
> **- सुकेश भंडारे,**
> आंदोलक



### औसा येथे लिंगायत सन्मान यात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. १६ सप्टेंबर-**
भक्ती स्थळ अहमदपूर ते शक्ती स्थळ मंगळवेढा पर्यंत खासदार डॉ.अजित गोपछडे यांनी काढलेल्या वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे आज औसा येथे आगमन झाले . त्यावेळी शहरासह तालुक्यातील समाजबांधवांनी जोरदार स्वागत केले .

खा.डॉ.अजित गोपछडे यांनी श्री नाथ संस्थानास भेट देऊन सद्गुरू श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे दर्शन घेतले. त्यावेळी संस्थानच्या वतीने त्यांचा सद्गुरु यांनी शाल व श्री विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती देऊन शुभाशीर्वाद दिले. डॉ. अर्चना पाटील चाकूरकर,नितीन शेटे, प्रा.भीम ाशंकर राचट्टे, शहराध्यक्ष सुनिलप्पा उटगे, विश्वेश्वरय्या शिक्षण संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, प्रा.युवराज हालकुडे, ॲड. शाम कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

## करजगावची जिल्हा परिषद शाळा प्रथम

### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत १८८ शाळांचा सहभाग; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.१६ सप्टेंबर-**
मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या शालेय स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या १८२ व हायस्कूल ६ अशा १८८ शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील १५० गुणांच्या मुल्यांकनात पंचायत समितीच्या वतीने १४ केंद्रातील मुल्यांकन करण्यात आले. यामध्ये करजगाव येथील जिल्हा परिषद शाळेने औसा तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे . तर चलबुर्गा व माळकोंडजी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत पायाभूत सुविधा ३३ गुण, शासन ध्येय धोरणे अंमलबजावणी ७४ गुण व शैक्षणिक गुणवत्ता ४३ गुण असे १५० गुणांचे मुल्यांकन प्रत्येक शाळेचे करण्यात आले. शाळा पातळीवर पहिल्यांदा मुख्याध्यापकामार्फत मूल्यांकन करण्यात आले.त्यानंतर प्रत्येक तालुक्यातील १४ केंद्राचे केंद्रप्रमुख यांच्याकडून केंद्र स्तरीय मूल्यांकन करण्यात आले. या प्रत्येक केंद्रांतून प्रथम येणारी एक शाळा तालुका मुल्यांकनासाठी उपलब्ध करण्यात आली.यानंतर औसा येथील पंचायत समितीच्या वतीने अंतिम १४ केंद्रांतून प्रथम येणाऱ्या शाळांचे मुल्यांकन करण्यात आले.या म ुल्यांकनात जिल्हा परिषद प्राथमि क शाळा करजगाव शाळेने औसा तालुक्यातून प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान पटकावला आहे. औसा तालुक्यातून करजगाव शाळा प्रथम आल्यामुळे जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीने करजगाव शाळेस भेट देऊन जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, अधिव्याख्याता संतोषजी ठाकुर, विकासजी चव्हाण, अशोक जाधव यांनी मुल्यांकन केले. अभियान शाळा पातळीवर यशस्वीपणे राबविण्यासाठी औसा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी गोविंद राठोड , गटसमन्वयक तथा आलमला केंद्रांचे केंद्रप्रमुख आर. के. जाधव, औसा केंद्राचे केंद्रप्रमुख एच.आय. शेख, औसा पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, तांबरवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख चांदपाशा शेख, म ातोळा केंद्राचे केंद्रप्रमुख रमेश जाधव, खरोसा केंद्राचे माजी केंद्रप्रमुख नागेश लोहारे, केंद्रीय मुख्याध्यापक नुरपाशा शेख यांनी पुढाकार घेतला होता. सरपंच विलास कारे, उपसरपंच श्रीधर जाधव,शाळेचे मुख्याध्यापक नयुम सय्यद, साहेबराव कदम, संजय जगताप, दयानंद कोळसुरे, खुलास राठोड, शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी यासाठी कठोर परिश्रम घेतले.

## सोयाबीन पिकावर पडला करप्या रोग

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि. १७ सप्टेंबर-**
येरोळ (ता.शिरुर अनंतपाळ) येरोळसह परिसरातील डिगोळ, सुमठाणा, चामरगा दैठणा, बोळेगाव कारेवाडी आदींसह २५ गावातील खरीपातील प्रमुख पीक सोयाबीन करपा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात पडल्याने धोक्यात असून यंदा अपेक्षित उत्पन्नाच्या आशा मावळल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने चिंताग्रस्त झाले आहेत.



या भागातील शेतकऱ्याची संपूर्ण भिस्त सोयाबीन वर असून पैसे मिळवून देणारे खरीपातील प्रमुख पीक म्हणून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर यंदा सोयाबीन पीकाचा पेरा केला आहे. यंदा पावसाळ्याच्या सुरुवाती पासून सततचा चांगला पाऊस पडला यात ऑगस्ट महिन्यात साकोळ मंडळात अतिवृष्टी पाऊस पडला सततचा पाऊस ढगाळ दमट हवामानामुळे सोयाबीन फळधारणा अवस्थेत शेंगा बुरशीजन्य रोगांमुळे गळून पडल्या शिल्लक राहिलेल्या शेंगा सोयाबीन वर करपा रोग पडल्याने सोयाबीन सह शेंगा वाळून गेले यामुळे सोयाबीन आतील फळाची अपेक्षित वाढ झाली नसल्यामुळे यंदा सोयाबीन उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटणार आहे यातून हाती अपेक्षित उत्पन्न लागणार नसल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. सोयाबीन कापणी,राशीचा खर्च व सोयाबीन उत्पन्न याचा मेळ बसत नसल्याने यंदा घरग्रस्ती, मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, बाजारातील देणे कशाने फेडायचे या विवंचनेत शेतकरी सापडले आहेत. अतिष्टीचे पंचनामे न करता तात्काळ मदत द्यावे, जाहीर केलेले अनुदान, मागील वर्षी चा विमा शासनाने त्वरित द्यावे आशी मागणी रयत क्रांती संघटनेचे शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्ष गुडेराव चौसष्ठे, तुकाराम कोकरे यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## जिल्हाप्रमुख गोपाळ माने यांनी घेतली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि.१६ सप्टेंबर-**
राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शनिवारी धाराशिव जिल्हा दौऱ्यावर आले असता शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने यांनी त्यांची लातूर विमानतळावर विकास कामानिमित्त भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी अहमदपूर, उदगीर विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामा संदर्भात माने यांनी चर्चा करून निवेदन दिले.

लातूर जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संदर्भात दररोज शिवसेना पदाधिकारी यांनी गावोगावी लाडक्या बहिणीच्या भेटी घेऊन त्यांना या योजनेत सामावून घेण्यासाठी जनजागृती आणि लाभ कसा मिळेल यासाठी प्रयत्न करीत असल्याची माहिती मुख्यमंत्री यांना देण्यात आली. दरम्यान मुख्यमंत्री यांनी या विषयावर सकारात्मक चर्चा



केली आणि आगामी विधानसभा डोळ्यासम ोर ठेऊन शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर अधिक लक्ष देण्याचे आदेश दिले. हे शासन सरसकट खरीप हंगामातील नुकसान भरपाईचे अनुदान लवकरच शेतकरी यांना देण्यात येईल असा विश्वास यावेळी दिला. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख विकास जाधव, किरण स्वामी, तालुकाप्रमुख उमाकांत इंम दे,गोपीनाथ जायभाये, खंडेराव वाघ, मनोज चिखले उपस्थित होते.

## 'मांजरा' च्या शेतकऱ्यांना आणखी १०० रुपये देणार

**चेअरमन देशमुख यांची घोषणा**

**मांजरा साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर दि. १६ सप्टेंबर-**
केंद्र शासनाच्या एफआरपी कायद्यानूसार मांजरा कारखान्याच्या प्रमाणीत साखर उता-यास २५०५ रुपये भाव असताना विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने कारखान्याच्या इतर उपपदार्थांच्या विक्रीतून झालेल्या नफ्यातून ऊस उत्पादक शेतक-यांना पाडव्यापुर्वी प्रति मेट्रिक टन २६०० रुपये प्रम ाणे ऊस बिलापोटी यापूर्वी दिले असून आणखी १०० रुपये देण्याचे कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी जाहीर केले. त्यामुळें मांजरा साखर कारखान्याचा उसाचा अंतीम दर २७०५ रुपये मिळणार आहे तर कर्मचाऱ्यांना १६.६६ टक्के बोनस (दोन महिन्यांचा पगार जाहीर) करण्यात आला आहे.

लातूर तालुक्यातील विलासनगर येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना अधिमंडळाची ४० वी सर्वसाधारण सभा दि.१४ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील कातपूर रोडवरील पार्वती मंगल कार्यालयात कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. त्यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी घोषणा केली.

या सभेस प्रमुख पाहूणे म्हणून आ. अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार धिरज देशमुख, साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, ॲड. श्रीपतराव काकडे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रविंद्र काळे, ट्वेंन्टीवन शुगर उपाध्यक्ष विजय देशमुख, बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शहा, यशवंतराव पाटील, गणपतराव बाजूळगे अनंतराव देशमुख समद पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अधिसभेपुढे कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई यांनी विषयांचे वाचन केले.कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल उटगे यांनी सुचक म्हणून तर संचालक अशोक काळे यांनी अनुमोदन दिले.टाळ्यांच्या गजरात सर्व विषयांना मंजूरी देण्यात आली.

प्रारंभी विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. आदी उपस्थित होते. सर्वांचे स्वागत कारखान्याचे संचालक तात्यासाहेब देशमुख, वसंतराव उफाडे, अशोकराव काळे, व्यंकटराव कदम, सदाशिव कदम, अनिल दरकसे, सुर्यकांत पाटील, सचिन शिंदे, निलकंठ बचाटे, धनराज दाताळ, ज्ञानेश्वर पवार, कैलास पाटील, नवनाथ काळे, शेरखॉ पठाण, शंकरराव बोळंगे, निर्मला चामले, मंगलाबाई पाटील, बाबूराव जाधव, महेंद्रनाथ भादेकर, ज्ञानेश्वर भिसे यांनी केले.सुत्रसंचालन प्रा.सचिन सूर्यवंशी यांनी केले तर कैलास पाटील यांनी आभार मानले.

> **सत्ताधारी लोकांमुळे राज्य पिछाडीवर : माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सत्ताधाऱ्यांवर टीका**
>
> विद्यमान सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्राचे काय वाटोळे करुन ठेवले हे मी सांगण्याची गरज नाही, असे नमुद करुन माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले, या सत्ताधाऱ्यांमुळे महाराष्ट्र आज प्रत्येक क्षेत्रात मागे पडत चालला आहे. महाराष्ट्राला गत वैभव मिळवून देण्यासाठी आगामी विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीच्या प्रत्येक उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रचंड मतांनी विजय करावे, असे आवाहन केले.

> **महाराष्ट्राचा स्वाभीमान पुन्हा मिळवू : आमदार अमित देशमुख यांचा विश्वास**
>
> भाजपा, शिवसेना(एकनाथ शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) या महायुतीच्या सरकारचे सुत्रे गुजरातमधून हलत आहेत. महायुतीने महाराष्ट्राचा स्वाभीमान गहाण ठेवला आहे. बेरोजगारी वाढली आहे. तरुणांचे विवाह होत नाहीत.शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर होत चालले आहेत. आरोग्याचे अनेक प्रश्न भेडसावत आहेत. आरोग्य रस्ते, वीज, पाणी या मुलभूत सुविधाही उपलब्ध होताना दिसत नाही.आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडी तमाम मतदारांच्या प्रचंड पाठीब्यांच्या जोरावर भाजपा महायुतीला गाडून महाराष्ट्राचा स्वाभीमान पुन्हा मिळवेल, असा विश्वास माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.